रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ११६ । पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ३ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹


### बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ धडकणार

**ओडिशा :** बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचा पट्टा आता चक्रीवादळात रूपांतरित झाला असून, तो वेगाने उत्तर-वायव्य दिशेने किनाऱ्याकडे सरकत आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, हे चक्रीवादळ गुरुवारी रात्रीपर्यंत ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला धडकण्याची शक्यता वर्तविली होती. चक्रीवादळ धडकेल तेव्हा या भागात ताशी ७५ किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. वादळाचे परिणाम मात्र अनेक दिवस कायम राहतील. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, हे चक्रीवादळ गोपाळपूर आणि पारादीप किनाऱ्यावर पोहोचण्याची शक्यता आहे.

### पद्मविभूषण पंडित छन्नूलाल मिश्र यांचे निधन

**मिर्झापूर :** प्रसिद्ध शास्त्रीय गायक पद्मविभूषण पंडित छन्नूलाल मिश्र यांचे निधन झाले. गुरुवारी (दि.२) पहाटे साडे चार वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांनी मिर्झापूरमध्ये रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. छन्नूलाल मिश्र यांच्यावर काशीमध्ये अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. २०१४ च्या निवडणुकीत वाराणसीत छन्नूलाल मिश्र हे मोदींचे प्रस्तावक होते.पंडित छन्नूलाल यांची बुधवारी रात्री प्रकृती अचानक बिघडली. वयोमानानुसार अलिकडच्या काळात त्यांना अनेकदा प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.

## वे|ध|क

### विजेच्या धक्क्याने युवकाचा मृत्यू

**विंग/कोळे :** वन्यप्राण्यांची घुसखोरी रोखण्यासाठी अवैध प्रवाहित वीजपुरवठा जोडून शेताभोवती लावलेल्या प्रवाहित तारेच्या कुंपणाला स्पर्श झाल्याने युवकाचा मृत्यू झाला. संबंधित युवक मित्रासमवेत खेकडे पकडण्यासाठी गेला असता शिंगणवाडी परिसरात बुधवारी मध्यरात्री ही दुर्घटना घडली. श्रीकांत केशव पुजारी (वय १८, रा. येणके,) असे मृत युवकाचे नाव आहे. या दुर्दैवी घटनेने येणके गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत श्रीकांत पुजारी हा येणकेतील युवक मध्यरात्री शिंगणवाडी (कोळे) गावच्या हद्दीत बोरपट्टी नावाच्या शिवारात ओढ्याला खेकडे पकडण्यासाठी मित्रांसमवेत गेला होता.

### दीपक बोराडे यांनी उपोषण सोडलं

**जालना :** धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी दीपक बोऱ्हाडे जालना येथे आमरण उपोषणाला बसले होते. मात्र आता दीपक बोराडे यांनी उपोषण सोडलं आहे. १६ दिवस आमरण उपोषण केल्याने दीपक बोराडे यांची प्रकृती खालावली होती. समाज बांधवांच्या विनंतीनंतर आपल्या मुलीच्या आणि मावशीच्या हस्ते ज्यूस पिऊन त्यांनी उपोषण सोडलं आहे. त्यामुळे धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या त्यांच्या मागणीचं काय झालं, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दीपक बोराडे हे सरकारसोबत मागण्यांच्या संदर्भात चर्चा करणार असल्याची माहिती आहे.

### ३० कोटींचे कोकेन जप्त

**मुंबई :** मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क उत्पादन विभागाने अमली पदार्थांच्या तस्करीचा कट उधळून लावला. या कारवाईत सुमारे ३० कोटी रुपये किंमतीचे कोकेन जप्त करण्यात आले. तिघांना अटक करण्यात आली. विमानातून आलेल्या दोन संशयीत प्रवाशांच्या सामानाची कसून तपासणी केली. दरम्यान प्रवाशांकडे २.९९२ किलो पांढऱ्या रंगाचा पावडरयुक्त पदार्थ सापडला. तो पदार्थ कोकेन असल्याचे स्पष्ट झाले. त्याची बाजारात ३० कोटी रुपयांहून अधिक किंमत आहे. अधिकाऱ्यांनी या प्रवाशांना ताब्यात घेतले. अमली पदार्थ घेणाऱ्यालाही अटक केली.

# विसर्जन सोहळा उत्साहात

■ **पावसाचे सावट असताना आनंद कायम**

■ **एक हजार ३८७ मूर्तींचे तलाव, समुद्र, नद्यांमध्ये झाले विसर्जन**



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

दहा दिवसाच्या मनोभावेसेवेनंतर दुर्गा मातेला गुरुवारी दसऱ्याच्या दिवशी (दि.२) निरोप देण्यात आला. ग्रामीण व शहरी भागात सायंकाळी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीच्यावेळी पाऊस पडत असतानाही त्याकडे दूर्लक्ष करीत विसर्जन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. एक हजार ३८७ दुर्गा मूर्तींचे विसर्जन तलाव, नदी व समुद्रात करण्यात आले. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला होता.

रायगड जिल्ह्यामध्ये मोठ्या उत्साहामध्ये देवींचे स्वागत करण्यात आले होते. सोमवारी (दि.२२) पासून जिल्ह्यात नवरात्रौत्सव साजरा करण्यात आला. सकाळी विधीवत पूजा करून पाच हजार १०६ ठिकाणी घट स्थापन करण्यात आले. एकूण एक हजार ३८७ मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली.

जिल्ह्यामध्ये ग्रामीण व शहरी भागात गावागावात नाक्यानाक्यावर नवरात्रौत्सवाचा जल्लोष पाहायला मिळाला. दांडिया, गरबासह वेगवेगळे उपक्रम या कालावधीत घेण्यात आले. आरोग्य विषयक उपक्रमांसह खेळाच्या स्पर्धा तसेच भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. महिलांसाठीदेखील •➤पान २ वर

### पावसामुळे हिरमोड

ढोल ताशांच्या गजरात देवीच्या विसर्जनाची तयारी भाविकांनी केली होती. सायंकाळी अचानक वातावरणात बदल झाला आणि विसर्जनाची तयारी करणाऱ्या भाविकांचा पावसामुळे हिरमोड झाला. संध्याकाळी मुसळधार पावसाने सुरुवात केली. तब्बल दोन तास पडणाऱ्या पावसाने विसर्जन मिरवणुकांना ब्रेक लागला होता.पावसाने विश्रांती घेतल्यानंतर भाविकांनी देवीच्या विसर्जन मिरवणुकीला सुरूवात केल्याचे पाहावयास मिळाले.

# पोटल वाडीमध्ये गोळीबार; तिघांना अटक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

पोटल वाडीमधील मुस्लिम धर्मीय व्यक्तीमधील पूर्व वैमनस्य वाद शिगेला पोहचला आणि रात्री साडेआठ वाजता दहशत माजवण्यासाठी गोळीबार करण्यात आला. या प्रकरणी कर्जत पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले असून दोघे फरार आहेत.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील गुलाम मालदार आणि माजी सरपंच इस्माईल मालदार या दोघांमध्ये गेली अनेक वर्षे वाद आहेत. पोटल ग्राम पंचायतमधील वाडीमध्ये राहणाऱ्या या दोन्ही मालदार व्यक्तिंमधील वाद विकोपाला गेला. गुलाम मालदार यांचा मुलगा पुण्यावरून पोटल येथे आला होता. जागेवरून निर्माण झालेला वाद वाढला आणि त्यानंतर मुत्तीश गुलाम मालदार याने आपल्याकडे असलेल्या गावठी कट्ट्यामधून हवेत गोळीबार केला. घरच्या वादातून दहशत माजवण्यासाठी मुत्तीश याने गोळीबार केला. ग्रामस्थांनी या गोळीबाराची माहिती कर्जत पोलीसांना दिल्यानंतर पोलीस तात्काळ त्या ठिकाणी पोहचले आणि दहशत माजवण्याचा प्रयत्न करणाऱ्या तिघांना ताब्यात घेतले. घरच्या वादातून निर्माण झालेला हा वाद गोळीबारपर्यंत पोहचला असून ग्रामस्थांनी तिघांना स्वतः पकडून ठेवले होते आणि त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर पोलिसांनी तेथे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करून ठेवला.

या घटनेत वाद निर्माण झाल्यानंतर झालेला गोळीबार लक्षात घेऊन पोलिसांनी पळून गेलेल्या दोन आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली आहेत. तर पोलीस उपअधीक्षक राहुल गायकवाड आणि प्रभारी पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांनी घटनास्थळी पाहणी करून स्थानिकांसोबत चर्चा केली.



(छायाचित्र : समीर मालोदे)

• सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांचे वंशज रघुजी राजे आंग्रे यांच्या घरात शस्त्रपूजन करण्यात आले

### आता दुकाने राहणार २४ तास सुरु

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

राज्यातील सर्व दुकानं, हॉटेल्स आणि स्थापनं २४ तास सुरु ठेवता येणार आहेत. त्यामुळे व्यवसाय, अर्थव्यवस्था आणि पर्यटनाला चालना मिळणार आहे. महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व दुकाने आता २४ तास खुली ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र काही दुकानांसाठी हा नियम लागू नसेल.

मद्यपान गृहे, बार परमिट रूम, हुक्का पार्लर, देशी बार हे २४ तास सुरू राहणार नाहीत. तर इतर सर्व आस्थापना, खाद्यगृहं आणि दुकाने आता २४ तास सुरू राहतील. महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना २०१७ हा अधिनियम सर्व दुकाने, निवासी हॉटेल, उपाहारगृहे, खाद्यगृहे, थिएटर्स, सार्वजनिक •➤पान २ वर

# आमदार निधीवर ‘ई-समर्थ’ची नजर




■ **आमदारांना प्रस्ताव पाठवणे होणार शक्य**

■ **कामांचा रिअल-टाईम मागोवा घेता येणार**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत आमदारांना मतदारसंघातील कामांसाठी दरवर्षी मिळणाऱ्या पाच कोटी रुपयांच्या निधीचा कार्यक्षम व पारदर्शक वापर होण्यासाठी राज्य सरकारने ‘ई-समर्थ’ ही ऑनलाईन प्रणाली सुरू केली आहे. प्रायोगिक तत्त्वावर पुणे जिल्ह्यात ही प्रणाली लागू केली असून आगामीकाळात संपूर्ण राज्यात लागू केली जाणार आहे.

केंद्र सरकारच्या ‘ई-साक्षी’ यंत्रणेप्रमाणे ‘ई-समर्थ’ प्रणाली विकसित केली आहे. यामुळे आमदारांना थेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे विकासकामांचे प्रस्ताव पाठविता येतील. तसेच त्यांचा रिअल-टाइम मागोवा घेता येईल. यात रस्ते, खर्च, प्रलंबित प्रस्ताव आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांसारख्या सर्व बाबींचा समावेश असणार आहे.

राज्यातील विधानसभेतील २८८ आमदार आणि विधानपरिषदेतील ७८ आमदारांना प्रत्येकी वार्षिक पाच कोटी रुपये स्थानिक विकास प्रकल्पांसाठी दिले जातात. याशिवाय डोंगरी भाग विकास कार्यक्रमांतर्गत ७७ तालुक्यांना प्रत्येकी दोन कोटी तर १०१ तालुक्यांना प्रत्येकी एक कोटी रुपये निधी देण्यात येतो. हा सर्व निधी आणि त्यातून होणारी कामे ‘ई- समर्थ’ प्रणालीच्या माध्यमातूनच होणार आहेत.

### अशी असेल प्रणाली

- मतदारसंघातील विकासकामांसाठीचा प्रस्ताव प्रणालीवर अपलोड करणार.
- प्रस्ताव दाखल झाल्यानंतर तांत्रिक व प्रशासकीय तपासणी होणार तपासणी
- नंतरच निधी मंजूर करून वर्क ऑर्डर दिली जाणार
- काम झाल्यानंतर ठेकेदाराला ऑनलाईन बिल वितरित केले जाणार
- विकास कामांवर देखरेख करता येणार

# पेझारीत होणार भव्यदिव्य व्यायामशाळा




### शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचा पुढाकार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पेझारी परिसरातील खेळाडूंना खेळाच्या माध्यमातून व्यासपिठ मिळावे, यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. पेझारी येथील श्रीभैरवनाथ युवक मंडळाच्या मैदानात व्यासपिठ तसेच भव्यदिव्य अशी व्यायामशाळा उभी केली जाणार आहे. या कामाचा भूमीपूजन सोहळा गुरुवारी(दि.२) मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी ॲड. निता पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, मंडळाचे व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सदस्य, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. अद्ययावत अशी व्यायामशाळा पेझारीमध्ये उभी राहणार आहे. याठिकाणी वेगवेगळ्या सोयी सुविधा उपलब्ध असणार आहेत. तसेच वेगवेगळ्या सांस्कृतिक, क्रीडा कार्यक्रमांसाठी सर्व सोयीयुक्त असे •➤पान २ वर

# शेतकरी, जनतेसाठी रस्त्यावर उतरणार

### शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांचा इशारा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अतिवृष्टीमध्ये हजारो हेक्टर भातशेती पाण्याखाली गेली. त्यामुळे शेतकरी मोठा आर्थिक संकटात सापडला आहे. ऐन सणासुदीमध्ये शेतकरी चिंताग्रस्त झाले असताना सत्ताधारी मात्र निवडणुकीत मशगूल असल्याचे चित्र आहे. खड्डेमय रस्ते, भरमसाठी वीज बील अशा अनेक समस्यांनी नागरिक त्रस्त झाले आहेत. प्रशासन व शासनाकडून बघ्याची भूमिका घेतली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरणार असा इशारा शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी दिला.

अलिबाग तालुक्यात मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेती पाण्यात बुडाली आहे. नारळ व सुपारीच्या बागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. अनेक घरांची पायाभरणी खचली आहे. शेतकऱ्यांची उपजीविकाच धोक्यात आली असून, सणासुदीच्या काळात त्यांच्या घरात आनंदाऐवजी चिंता आणि हताश दिसून येत आहे. या परिस्थितीत सरकारने कोट्यवधींच्या पॅकेजेस जाहीर केले असले तरी त्याचा एक रुपयाही शेतकऱ्यांच्या खिशात पोहोचलेला नाही. कागदोपत्री आकडे मांडले जात असले तरी तहसील कार्यालय, बँका आणि अधिकाऱ्यांच्या सहीच्या प्रतीक्षेत थकल्याचे वास्तव समोर येत आहे.



याबाबत शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी तीव्र शब्दांत भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्याच्या हक्कासाठी लढणारा पक्ष म्हणजे शेकापच आहे. नेहमीच रस्त्यावर उतरून, प्रशासनाला वठणीवर आणून शेतकऱ्यांचा आवाज बुलंद केला आहे. आज अलिबाग तालुक्यात रस्त्यांची दुरवस्था, पावसामुळे झालेले शेतीचे नुकसान, रेवससारख्या गावात नळांना येणारे चिखलमिश्रित पाणी आणि ज्यादा वीजबिल या समस्यांनी जनता हैराण झाली आहे. पण सत्ताधारी मात्र निवडणुकीत मशगुल आहेत. सुरेश घरत यांनी पुढे म्हटले की, शेकापवर टीका करणाऱ्यांनी आधी स्वतःच्या कामगिरीचा हिशेब जनतेला द्यावा. शेतकरी रडतोय, कामगार अडचणीत आहे, जनतेला पायाभूत सुविधा नाहीत. अशा वेळी सत्ताधाऱ्यांनी तोंड का उघडत नाही? शेकाप पक्ष पूर्वीही शेतकऱ्याच्या पाठीशी होता, आजही आहे आणि उद्याही राहणार असे मत सुरेश घरत यांनी व्यक्त केले. शेतकरी, नागरिकांचे प्रश्न तातडीने सोडविण्यात यावेत, अन्यथा तीव्र भूमिका घेऊन रस्त्यावर उतरले जाईल, असा इशारा यावेळी सुरेश घरत यांनी दिला.

**किमती वाढल्या पण उत्साह कायम** | **सोने, चांदीच्या दागिन्यांसह दुचाकी, चारचाकी खरेदीची लूट**

# बाजारात तेजीचे वातावरण

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

दसऱ्यानिमित्त रायगड जिल्ह्यात वेगवेगळ्या वस्तू खरेदीचा उत्साह दिसून आला. गुरुवारी (दि.२) सकाळपासून वाहन, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक वस्तू यासह सराफ बाजारात जोरदार खरेदी-विक्री झाली.जीएसटी कमी झाल्याने विशेषत: वाहनांची मागणी वाढली. एका दिवसामध्ये चारशेहून अधिक दुचाकी, आणि शंभरहून अधिक चार चाकी खरेदी झाल्या आहेत. गतवर्षीच्या तुलनेने यंदा दुचाकी खरेदीत २० टक्केने वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. सोन्याच्या किंमती वाढल्या असल्या तरीदेखील सोने खरेदीचा उत्साह कायमच असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. त्यामुळे बाजारात तेजीचे वातावरण दिसून आले.



नवरात्रौत्सवानंतर दसऱ्या मुहूर्तावर सोने, जागा, घर, वाहन खरेदी करणे शुभ मानले जाते. त्यामुळे या कालावधीत घरगुतीपासून वेगवेगळ्या प्रकारच्या लहान मोठ्या वस्तू खरेदी करण्यावर अधिक भर दिला जातो. त्यामुळे दसऱ्याच्या मुहूर्तावर वेगवेगळ्या लहान मोठ्या वस्तू आपल्या ऐपतीप्रमाणे खरेदी केल्या जातात. यंदा दसऱ्यानिमित्त गुरुवारी(दि.०२) सकाळपासून वेगवेगळ्या शोरुममध्ये वाहन खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी दिसून आली. वाहन खरेदी केल्यावर त्यांना हार घालून, पूजा करून ग्राहकांनी ते घरी नेले. खरेदी केलेल्या वाहनांसमवेत अनेकांनी सेल्फी व फोटो काढून सोशल मिडीयावर ते व्हायरलदेखील केले. दसऱ्याला नवीन वाहन दारात यावे, यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून बुकिंगला गर्दी होती. दसऱ्याच्या मुहूर्तावरही मोठ्या प्रमाणात बुकिंग झाले. यामुळे सर्वच वाहनांच्या शोरुम्समध्ये गर्दी होती.

रायगड जिल्ह्यामध्ये यंदा होन्डा, हिरो शोरुमधून दुचाकी मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आल्या. पेट्रोलवर चालणाऱ्या दुचाकीला ग्राहकांनी अधिक पसंती दर्शविली असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. यावर्षी जीएसटीचे दर कमी झाल्याने वाहनांच्या किंमतीतही घट झाली. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेने दुचाकी खरेदीत यावर्षी २० टक्केने वाढ झाली आहे. •➤पान २ वर

> “दसऱ्या निमित्त वेगवेगळी सवलत देण्यात आली. ६० टक्के रोखीत आणि ४० टक्के ग्राहकांनी फायनान्सद्वारे वाहने खरेदी केली.जीएसटी दर कमी झाल्याने ग्राहकांनी दुचाकी खरेदीवर अधिक भर दिला आहे. यंदा दुचाकी वाहने खरेदीला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. २५० हून अधिक होन्डा कंपनीची वाहने खरेदी झाल्या आहेत. त्यामध्ये स्कूटर या वाहनांना अधिक पसंती ग्राहकांनी दर्शविली आहे.
>
> -नवीन झा, व्यवस्थापक हिरो शोरुम”

# ‘शेतकऱ्याला हवा महिन्याला १० हजार पगार’

**। बीड । प्रतिनिधी ।**

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची बीडच्या नारायणगड येथे सभा पार पडली. दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर हा मेळावा पार पडला. या मेळाव्याला मनोज जरांगे पाटील हे आजारी असूनही उपस्थित झाले. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणावर भाष्य केलंच, पण यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या मुद्द्यांवर देखील जास्त भाष्य केलं. राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकरी हवालदील झाला आहे. या भयानक परिस्थितीत शेतकऱ्यांना मदतीची आशा आहे. अशा काळात शेतकऱ्यांना काय-काय मदत करावी, याबाबत मनोज जरांगे पाटील यांनी विविध मागण्या केल्या आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी सरकारकडे ८ मोठ्या मागण्या केल्या आहेत.



■ **संपूर्ण कर्जमाफी ते ७० हजार हेक्टरी भरपाई**

सरकारने येत्या महिन्याभरात दिवाळीपर्यंत हैदराबाद आणि सातारा गॅझेटियर लागू केलं नाही तर जिल्हा परिषद आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करु नका. शेतकऱ्यांच्या मागणी मान्य केल्या नाहीत तर सरकारने जिल्हा परिषद, नगर परिषदेच्या निवडणुका घ्यायच्या नाहीत. आम्ही बॅलेट आमच्या गावात लावू देणार नाही. महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांची कर्जमुक्ती केल्याशिवाय, शंभर टक्के नुकसान भरपाई दिल्याशिवाय आम्ही निवडणुकीची तारीख घोषित करु देणार नाहीत आणि तुम्ही केलीत तर मंत्र्यांना महाराष्ट्रात सभा घेऊ देणार नाहीत, •➤पान २ वर

### अशा आहेत मागण्या

- ओला दुष्काळ जाहीर करा
- ७० हजार रुपये हेक्टरी द्या
- नदीच्या कडेच्या शेतकऱ्यांना १ लाख ३० हजार मदत द्या
- संपूर्ण कर्जमुक्ती करा
- आत्महत्या केली तर शेतकऱ्याच्या कुटुंबाला शासकीय नोकरी द्या.
- शेतकऱ्याला हमीभाव द्या
- शेतीला नोकरीचा दर्जा द्या.
- शेतकऱ्याला पीकविमा द्या

# शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत द्या

## ● उद्धव ठाकरेंनी दसरा मेळाव्यात मागणी

। मुंबई । प्रतिनिधी ।

आजचे मुख्यमंत्री आहेत ते बदलले. आपलं सरकार होतं तेव्हा हेच बोंबलत होते की ओला दुष्काळ जाहीर करा. आता म्हणत आहेत की ओला दुष्काळ ही संज्ञाच नाही. खड्ड्यात घाला तुमची संज्ञा पण शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत झालीच पाहिजे अशी मागणी उद्धव ठाकरेंनी दसरा मेळाव्यात केली आहे. आपलं सरकार असताना मी कर्तव्य म्हणून शेतकऱ्यांची कर्जमुक्ती केली होती. कालबद्ध स्वरुपात ती पूर्णही केली होती. अजून यांची २०१७ मधली कर्जमुक्ती अजून होते आहे. शेतकरी अजून वाट बघत आहेत की ती कर्जमुक्ती कधी होणार? असंही उद्धव ठाकरे म्हणाले. आपण शेतकऱ्यांना मदत करायला सुरुवात केली होती. पण गद्दारांनी त्यांची राशी पळवल्या आणि सुरत आणि गुवाहाटीला पळाले असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.



जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो भगिनींनो आणि मातांनो, परंपरेप्रमाणे मी सर्वांना विजयादशमीच्या मी सर्वांना शुभेच्छा देतो. जिवाला जीव देणारी माणसं हेच खरं आयुष्यातलं सोनं असतं. काही लोकांना भाजपाने पळवलं. जे पळवलं ते पितळ होतं, सोनं माझ्याकडेच आहे. वाघाचं कातडं पांघरणाऱ्या गाढवाची गोष्ट आपल्याला माहीत आहे. पण बाळासाहेबांची भगवी शाल पांघरणाऱ्या गाढवाचं चित्र मी पहिल्यांदा पाहिलं असं म्हणत उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदे यांचं नाव न घेता टीका केली. तसंच अमित शाह यांचे जोडे त्यांना लखलाभ होवोत असंही उद्धव ठाकरे दसरा मेळाव्याच्या भाषणात म्हणाले.

आज सगळीकडे चिखल झाला आहे, याचं कारण कमळाबाई. स्वतःच्या कारभाराने कमळाबाईने स्वतःचं सगळं चांगलं करुन घेतलं आहे आणि जनतेच्या आयुष्याचा चिखल झाला आहे. शेतकऱ्यांची शेतजमीन वाहून गेली आहे. घरादारांमध्ये चिखल घुसला आहे. शेतकरी जो आपल्याला अन्नधान्य देतो तो विचारतो आहे की आम्ही खायचं काय? एवढंमोठं संकट आपण कधी पाहिलेलं नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

संघाला १०० वर्षे झाली आहेत. ही काही थोडीथोडकी वर्षे नाहीत. संघाच्या शंभरीला गांधी जयंती आहे. हा काय योगायोग आहे का? मला कळत नाही. जशी संघाला १०० वर्षे झाली आहेत. आता लढणारी माणसं आता कमी झाली आहेत. जो लढेल तो तुरुंगात जाईल अशी वाटचाल आणि नीती या सरकारची आहे. सोनम वांगचुक या माणसाने अत्यंत दुर्गम भागात हाडं मोडणाऱ्या थंडीत आपले जवान नीटनेटके रहावेत म्हणून सोलार टेन्कॉलॉजीवर छावण्या बांधून दिल्या. पाण्याचं दुर्भिक्ष्य होऊ नये म्हणून आईस स्तुपाची योजना आणली. त्याने न्याय मिळाला पाहिजे म्हणून आंदोलन सुरु केलं. लेह लडाखसाठी सोनम वांगचुक यांनी उपोषण सुरु केलं. त्यानंतर सगळे पेटले, लेह लडाखमध्ये सुरु झालं. त्यानंतर मोदीबाबांनी त्यांना उचलून रासुका खाली त्यांना अटक केली आणि तुरुंगात टाकलं. मोदींची स्तुती करत होते तोपर्यंत ते देशद्रोही नव्हते. शिष्टमंडळातर्फे ते पाकिस्तानला गेले म्हणून त्यांना देशद्रोही ठरवलं गेलं अशीही टीका उद्धव ठाकरेंनी केली.

### एकत्र राहण्यासाठीच एकत्र आलो आहोत

उद्धव ठाकरे यांनी शिवाजी पार्कवर आयोजित केलेल्या दसरा मेळाव्यात धडाकेबाज भाषण केले. आपल्या या भाषणता त्यानी राज ठाकरेंसोबतच्या युतीवर भाष्य केले. ङ्गङ्गअनेकांना प्रश्न पडला आहे की, मी आता पुढचा कार्यक्रम काय देणार. अनेकांना प्रश्न पडलाय की राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार का? अरे मग ५ जुलै रोजी आम्ही काय केलं होतं? मी तेव्हाच बोललेलो आहे की आम्ही एकत्र राहण्यासाठीच एकत्र आलो आहोत,फ्फ असे मोठे विधान उद्धव ठाकरे यांनी केले.

### हात जागेवर ठेवणार नाही

तसेच जिथे कोणी माझ्या मातृभाषेचा घात होत असेल तिथे मी मराठी माणसात फूट पडू देणार नाही. मराठीवर हिंदीची सक्ती मी खपवून घेणार नाही. आमचा हिंदीला विरोध नाही. पण हिंदीची सक्तीही आम्ही खपवून घेणार नाही. भाषावार प्रांतरचना झाली. यानुसार गुजराती लोकांना गुजरात मिळाले. तसेच मराठी भाषकांना महाराष्ट्र मिळाला. ही मुंबई मराठी माणसाने रक्त सांडवून मिळवलेली आहे. ही मुंबई व्यापाऱ्यांच्या खिशात जात असेल तर आम्ही हा खिसा फाडून मुंबई राखल्याशिवाय राहणार नाहीत, असा हल्लाबोल उद्धव ठाकरेंनी केला. तसेच तुमच्यात हिंमत असेल तर मराठीला हात लावून दाखवा. हात जागेवर ठेवणार नाही, असा थेट इशाराच उद्धव ठाकरे यांनी दिला आहे.

# बीएसएलएलने रौप्य महोत्सव जल्लोषात केला साजरा

। पनवेल । प्रतिनिधी ।

भारत संचार निगम लिमिटेडने आपल्या रौप्य महोत्सव आणि दिनाचा भव्य उत्सव संपूर्ण भागात मोठ्या उत्साहात आणि सहभागात साजरा केला. हा उत्सव दूरसंचार क्षेत्रात देशाच्या सेवेत २५ यशस्वी वर्षांची पूर्ती दर्शवणारा होता.

या दिवशी कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपण मोहिमेने झाली, ज्यातून बीएसएलएलच्या हरित आणि शाश्वत भविष्यासाठीच्या बांधिलकीचा पुनःसंवाद झाला. कर्मचारी आणि मान्यवरांनी उत्स्फूर्तपणे रोपे लावण्यात सहभाग घेतला, जे विकास आणि पर्यावरणावरील जबाबदारीचे प्रतीक होते. बीएसएलएलच्या सेवा आणि त्याच्या स्वदेशी ओळखीबाबत जनजागृती करण्यासाठी एक बाइक रॅली आयोजित करण्यात आली होती. यामधून बीएसएलएलकडून दिल्या जाणाऱ्या विश्वासार्ह आणि परवडणाऱ्या दूरसंचार सेवांचा प्रचार करण्यात आला. विशेष समारंभात, एंटरप्राइज बिझनेस ग्राहक आणि टेलिकॉम इन्फ्रास्ट्रक्चर प्रोव्हायडर्स यांना त्यांच्या सातत्यपूर्ण विश्वास आणि भागीदारीबद्दल सन्मानित करण्यात आले. त्यांनी च्या दूरसंचार प्रणालीला बळकटी देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या उत्सवात रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांनी गाणी, नृत्ये आणि नाट्यप्रकार सादर करून कार्यक्रमात उत्साहाची रंगत वाढवली. या प्रसंगी अधिकाऱ्यांनी ग्राहक, भागीदार आणि कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले आणि बीएसएलएलला भारताच्या दूरसंचार क्षेत्रातील एक विश्वासार्ह नाव बनवण्यासाठी दिलेल्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी बीएसएलएल मोबाईल आणि एंटरप्राइज सोल्यूशन्सच्या माध्यमातून सेवा अधिक विस्तारण्याच्या च्या दृष्टीकोनावर भर दिला आणि डिजिटल इंडियाच्या स्वप्नात योगदान देण्याचे उद्दिष्ट सांगितले. रौप्य महोत्सवाचा समारोप देशातील जनतेची अधिक निष्ठेने, नवकल्पनांनी सेवा करण्याच्या नव्या संकल्पाने करण्यात आला.



# डम्पर, टेम्पो अपघात दोघांचा मृत्यू

## ● उरण-बेलापूर मार्गावरील घटना, चालकावर गुन्हा

। पनवेल । प्रतिनिधी।

रस्त्यावर उभ्या असलेल्या डम्परवर भरधाव वेगातील टेम्पो धडकल्याने झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. उरण-बेलापूर मार्गावर बुधवारी पहाटे ही घटना उलवे येथे घडली. या अपघातप्रकरणी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रत्नागिरीतून भिवंडीकडे निघालेला टेम्पोला पहाटे पावणे पाचच्या सुमारास उरण-बेलापूर मार्गावरील उलवे येथे अपघात झाला. रस्त्यालगत उभा असलेला डम्पर टेम्पो चालकाला दिसला नसल्याने हा अपघात झाला. अपघातात टेम्पोचा चालक उमेश उतेकर, पवार दोघेही केबिनमध्ये चिरडले गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच उलवे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी अग्निशमन दलाच्या मदतीने दोघांचे मृतदेह बाहेर काढले. या प्रकरणात उलवे पोलिसांनी डम्पर चालकाला नोटीस बजावून सोडले आहे.

# म्हसळ्यात अतिवृष्टीमुळे खरीपाची नासाडी

। म्हसळा । प्रतिनिधी ।

मान्सूनच्या काळात जुन ते ऑक्टोबर दरम्यान शेतात पिकणारी खरीप पिके ह्या वर्षी पेरणीपूर्व पाऊस आणि अतिवृष्टीमुळे शेतात पिकलेले धान्य जाळून,गळून गेले आहे.अतिवृष्टीने शेतात पाणी साचले असल्याने पिक सडत आहे. त्यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.



घाटमाथ्यावर पावसाने थैमान घालुन शेतीचे नुकसान केले आहे. त्याच पद्धतीने कोकणात सातत्याने पाऊस पडत असल्याने खरीप पिकांची मोठ्या प्रमाणावर नासाडी झाली आहे. शासनाने नासाडी झालेल्या शेतीचे रितसर पंचनामे करून शेतकरी राजाला नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात येत आहे.

यावर्षी तालुक्यात माहे मे महिन्यात पावसाळा सुरू झाल्याने शेतात पेरलेल्या बियाण्याची नीट उगवण झाली नाही. त्यातच उगवलेले पीक लावणी करून झाल्यावरही मुसळधार पावसाने उगवण झालेले व कापणीला आलेले पीक शेतातील साचलेल्या पाण्यात सडून जात असल्याचे आढळून येत आहे. अतिवृष्टीने शेतात पिकलेले धान्य गळून आणि शेतातील पाण्यात सडून जात असल्याने या वर्षी शेतकरी राजाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

म्हसळा तालुक्यात वर्कस जमिनीत शेतकरी मोठ्या प्रमाणात नाचणी, वरी, भात पिके आणि काही प्रमाणात शेतातील बांधावर तूर व कडधान्य पीक घेतात.

यावर्षी मान्सून पूर्व पाऊस आणि अतिवृष्टीमुळे शेतात पाणी साचले असल्याने पिकलेले धान्य गळून पडले आहे तसेच ते पाण्यात सडून जात असल्याने शेतकरी राजा हवालदिल झाला आहे.

# साडेतीन लाखांच्या दागिन्यांवर डल्ला

। पनवेल । प्रतिनिधी ।

नांदेड-मुंबई असा खासगी बसने प्रवास करणाऱ्या एका तरुणाची सोन्याचे दागिने ठेवलेली बॅग प्रवासादरम्यान चोरी झाली आहे. ज्यावेळी हा तरुण प्रवासी उतरला त्या वेळेस त्याला याची माहिती मिळाली. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. ३० वर्षीय हा प्रवासी मुंबई येथील भायखळा येथे राहणार आहे. कामोठे पोलिसांनी तक्रार नोंदविल्यानंतर संबंधित प्रवासी येत असलेल्या मार्गि करीत जेथे बस थांबली त्या थांब्यांचा बसमधून उतरलेल्या प्रवाशांची माहिती घेण्यास सुरुवात केली आहे.

# रस्त्यावरून चालणाऱ्यांच्या सोनसाखळ्या हिसकावल्या

। पनवेल । प्रतिनिधी।

पनवेल परिसरात रस्त्यावरून चालणे महिलांना धोकादायक ठरत आहे. एकाच दिवशी करंजाडे आणि खारघर येथे दोन महिला चालत जात असताना चोरट्यांनी सोनसाखळ्या हिसकावल्याची घटना घडली.

करंजाडे वसाहतीमध्ये चालण्यासाठी घराबाहेरील पडलेल्या सेक्टर ४ येथील ५४ वर्षीय महिलेला लुटण्यात आले. दुचाकीवरून हेल्मेट घालून आलेल्या दुकलीने महिलेची ९० हजार रुपये किमतीची सोनसाखळी हिसकावून धूम ठोकली. दुसऱ्या घटनेत खारघर येथील जैन मंदिराजवळ ५५ वर्षीय महिला देवदर्शनानंतर घरी परतत असताना चोराने जोरात हिसका देत सोनसाखळी खेचून पोबारा केला.

तर तिसऱ्या घटनेत एनआरआय पोलीस ठाणे हद्दीत सेक्टर ४८ आणि सेक्टर ५० दरम्यानच्या मार्गावर ६२ वर्षीय महिला रमाबाई माने यांना दुचाकीस्वाराने जोरात धक्का देत पाडले आणि सोनसाखळी चोरण्याचा प्रयत्न केला. या वेळी तुटलेली साखळी घेऊन चोरटा पसार झाला, मात्र माने यांना गंभीर दुखापत झाली आहे.

# भाज्यांचे भाव शंभरी पार

## ● पावसामुळे टंचाई; नोव्हेंबरपर्यंत भाव चढे राहण्याचा अंदाज

। रायगड । प्रतिनिधी ।

सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका राज्यातील भाज्यांच्या पिकांना बसला असून, त्याचा परिणाम थेट किरकोळ बाजारावर दिसून येतो आहे. बाजारातील भाज्यांची आवक लक्षणीय घटल्यामुळे किरकोळ बाजारात दर शंभरी पार गेले आहेत.

विशेषतः पालेभाज्यांचा पुरवठा कमी झाला असून, त्यांच्या भावांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. साधारणतः बाजारात दररोज ६०० गाड्यांची आवक होत असते. मात्र सध्या ही संख्या ४०० ते ४५० गाड्यांपर्यंत घटली आहे. त्यामुळे भाजीपाला उपलब्धतेत तुटवडा निर्माण झाला असून, ग्राहकांना दुप्पटी दराने खरेदी करावी लागत आहे. नवरात्रोत्सवानंतर दर आटोक्यात येतील अशी अपेक्षा होती; मात्र पावसाच्या लहरीपणामुळे भाज्या नासधूस होत असल्याने भाव अधिक वाढले आहेत.

### वाटाण्यात घट

पालेभाज्यांना पावसाचा मोठा फटका बसला आहे. तर फळभाज्यांचे दर तुलनेने स्थिर आहेत. मात्र, गुणवत्तेत घसरण झाली असून, अनेक भाज्या दर्जाहीन अवस्थेत बाजारात येत आहेत. यामध्ये नाशिक, सातारा, नगर, पुणे आणि गुजरात येथून येणाऱ्या भाज्यांची मोठी आवक होत असली तरी संततधार पावसामुळे त्या भाज्याही खराब होऊन बाजारात पोहोचत आहेत. त्यामुळे वाटाण्याचे दर १२० ते १५० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत.

> “सध्या सुरू असलेल्या पावसामुळे एपीएमसी बाजारात भाज्यांची आवक मोठ्या प्रमाणावर घटली आहे. भाज्या खराब होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे दर वाढले असून नोव्हेंबरपर्यंत ही परिस्थिती कायम राहील, असे भाजी विक्रत्याने सांगितले.”

# अल्पवयीन तरुणी बेपत्ता

। पनवेल । प्रतिनिधी।

पनवेल तालुक्यातील कोळवाडी येथून एक १३ वर्षीय अल्पवयीन मुलगी शाळेत जाते असे सांगून घरातुन निघुन गेली मात्र ती घरी परत न आल्याने अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी तिचे कायदेशीर रखवालीतुन त्याचे संमतीशिवाय फूस लावुन पळवून नेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



राधा साकेत असे या तरुणीचे नाव असून तिचा वर्ण गोरा, उंची ५ फुट, डोळे काळे, केस काळे मध्यम, नाक सरळ, चेहरा उभट, असून तिने अंगात पाढऱ्या रंगाचा हिरव्या रंगाचा कुर्ता नेसलेला आहे. तिच्या बदल कोणाला काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब फड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शाळांमध्ये अडीच हजार केंद्रप्रमुखांच्या होणार नियुक्त्या

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कार्यरत आणि प्रशिक्षित पदवीधर असलेल्या शिक्षकांपैकी तब्बल दोन हजार ४१० शिक्षकांची विविध शाळांमध्ये समूह साधन केंद्र समन्वयक म्हणून नियुक्ती केली जाणार आहे.

या नियुक्तीसाठी शिक्षकांना केंद्रप्रमुखाच्या पदांसाठी केंद्रप्रमुख मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल. केंद्रप्रमुखांच्या नियुक्तीसाठीची ही परीक्षा राज्य परीक्षा परिषदेकडून आयोजित केली जाणार असून, ती १ ते ५ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. यासाठी इच्छुकांना ८ ते १८ ऑक्टोबरदरम्यान शिक्षक परिषदेच्या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावी लागेल. तसेच जे नवीन उमेदवार असतील त्यांना नोंदणीसाठी २५ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत अर्ज करता येतील.

केंद्रप्रमुखांच्या नियुक्त केल्या जाणाऱ्या जागांमध्ये ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यांमध्ये एकूण २४३ शिक्षकांचा समावेश असून, यात उमेदवार उर्दू माध्यमांच्या शाळांतील असल्याची माहिती परीक्षा परिषदेकडून देण्यात आली. केंद्रप्रमुखांच्या पदासाठी शिक्षक हे जिल्हा परिषदेच्या शाळेतील असणे आवश्यक आहेत. तसेच त्या शिक्षकाने आपल्या मूळ व्यावसायिक पात्रता आणि शिक्षकांसोबत कोणत्याही विद्यापीठाची बी. ए., बीकॉम, बीस्सी आदी पदवी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

### २०० गुणांची परीक्षा

केंद्रप्रमुखांची परीक्षा ही १ ते ५ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. ही परीक्षा एकूण २०० गुणांची आणि तितकेच प्रश्नसंख्येच्या आधारावर असेल. यात बुद्धिमत्ता व अभियोग्यता या विषयासाठी १०० गुण असतील. तसेच शालेय शिक्षणातील नियम, शैक्षणिक नवविचार प्रवाह यामध्ये शिक्षण क्षेत्रातील कार्य करणाऱ्या संस्था, संघटना, अभ्यासक्रम व मूल्यमापन, अध्यापन पद्धती, माहितीचे विश्लेषण व मूल्यमापन संप्रेषण कौशल्य आदी अनेक विषय यात असतील.

पान १ वरून

## विसर्जन सोहळा उत्साहात

पैठणीसारख्या स्पर्धा घेण्यात आल्या.

काही ठिकाणी जाखडी हे पारंपरिक नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. त्यामुळे दहा दिवस मंगलमय वातावरणात हा सोहळा पार पडला. दरम्यान अतिवृष्टी झाल्याने अनेकांच्या आनंदावर विरजण ही पडले. तरीदेखील त्यावर मात करीत पावसापासून बचाव करण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. गुरुवारी (दि.०२) ऑक्टोबरला दुर्गा विसर्जनासह विजयादशमी(दसरा) साजरा आला. सकाळी विधीवत पूजा करून नवनवीन कपडे परिधान करून देवीची आरती घेण्यात आली. त्यानंतर स्थापन केलेले घट काढण्यात आले. सायंकाळी दुर्गा मूर्तीच्या विसर्जनाची तयारी करण्यात आली. गावासह शहरी भागातून देवीच्या मूर्तीची खालूबाजासह ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत अनेकांनी सहभागी होऊन आनंद साजरा केला. दरम्यान सायंकाळी पाच नंतर ढगाळ वातावरण सुरु झाले. सहानंतर पावसाने जोरदार सुरुवात केली. त्यामुळे मिरवणुकीच्यावेळी अनेकांची धावपळ उडाली. अखेर पावसात भिजत अबालबृध्द मिरवणुकीत सहभागी होऊन नाचत होते. एक हजार ३८७ दुर्गा मूर्ती आणि १९२ प्रतिमांचे विसर्जन नदी, तलाव, समुद्रात रात्री उशीरापर्यंत करण्यात आले. काही ठिकाणी सायंकाळ साडेसात वाजेपर्यंत विसर्जन झाले. तर काही ठिकाणी रात्री दहापर्यंत विसर्जन करण्यात आले.

## आता दुकाने राहणार २४ तास सुरु

मनोरंजनाच्या किंवा करमणुकीच्या इतर जागा व त्यांच्याशी संबंधित किंवा बाबींकरीता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्रात हा नियम लागू करण्यात आला आहे.

दुकाने आठवड्यातील सर्व दिवस धंदा करण्यास खुली ठेवता येणार आहेत. मात्र तरीही प्रत्येक कर्मचाऱ्यास आठवड्यातून २४ तास सलग विश्रांती मिळेल, साप्ताहिक सुट्टी देण्यात येईल, अशी तरतूद कायद्यात करण्यात आली आहे.

## पेझारीत होणार भव्यदिव्य व्यायामशाळा

स्टेजदेखील बांधले जाणार आहे. शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रयत्नाने व पुढाकाराने इमारत बांधण्यात येणार आहे. या कामाचा भूमीपूजन सोहळा दसऱ्याच्या मुहूर्तावर करण्यात आला. पेझारीमध्ये अद्ययावत अशा व्यायामशाळा आणि स्टेजमुळे खेळाडूंना हक्काचे व्यासपिठखुले होणार आहे. स्टेजच्या माध्यमातून अनेक वक्ते तयार होण्याची संधी मिळणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## बाजारात तेजीचे वातावरण

४००हून अधिक दुचाकी खरेदी झाल्याचे दुचाकी विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. दुचाकीबरोबरच चारचाकी वाहनेदखील खरेदीवर ग्राहकांनी कल दिला असल्याचे पहावयास मिळाले. यंदा मात्र ८०हून अधिक चारचाकी वाहने खरेदी झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. सुझुकी कंपनीची ५० हून अधिक वाहने खरेदी झाली आहेत. यावर्षी ग्राहकांकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही, असे दुचाकी विक्रेते त्यागी यांनी सांगितले.

## शेतकऱ्याला हवा महिन्याला १० हजार पगार

असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

मागण्या दिवाळीपर्यंत पूर्ण केल्या नाहीत तर आपण सर्व शेतकऱ्यांना धाराशिव किंवा बीड जिल्ह्याच्या सीमेवर बोलवू किंवा जालना, संभाजीनगर, जळगाव, बुलढाणामध्ये बैठकीला बोलवू. किती तारखेला आंदोलन सुरु करायची ते ठरवू. आधी बैठक घेऊ आणि नंतर आंदोलन सुरु करु. शेतकऱ्यांना न्याय देईपर्यंत मागे हटायचं नाही, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

# ग्रामीण भागाला ‘उमेद’ मात्र शहरातील बचतगट ‘नाउमेद’

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर तालुक्यातील कोंढवी आणि देवळे जिल्हा परिषद प्रभागांमधून पोलादपूर ग्रामपंचायतींचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्यानंतर आधीच्या ग्रामपंचायतकाळातील महिला बचतगटांची अवस्था वाऱ्यावर सोडल्यासारखी झाली. साधारणपणे २५० हून अधिक महिला बचतगट असलेल्या पोलादपूर शहरातील महिलांना उमेद सारख्या योजनांपासून वंचित राहावे लागल्याने नाउमेद व्हावे लागले आहे.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि एचडीएफसी बँकेने पोलादपूर शहरातील महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न केले आहेत. आता महिला आर्थिक विकास मंडळ महाराष्ट्र म्हणजेच माविमंकडून दूर्लक्ष होत असताना महिलांची पुन्हा मोट बांधून महिला बचत गट आणि स्वयंसहायता गटाची रचना करण्याची गरज निर्माण झाली आहे. पोलादपूर येथील रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत या महिला स्वयंसहायता बचतगटाची बँकेची खातेपुस्तके असत. यामुळे या बचतगटांची नोंदणी असल्याचे मानले जात होते. मात्र, कोंढवी जिल्हा परिषद प्रभागातून पोलादपूर शहर वगळले जाऊन ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्यानंतर महिला बचत गटांची घडी विस्कटली.

पोलादपूर नगरपंचायत हद्दीतील महिला बचतगट आणि स्वयंसहायता गटांना उमेद सारख्या संस्थेकडून अर्थ सहाय्य मिळणार नसताना नाउमेद होण्याची वेळ ओढवली आहे. मात्र, महिला आर्थिक विकास मंडळ महाराष्ट्र म्हणजेच ममाविमंफ्कडून जर आर्थिक पाठबळ मिळाल्यास पोलादपूर शहरातील महिलांना पुन्हा नव्याने उभारी घेण्याची संधी आहे. पोलादपूर शहरातील हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे सभागृहाच्या तळमजल्यावर आपला दवाखाना सुरू असून या शेजारच्या गाळयांना महिला बचतगटांच्या उत्पादनांची बाजारपेठ मानले गेले आहे. मात्र, त्यानंतर नगरपंचायतीचा कारभार सुरू झाल्याने या गाळयांना बचतगटांची उत्पादने भेटू शकली नाहीत.

पोलादपूर शहरात आतापर्यंत कापडी व कागदी पिशव्या, दिवाळी फराळ आणि एलईडी बल्ब निर्मितीचा प्रयत्न महिला बचतगटांच्या माध्यमातून झाला आहे. मदिशा ग्रुपफ्सारख्या महिला सामाजिक संघटनांनी या वस्तूंना बाजारपेठही मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. जनशिक्षण संस्थान सारख्या संस्थेने महिलांना प्रशिक्षित करून प्रोत्साहन देण्याचा प्रयत्नही सुरू केला आहे.

आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त २४ फेब्रुवारी १९७५ रोजी महाराष्ट्र शासनाकडून महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने माविमंला बचत गटांच्या माध्यमातून विविध महिला सबलीकरणाच्या योजना राबविण्यासाठी नोडल संस्था म्हणून जाहीर केले आहे. मानवीय भांडवलात गुंतवणूक आणि महिलांचे क्षमता संवर्धन करून, याप्रमाणे महिलांना आर्थिक आणि सामाजिक दृष्टया सबल करणे तसेच त्यांना उपजिविकेचे शाश्वत साधन उपलब्ध करून देऊन लिंगभेद नष्ट करणे आणि महिलांना समान न्याय मिळवून देणे, बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे व्यवस्थापन करणे, महिलांच्या एकंदर क्षमतांचे संवर्धन करणे, महिलांमधील आत्मविश्वास वृध्दीगंत करणे, महिलांचा उद्योजकीय विकास करणे, रोजगाराच्या संधी आणि बाजारपेठांमध्ये समन्वय निर्माण करणे, समान संधी व समृध्दता आणि शासनामध्ये महिलांनी स्वत:हून सहभाग घ्यावा याकरिता त्यांना प्रोत्साहन देणे, शाश्वत विकासाचा मार्ग म्हणून स्वयंसहायता बचतगटासोबत तळागाळात काम करणाऱ्या संस्था निर्माण करणे, अशी माविमंची उद्दीष्टे आहेत.

आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरण हातात हात घालून चालते. मायक्रो-फायनान्सची व्याख्या गरिबांसाठी आर्थिक सेवा अशी केली जाते. नेमक्या याचसंदर्भात चर्चा करीत एका कथित समाजसेवकाने दिव्यांग महिला कार्यकर्तीच्या आणि कल्याण येथील एका महिलेच्या माध्यमातून रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि एचडीएफसी बँकेने पोलादपूर शहरातील महिला स्वयंसहायता बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी केलेले प्रयत्न अल्पकर्ज मिळवून देण्याच्या आविर्भावात सपशेल फोल ठरवित लाखोंचा मलिदा खात भामटयांच्या शहरात पलायन केल्याची चर्चा आहे.

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# निवडक



## बालविवाह विरोधी मोहिमेची सांगता

**पेण** : नवरात्री उत्सवाचे औचित्य साधून 'उत्सव नवरात्रीचा जागर नारी शक्तीचा' या अंतर्गत बालविवाह विरोधी जनजागृती मोहिमेची सुरूवात २२ सप्टेंबर रोजी करण्यात आली होती. त्याची सांगता बुधवारी (दि.१) विराणी वाडी येथे पोलीस निरिक्षक संदिप बागुल यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली. या मोहिमेसाठी गेली दहा दिवस पोलीस उपनिरिक्षक विक्रम नवरखेडे, पोलीस हवलदार किशोर घरत, दामिनी पथक, सामाजिक कार्यकर्ते संदिप वाघ, नरेश कडू, नगरसेवक तथा शांतता कमिटी सदस्य संतोष पाटील, शांतता कमिटी सदस्य अमोल घोटणे, पत्रकार अनिस मनियार, राजेश कांबळे यांनी विशेष मेहनत घेतली. दहा दिवसांत पेण तालुक्यातील ३६ आदिवासी वाडींमध्ये जाऊन बालविवाह विरोधी जनजागृती केली. यामध्ये पोलीस उपनिरिक्षक विक्रम नवरखेडे, संतोष पाटील व संदिप वाघमारे यांनी मार्गदर्शन केले.



## शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा

**दिघी** : मागील तीन दिवसांतील वादळी पावसाच्या संकटाने श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन व कोंडेपंचतन येथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे अडचणीत सापडलेला शेतकरी नुकसान भरपाईच्या प्रतिक्षेत आहे. शासनाच्या निर्देशाने श्रीवर्धन प्रशासनाकडून तातडीने भातशेतीचे पंचनामे करण्यात यावे. मात्र, अद्याप पंचनामे झाले नसल्याने मदत कशी मिळणार, या चिंतेत शेतकरी सापडला आहे. बोर्ली परीसरातील तयार झालेले भातपीक पुर्णपणे पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे झालेले नुकसान याची माहीती अद्याप प्रशासनाला मिळाली नसल्याची माहिति शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. यावेळी परतीच्या पावसाने हातातोंडाशी आलेले पीक संपुर्णपणे वाया गेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची पाळी येणार असून उन्हाळ्यात गुरांच्या चाऱ्या अभावी गुरे कशी जगवायची हा प्रश्नसुध्दा शेतकऱ्यांना पडला आहे. शेतकऱ्यांची अवस्था यावेळी खुपच बिकट बनली असल्याने त्यांना या अवस्थेत आधार मिळावा म्हणून झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून भरपाई मिळावी, अशी मागणी करण्यात येत आहे.



## शिवरायांचा पद्मदुर्ग किल्ला दुर्लक्षित

**आगरदांडा** : ३५० वर्षांपुर्वी उन्मत्त झालेल्या सिद्दीला नामोहरम करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्यासह जिगरबाज मावळ्यांनी मुरुड समुद्रकिनारा पासून पद्मदुर्ग किल्ल्याची निर्मिती केली होती. परंतु, पुरातत्व विभागाने या किल्ल्याकडे दुर्लक्ष केले आहे. समुद्राच्या लाटेने या किल्ल्याच्या भिंतीची पडझड सुरू आहे. याकिल्ल्याची अवस्था बिकट झाली असून महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांना या किल्ल्याकडे लक्ष देता येत नाही. जतन व संवर्धन करिता निधी ही उपलब्ध करून दिली जात नाही. समुद्रात काही अंतरावर असणाऱ्या जंजिरा किल्ला संवर्धन आणि जतन करण्या करिता निधी उपलब्ध करून दिला जातो. या निधीतून दर वर्षी या किल्ल्याची पुरातत्व विभागाकडुन स्वच्छता व जतन संवर्धन केले जाते. परंतु, शिवरायांच्या पद्मदुर्ग किल्ल्याकडे दुर्लक्ष होत असल्याने मुरूड पद्मदुर्ग जागर व गड भ्रमण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आशिलकुमार ठाकुर यांनी नाराजी व्यक्त केली आहे.



## नवी मुंबई विमानतळ उद्घाटनाची लगबग

**पनवेल** : देशातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन बुधवारी (दि.८) सायंकाळच्या सुमारास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या सोहळ्यासाठी केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री तसेच राज्यातील अनेक मंत्री उपस्थित राहणार असून कार्यक्रमासाठी भव्य तयारी सुरू आहे. सिडको महामंडळाने उद्घाटनापूर्वी शहराचे सौंदर्य आणि सोयीसुविधा वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावरील खड्डे बुजवून डांबरीकरण करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून पुढील सहा दिवसांत ही कामे पूर्ण करण्याचे आदेश उच्च स्तरावरून देण्यात आले आहेत. तसेच, दुभाजक स्वच्छ करून रंगकाम, हिरवळीसाठी रोप लागवड आणि अनधिकृत ढाबे-हॉटेल्स हटवण्याची मोहीम राबवली जात आहे. उद्घाटस्थळी सुमारे ५ हजार लोकांसाठी भव्य मंडप उभारला जाणार आहे. पार्किंग, येण्या-जाण्याची व्यवस्था आणि पाहुण्यांसाठी सुविधा याबाबत सिडको आणि स्थानिक प्रशासन बैठकांद्वारे नियोजन करत आहे.सुरक्षेच्या दृष्टीन नवी मुंबई पोलीस दलासह सिडकोचा दक्षता विभाग, वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभाग संयुक्तरित्या कार्यरत आहेत. याशिवाय विमानतळ प्रकल्पात योगदान देणाऱ्या माजी सनदी अधिकाऱ्यांनाही या समारंभात विशेष सन्मान देण्यात येणार आहे.

# 'जलजीवन'ची बिले रखडली

■ कामांचा वेग मंदावला
■ ठेकेदार आर्थिक अडचणीत

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून खालापूर तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत ९२ पाणीपुरवठा योजनांची कामे मंजूर असून त्यापैकी ३४ पाणी योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. तर, उरलेल्या ५८ योजनांची कामे वर्षअखेर पूर्ण करण्यासाठी ठेकेदार प्रयत्न करीत आहेत. केलेल्या खर्चाच्या प्रमाणात देयके मिळत नसल्याने ठेकेदार प्रचंड आर्थिक संकटात आहेत. त्यामुळे कामांचा वेग मंदावला आहे. तर, रखडलेल्या पाणी योजनांचे काम पूर्ण करून घेण्यासाठी पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंत्यांची धावपळ सुरू आहे.



जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर जल' ही योजना सध्या ग्रामीण भागात राबवण्यात येत आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील घराघरापर्यंत पाणी पोहचवण्यात यावे, हा सरकारचा हेतू आहे. खालापूर तालुक्यातील ९२ पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी ठेकेदार आणि कंत्राटदारांनी काम सुरू केले आहे. यामधील तोंडली, शेणगाव, चिलठण, रानसई, तांबाटी, खरवई, जाबरुंग, आंबिवली, होनाड, उंबरविरा, नडोदे, दुरशेत, हाळखुर्द, होराळे, मोरबे, डोलवली व माणकिवली, बोरगाव खुर्द, उजलोळी, वणी, वारद, गोहे, अजिवली, पाली बुद्रुक, कलोते मोकाशी, वनवटे, अंजरूण, वयाळ, कलोते रयती, स्वाली, कांढरोली तर्फे वनखळ, तुकसई, चिंचवली गोहे, आसरे, केळवली या ३४ गावांच्या पाणी योजना पूर्ण झाल्या आहेत. उर्वरीत ५८ योजनांचे काम प्रगतीपथावर आहे. केलेल्या खर्चाच्या प्रमाणात देयके मिळत नसल्याने ठेकेदार प्रचंड आर्थिक संकटात आहेत. पावसाळ्यानंतर पाणीयोजना पूर्ण करून घेण्यासाठी खालापूर ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग उपअभियंता संतोष चव्हाण सातत्याने ठेकदारांकडे पाठपुरावा करीत आहेत. परंतु, केलेल्या खर्चाच्या प्रमाणात देयके मिळत नसल्याने कामांचा वेग मंदावला आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर रखडलेली बीले मिळत नसल्यामुळे दिवाळी साजरी कशी करायची अन् उर्वरीत विकासकामे कशी पूर्ण करायची? असा प्रश्न ठेकेदारांना पडला आहे.

### निधीअभावी रखडेल्या ५८ पाणी योजना

आसरोटी, चांभार्ली, गोठीवली, इसांबे, खरीवली, माडप, नारंगी, निगडोली, परखंदे, वावोशी, नावढे, सारंग, विणेगाव, तळाशी, आंबेवाडी (वरोसे तर्फे वनखळ), कोपरी आंबेमाळवाडी, कुंभिवली, घोडीवली व कांढरोली, चावणी, आडोशी, बीड खुर्द, भिलवले, ढेकू, डोणवत, गोरठन खुर्द, हातनोली, जांभिवली तर्फे छत्तीशी, करंबेळी, खानाव, माजगाव, मांदाड आत्करगाव, नंदनपाडा, पराडे, पौद, साजगाव, सावरोली निफान, सावरोली, शिरवली, टेंभरी, ठानेन्हावे व सांगडे, तुपगाव, उंबरे, उसरोली, वड्विहीर, वटखांबे, वांगणी कारगाव, सोंडेवाडी, वावंढळ, सारसन, धामणी, खांबेवाडी, वडवळ, वावरले, खरसुंडी, गोरठन बु., आपटी, चिंचमाळ.

# चौल-आग्राव रस्ता खड्ड्यात

### स्थानिकांचा जीव मुठीत घेऊन प्रवास

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चौल-आग्राव मार्गाची दयनिय अवस्था झाली आहे. रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाळ्यामुळे हा रस्ता पूर्णपणे उद्ध्वस्त झाला असून नागरिक, विद्यार्थी, गरोदर महिला व रुग्णांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.



मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत चौल-आग्राव रस्त्याच्या दुरुस्तीचे काम मंजूर करण्यात आले होते. परंतु, सहा महिने उलटले तरी या कामाला सुरुवात झाली नाही. उलट, याआधी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही दोन वर्षांत अवघे तीन किमी काम पूर्ण झाले आहे. उरलेले काम ठेकेदार-सरकारी अधिकाऱ्यांच्या आळशीपणा व भ्रष्टाचाराच्या खाईत गडप झाल्याचे बोलले जात आहे. याबाबत ग्रामस्थांनी महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास अधिकाऱ्यांकडे जाब विचारला. परंतु, उत्तराऐवजी विलंबाचा बहाणा देण्यात आला. त्यामुळे नागरिक संतप्त झाले असून, त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

ग्रामस्थांमध्ये जोरदार चर्चा आहे की, निवडणुकीदरम्यान काही नागरिकांकडून नेत्यांनी पाच वर्षांसाठी त्यांची किंमत ठरवली. परंतु, आमच्या भविष्यासाठी राजकारण्यांनी मोजकिच किंमत लावली, असा उपरोधिक टोमणा जनतेतून उमटला आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या भ्रष्टाचारविरोधी घोषणेची महाराष्ट्र सरकारकडूनच पायमल्ली झाली आहे, असा सूर नागरिकांचा आहे. तसेच, सार्वजनिक बांधकाम विभाग भ्रष्टाचाराच्या कचाट्यात अडकलेला आहे. सरकारला जनतेच्या हालअपेष्टांची काहीही पर्वा नाही, अशी चर्चा गावागावांत रंगली आहे. त्यामुळे राज्यातील सरकार फसवे आहे, कोट्यवधी निधी गेला कुठे? अधिकारी कोणाच्या दबावाखाली आहेत? असे थेट प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. राज्य सरकारवरचा विश्वास हरपल्याने आता ग्रामस्थांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीच या प्रश्नात हस्तक्षेप करावा, अशी जोरदार मागणी सुरू झाली आहे.

## खोपोलीत रोजगार मेळाव्याचे आयोजन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

सध्या तरुणाईसमोर रोजगाराचे सर्वात मोठे आव्हान आहे. उच्च शिक्षण पूर्ण करूनही अनेक युवक-युवतींना नोकरीसाठी भटकंती करावी लागत आहे. ग्रामीण व उपनगर भागात तर ही समस्या अधिक तीव्र आहे. रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासन व विविध संस्था प्रयत्नशील आहेत; मात्र, अशा संधी अधिकाधिक तरुणांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी स्थानिक स्तरावर मेळावे आयोजित होणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर खोपोली येथे भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने युवक-युवतींसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा रोजगार मेळावा शनिवारी (दि.४) सकाळी साडेदहा वाजता खोपोलीतील श्री समर्थ मंगल कार्यालयात पार पडणार आहे. या मेळाव्यात १० वी उत्तीर्ण पासून पदवीधर, एम.कॉम, एम.एससी, एम.ए., आयटीआय, डिप्लोमा, अभियांत्रिकी तसेच अन्य शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवार सहभागी होऊ शकतात. रोजगार देणाऱ्या कंपन्यांकडून ऑन द स्पॉट जॉब ऑफर लेटर देखील देण्यात येणार असल्याने हा मेळावा युवकांसाठी मोठी संधी ठरणार आहे. वयोमर्यादा १८ ते ३५ वर्षे अशी निश्चित करण्यात आली आहे. या रोजगार मेळाव्याचे मार्गदर्शन व आयोजन खालापूर शेकाप तालुका चिटणीस किशोर पाटील व शेकाप महाराष्ट्र राज्याचे खजिनदार अतुल नंदकुमार म्हात्रे यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे.

## श्रीकांत देशमुख यांचे निधन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील हातनोली येथील श्रीकांत महादेव देशमुख (५०) यांचे गुरुवारी (दि.२) निधन झाले. शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य, जिल्हा मच्छिमार संघाचे संचालक धनंजय देशमुख यांचे ते धाकटे बंधू तसेच शेकाप रायगड चिटणीस मंडळाचे सदस्य ॲड. परेश देशमुख यांचे ते चुलत भाऊ होतं. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, भाऊ असा परिवार आहे.



श्रीकांत देशमुख हे सामाजिक व इतर क्षेत्रात सक्रीय होते. पाटबंधारे विभागात ते कार्यरत होते. गुरुवारी हातनोली येथील स्मशानभूमीमध्ये दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी तालुक्यातील मराठी समाजाचे नेते मंडळी, किशोर पाटील, संतोष जंगम, भूषण कडव, प्रवीण लाले, जयवंत पाटील, सुधीर ठोंबरे, मोतीराम ठोंबरे, नवी मुंबई महानगर पालिकेतील कर्मचारी, राजकीय, सामाजिक आदी विविध क्षेत्रातील मान्यवर, शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नातेवाईक, मित्र मंडळींनी उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी शोक व्यक्त केला.

## पालीत सोनं लुटण्याची परंपरा

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

विजयादशमीच्या दिवशी पाली येथे श्री बल्लाळेश्वर मंदिर ते गावच्या वेशीपर्यंत परंपरेनुसार सोन लुटण्यासाठी पालखी निघते. ही पालखी सिमौलंघन क्षेत्रात जाऊन तेथे आपट्याच्या वृक्षाचे पूजन करून सोनं लुटले जाते. त्यानंतर पालखी वाजत गाजत मंदिराकडे प्रस्थान करते. त्यावेळी परिसरातील महिला वर्गाकडून पालखीचे पूजन करून दर्शन घेतले जाते. पालखी मंदिराभोवती प्रदक्षिणा घालून लुटलेले सोन श्री बल्लाळेश्वर चरणी अर्पण करून प्रार्थना केली जाते.

## लाडकी बहीण 'ट्रॅफीक'मध्ये अडकली

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांना या योजनेद्वारे दर महिन्याला १५०० रुपयांचा सन्मान निधी दिला जातो. या योजनेतील पारदर्शकता आणि गरजू महिलांनाच लाभ मिळावा यासाठी राज्य सरकारने या योजनेसाठी ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. मात्र, यामुळे अनेक महिला लाभार्थींना मोठ्या तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ई-केवायसीसाठी आवश्यक असलेली वेबसाईट व्यवस्थित चालत नाही. वेबसाईटला 'त्रुटी! आम्हाला जास्त ट्रॅफिक येत आहे. कृपया नंतर पुन्हा प्रयत्न करा', असा मेसेस येत असल्याने लाडकी बहिणीची चिंता वाढली आहे.




त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना वारंवार सायबर कॅफे व आपले सरकार सेवा केंद्रात चकरा माराव्या लागत आहेत. त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहे. या तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आपले सरकार सेवा केंद्राचे मालक मनिष विरुकुड यांनी सांगितले की, रोज २० ते २५ महिलांबरोबर पुरुष देखील ई-केवायसी करण्यासाठी येतात.परंतु, दिलेली वेबसाईट चालत नसल्याने निराश होऊन परत जातात, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# दिबांचे नाव न देण्याचे षडयंत्र

### राजाराम पाटील यांचा आरोप

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सध्या राज्यात नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण हा मुद्दा चांगलाच तापला आहे. प्रकल्पग्रस्तांचे राष्ट्रीय नेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला न देण्यात मोठं राजकीय षडयंत्र असल्याचा आरोप ओबीसी नेते राजाराम पाटील यांनी केला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटीलांचे नाव न दिल्यास अत्यंत आक्रमक व उग्र जन आंदोलन होईल, असा इशारा देखील ओबीसी नेते राजाराम पाटील यांनी दिला आहे.



प्रकल्पग्रस्त, भूमीपुत्रांचे तारणहार, लढवय्ये नेते, संघर्ष योध्ये, माजी खासदार स्वर्गीय लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ व्हावे, अशी जोरदार मागणी नवी मुंबई, रायगड, ठाणे, मुंबईसह राज्यातील भूमिपुत्र करत आहेत. मागील अनेक वर्षांपासून या नामकरणावरून राजकारण सुरू आहे. दि.बा. पाटील यांच्या नावाला स्थानिक भूमीपुत्रांनी पाठिंबा दिला असून राजकीय पक्षांनी देखील समर्थन दिले आहे. मात्र, अद्यापही कोणताही अंतिम निर्णय न झाल्याने जनतेतून नाराजी व असंतोष व्यक्त होत आहे.

पाच वेळा आमदार व दोन वेळा खासदार झालेले लोकनेते दि.बा. पाटील हे ओबीसींचे नेते आहेत आणि आज ओबीसी आरक्षणाचे आंदोलन पेटले आहे. या पाश्वभूमीवर ओबीसी, आगरी, कोळी, कराडी, भंडारी, कुणबी, शूद्र यांच्यावर कायम अन्याय होत आलेला आहे. हाच अन्याय आज दि.बा. पाटील यांच्यावर होताना दिसत आहे. त्यामुळे येथील वातावरण प्रचंड तापले असून पुन्हा फसवणूक होते की काय, अशी भावना जनतेत असून येत्या काळात हे आंदोलन अधिक आक्रमक व उग्र होईल, असा इशारा ओबीसी नेते राजाराम पाटील यांनी दिला आहे. तसेच, दि.बा.पाटील यांचे नाव विमानतळाला देण्यात विलंब होत असून यामागे मोठं राजकीय षडयंत्र असल्याचा आरोप दखील राजाराम पाटील यांनी केला आहे.

## अपदा मित्रांची विनामूल्य सेवा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

आपत्कालीन परिस्थितीत काम करण्यासाठी प्रशासनाच्या सोबत आपदा मित्रांची नियुक्ती करण्यात आली आहे. गाव पातळीवरील वेगवेगळ्या क्षेत्रातील तरुण मंडळी यामध्ये सहभागी झाले आहेत. अतिवृष्टीसह, आपत्कालीन परिस्थितीच्या काळात जीवाची बाजी लावत अपदा मित्र स्वयंसेवक म्हणून विनामूल्य सेवा देत आहेत.

आपत्कालीन परिस्थितीत समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून काम करण्यासाठी स्थानिकांचा हातभार महत्वाचा असतो. चक्री वादळाच्या मोठ्या हानीनंतर स्थानिकांच्या मदतीने आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने अपदा मित्रांची निवड करण्याचा निर्णय घेतला. १८ वर्षांपासून ४० वर्षापर्यंतच्या मंडळींना अपदा मित्रामध्ये सामावून घेण्यात आले. या उपक्रमाला जिल्ह्यातून शेकडो तरुणांचा सहभाग मिळाला. त्यात २५ ते ३० वयोगटातील तरुणांनी सहभाग घेऊन अपदा मित्र होण्याचा निर्णय घेतला. जिल्ह्यात ३०० अपदा मित्रांची निवड करण्यात आली. त्यांना महाड, माणगाव, पनवेल, पेण या ठिकाणी प्रशिक्षण देऊन आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्याचे धडे देण्यात आले आहे. अतिवृष्टीत अथवा अन्य आपत्कालीन परिस्थितीमध्ये प्रशासनासोबत अपदा मित्र विनामुल्य सेवा देण्याचे काम करीत आहेत. गरजूंना मदत करण्याबरोबरच आपद्ग्रस्तांना अधार देण्याचे काम ते करीत आहेत.

## मर्दन गडावर दसरा साजरा

**। उरण । प्रतिनिधी ।**

सह्याद्री प्रतिष्ठान उरण विभागाच्या माध्यमातून आवरे येथील मर्दन गडावर दसरा साजरा करण्यात आला. याप्रसंगी मर्दनगडावरील आई एकविरा मातेच्या मंदिरात देवीची ओटी भरली व पूजन करून महाराष्ट्रावर आलेल्या ओल्या दुष्काळा विरुद्ध लढण्याचे बळ मागितले. 'इडा पिडा टळू दे, बळीचे राज्य येऊ दे' अशी विनवणी करण्यात आली. त्यानंतर गडाच्या परिसरात असलेल्या भगव्या झेंड्याचे व शस्त्रपूजन केले. दुर्ग संवर्धन करण्यासाठी सुबुद्धी दे व सर्व दुर्ग सेवकांचे आरोग्य सुस्थितीत राहो, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### आई फाउंडेशनतर्फे मदतीचे आवाहन | पूरग्रस्तांसाठी आर्थिक, वस्तुरूपाने मदत

# दिव्यांगांचा प्रेरणादाई मदतीचा हात

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी संपूर्ण महाराष्ट्राला माणुसकीचा खरा अर्थ शिकवला आहे. आई फाउंडेशन तर्फे उरण तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांना पूरग्रस्तांसाठी मदतीचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत दिव्यांगांनी आर्थिक व वस्तुरूपाने मदत जमा केली आहे.




पूरग्रस्तांसाठी अनेक सक्षम लोक पुढे येतात; परंतु, स्वतःच्या मर्यादा बाजूला ठेवून जेव्हा एखादा दिव्यांग व्यक्ती इतरांच्या दुःखासाठी पुढाकार घेतो, तेव्हा ती मदत नसून ती एक प्रेरणादायी आदर्शकथा बनते. आई फाऊंडेशन तर्फे उरण तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांना आवाहन करण्यात आले होते की, आपल्या परीने शक्य तितके सहकार्य पूरग्रस्तांसाठी करूया. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत दिव्यांगांनी आर्थिक व वस्तुरूपाने मदत जमा केली आहे. या मदतीतून पूरग्रस्त मुलांसाठी शैक्षणिक साहित्य तसेच महिलांसाठी साड्यांचा समावेश करण्यात आला. ही संपूर्ण मदत आई फाऊंडेशनतर्फे एकत्र करून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या राज्य महीला सचिव व आधार सावली फाऊंडेशनच्या सल्लागार भावना घाणेकर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली आहे. घाणेकर यांनी दिव्यांग बांधवांच्या या सहकार्याचे मनापासून कौतुक केले. त्यांनी सांगितले की, जे स्वतः सक्षम नाहीत त्यांनी पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे करणे ही खरी माणुसकी आहे. हा उपक्रम महाराष्ट्रासाठी आदर्श ठरेल.

या कार्यक्रमात आई फाऊंडेशनचे मदन पाटील व रणिता ठाकूर यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, या मदतीत अशाही काही दिव्यांगांनी सहभाग घेतला ज्यांची आर्थिक आणि शारीरिक परिस्थिती अतिशय कठीण आहे. तरीही त्यांनी माणुसकीची जाण जपत योगदान दिले, हे समाजासाठी प्रेरणादायी आहे. हा उपक्रम यशस्वी करण्याकरिता मदन पाटील, उमेश पाटील, महेश पाटील, रणिता ठाकुर, संदेश राजगुरू, नितीन सांगवीकर, मिल्टन मिरंडा, निशा माने, राजश्री घरत आदी सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले. उरण तालुक्यातील दिव्यांगांनी दाखवलेली संवेदनशीलता आणि मदतीची प्रेरणा संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक नवदिशा ठरणार आहे.

## जालिंदरनगरचा धडा

पुणे जिल्ह्यातील जालिंदरनगर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला जगातील सर्वोत्कृष्ट शाळेचा एक कोटी रुपयांचा पुरस्कार मिळाला आहे. यंदाच्या जूनमध्ये तिची जगातील दहा उत्तम शाळांमध्ये निवड झाली होती. आता अंतिम स्पर्धेमध्ये तिने सर्वोत्तम असल्याचा बहुमान मिळवला आहे. दत्तात्रय वारे या ध्येयवादी शिक्षकांची शाळा म्हणून ही ओळखली जाते. वारे यांच्याच कल्पनेतून ही शाळा उभी राहिली व या योग्यतेला पोचली हे खरे आहे. मात्र स्थानिक गावकऱ्यांच्या सहभागाशिवाय ते शक्य झाले नसते. त्यामुळे खऱ्या अर्थाने हा एक सामुहिक उपक्रम असून सर्व महाराष्ट्राला आदर्श घालून देईल अशी त्याची महत्ता आहे. एरवी जिल्हा परिषद शाळा म्हणजे जेमतेम १५-२० विद्यार्थी, बहुतेक सर्व गरीब घरातले, त्यांचे गणवेश धड नाहीत, शाळेची अवस्था वाईट, रंग उडालेल्या भिंती, शिकवण्यात रस नसलेले शिक्षक असे चित्र समोर येते. पाच वर्षांपूर्वी वारे गुरुजी खेड तालुक्यातील जालिंदरनगर इथे आले तेव्हा तिचीही अवस्था थोडीशी अशीच होती. तिथे जेमतेम पाच-दहा विद्यार्थी होते. वारे गुरुजींनी हे वातावरण बदलण्याचा निर्धार केला. गावकऱ्यांनी शाळेसाठी पाच एकर जमीन दिली. त्यांच्याच श्रमदानातून व सरकारच्या निधीतून नवीन इमारत उभी राहिली. ते करताना सिमेंटच्या भिंतीऐवजी काचेच्या भिंती उभारण्यात आल्या. इतरही अनेक चांगल्या सोयी करण्यात आल्या. पण खरे आव्हान होते ते प्रत्यक्ष शिक्षण आणि शिकवणे बदलण्याचे. मुलांनी नुसते पुस्तकी शिक्षण घेऊ नये, त्यांना आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाचा परिचय व्हावा यादृष्टीने इथे प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना एकीकडे सुतारकाम, प्लंबिंग अशी कौशल्ये शिकवण्यासोबतच दुसरीकडे रोबोटिक्स, कोडिंग अशा संगणकातील अत्याधुनिक गोष्टींचीही ओळख करून देण्यात आली. अनेक भाषा शिकवण्याची सोय करण्यात आली. त्यातून इथे जे काही घडले ती निव्वळ क्रांती आहे. शिवाजीमहाराज अशीच अमुचि आई असती, असे म्हणाले अशी दंतकथा आहे. त्या धर्तीवर जालिंदरनगरची शाळा पाहून अशीच आमची शाळा असती तर आम्हीही जगात मोठे इंजिनिअर किंवा उद्योगपती झालो असतो असे तमाम सर्व पालकांना वाटल्याखेरीज राहणार नाही.

### गावकऱ्यांचाही सहभाग

या शाळेमध्ये केवळ विविध विषयच नव्हे तर चांगले नागरिक बनण्याचेही प्रशिक्षण दिले जाते. सकाळी नऊ वाजता शाळा भरली की मुलेमुली झाडू घेऊन स्वतःच सगळी स्वच्छता करतात. अंगण झाडणे, काचा पुसणे, इतकेच काय शाळेचे संडास व बाथरूम साफ करणे हेही शिक्षक आणि मुले मिळून करतात. यामुळे ही आपली शाळा आहे व ती स्वच्छ ठेवली पाहिजे असा संस्कार त्यांच्यावर होतो. शाळेची सर्व जबाबदारी मुलांची असते. त्यासाठी आरोग्यमंत्री, सफाईमंत्री, शिक्षणमंत्री, अन्नपुरवठामंत्री निवडण्यात आले असून त्यांच्यावर त्या त्या गोष्टींची जबाबदारी देण्यात आली आहे. विषय शिकवण्यासाठी विद्यार्थ्यांचे गट केले जातात. वरच्या वर्गातील मुले लहानांना मदत करतात. एआय, चॅटजीपीटी यांचा वापर केला जातो. शिवाय शिक्षक असतातच. दुपारी जेवणाच्या सुट्टीनंतर मुलांना अर्धा तास झोपण्यासाठी दिला जातो. त्यामुळे ती दिवसअखेरपर्यंत ताजीतवानी राहतात. यामुळे काही मुलांनी अचाट प्रगती साधली आहे. एका आठ वर्षांच्या मुलाने रोबो तयार केला आहे. काही मुली जपानी तसेच फ्रेंच भाषा शिकल्या आहेत. काही जणी कन्नड, मल्याळमही शिकल्या आहेत. एकूण बावीस प्रकारच्या कौशल्ये इथे शिकवली जातात. शाळा मराठी माध्यमाची असली तरी तिथे इंग्रजीही पहिलीपासून शिकवले जाते. विविध प्रकारची कौशल्ये, तंत्रज्ञान व भाषांचा परिचय यामुळे ही मुले जगाशी जोडली जात आहेत. उद्या दहा वर्षांनी ती पदवी घेऊन बाहेर पडतील तेव्हा जगात आपले स्थान निर्माण करायला ती पूर्ण सज्ज झालेली असतील. जालिंदरनगर हे आदिवासी पट्ट्यातील खेडे आहे. शेती हाच गावातला मुख्य व्यवसाय आहे. या गावातील विद्यार्थ्यांचा जगाशी थेट संपर्क जोडून देण्याच्या शिक्षकांच्या प्रयत्नाचे कौतुक करावे तितके थोडे आहे. विशेष म्हणजे शिक्षकांच्या या कल्पनेला गावकऱ्यांनी दिलेली साथ मोलाची ठरली.

### राज्यभर अनुकरण व्हावे

यापूर्वी सोलापूर जिल्ह्यातील डिसलेगुरुजींची शाळा अशाच रीतीने प्रकाशात आली होती. तिचा व गुरुजींचा असाच गौरव झाला होता. जिल्हा परिषद शाळांमधील काही शिक्षक अशा रीतीने पुढाकार घेऊन काही ना काही उपक्रम करीत असतात. मात्र डिसले किंवा जालिंदरनगरच्या वारे गुरुजींना मिळणारी प्रसिद्धी पाहून अनेकांच्या पोटात दुखू लागले व त्यांची बदनामीही भरपूर झाली. या दोघांची अन्यत्र बदली करणे किंवा त्यांच्याविरुध्द चौकशा लावणे असे प्रकार घडले. राज्य सरकार तसेच स्थानिक आमदार इत्यादींनी खरे तर अशा उपक्रमांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहायला हवे. असे उपक्रम सर्वत्र राबवायला हवेत. डिसले किंवा वारे यांच्या कामात काही त्रुटी असतील तर त्यावर बोट ठेवायला हरकत नाही. त्यात सुधारणाही सुचवता येऊ शकतात. पण बदल घडवून आणण्याची त्यामागची प्रेरणा मरू नये याची काळजी घ्यायला हवी. अन्यथा असे नवीन प्रयोग करायला कोणी धजावणारच नाही. आज शहरांपासून ते खेड्यांपर्यंत लोकांचा सरकारी शिक्षणावरचा विश्वास उडाला आहे. त्यामुळे खासगी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पेव फुटले आहे. गावात धड रस्ता नसेल. पण इंग्रजी शिकवणाऱ्या केजी शाळा मात्र जागोजागी दिसू लागल्या आहेत. वास्तविक जिल्हा परिषदांकडे निधी आहे, जागा आहेत व एक व्यवस्था आहे. तिच्यात काही सुधारणा केल्या तर खासगी शाळांची मातबरीच उरणार नाही. दिल्लीमध्ये आम आदमी पक्षाने पालिकेच्या शाळांचा दर्जा इतका सुधारला की त्यांच्याकडे प्रवेशासाठी लाईन लागली. हाच प्रकार महाराष्ट्रातही घडू शकतो. पण इथले राजकारणी निव्वळ शिवीगाळ करणे, धार्मिक उत्सव, जातींच्या आरक्षणाच्या मागण्या यात गुंतलेले आहेत. मिडिया आणि इथल्या जनतेलाही यातच मजा वाटू लागली आहे. त्यामुळे जालिंदरनगरमध्ये एकदम क्रांती, पण त्याच्या बाजूच्या गावातील शाळेत मात्र धड मुतारीचीही सोय नाही अशी आपली अवस्था आहे. आतादेखील या एक कोटीच्या बक्षिसाचे श्रेय घेण्यासाठी शिक्षण खात्यातले अधिकारी व राजकारणी पुढे धावतील. पण अशा शाळा राज्यभर निर्माण करू असा संकल्प कोणी करणार नाही. जालिंदर नगरमध्ये वस्ती छोटी असल्याने व शाळा लहान असल्याने हे शक्य झाले. मोठ्या गावांमध्ये गटतट असतात. एकमत होत नाही. राजकारणच बलिष्ठ ठरते. यासाठी सामान्य जनतेनेच आम्हाला अशा शाळा हव्यात अन्यथा, गावात पाऊल टाकू नका, असा काहीतरी दम राजकारण्यांना द्यायला हवा. जालिंदरनगर हे एकमेव उदाहरण राहिले तर तो फुले, शाहू, आंबेडकरांच्या आणि गाडगेमहाराजांच्या महाराष्ट्राचा पराभव असेल.

विचार

# सौदी-पाक कराराचा भारतावर परिणाम किती?

***सौदी अरेबिया आणि पाकिस्तानमध्ये अलिकडेच काही संरक्षणात्मक करार झाले आणि त्याचबरोबर सौदी अरेबियाने पाकिस्तानला मोठी आर्थिक मदत केली. दोन्ही देशांपैकी कोणत्याही देशावर झालेला हल्ला हा दोन्ही देशांवरचा हल्ला मानला जाईल, असे या करारात म्हटले आहे. या करारामुळे पाकिस्तानला भारतावर तर सौदी अरेबियाला इराणवर दबाव आणायचा आहे, हे स्पष्ट आहे; मात्र भारताला फार भीती बाळगण्याचे कारण नाही.***



आरिफ शेख

अलिकडेच सौदी अरेबिया आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या करारावर भारताने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. या दोन्ही देशांमधील कराराचा अभ्यास करत असल्याचे सांगून भारताने कराराला सावधपणे प्रतिसाद दिला. भारताचे सौदी अरेबियाशी संबंध मजबूत आहेत. याच वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सौदी अरेबियाचा दौरा केला. भारत आणि सौदी अरेबियाचा द्विपक्षीय व्यापार ५० अब्ज डॉलरपेक्षा जास्त आहे. सौदी अरेबिया भारताला आपल्या २० टक्क्यांपेक्षा जास्त कच्च्या तेलाची निर्यात करतो. एप्रिल २०२५ मध्ये दोघांनी एक संरक्षण सहकार्य समिती स्थापन केली. त्यात संयुक्त सरावांचा समावेश आहे. आता पाकिस्तानबरोबर सौदी अरेबियाचा करार झाला असला आणि पाकिस्तानचे नेते कराराबद्दल काहीही सांगत असले, तरी सौदी अरेबिया भारतासोबत संतुलन राखेल. सौदी अरेबिया पाकिस्तानची युद्धे लढणार नाही; परंतु इराणसारख्या प्रादेशिक प्रतिस्पर्ध्यांशी सामना करण्यास मदत करेल. भारत आणि पाकिस्तान पुन्हा भिडले, तर सौदी अरेबिया आर्थिक दबाव आणू शकतो; परंतु थेट लष्करी हस्तक्षेप करण्याची शक्यता कमी आहे. या संरक्षण करारात दोन्ही देशांविरुद्ध होणारा कोणताही हल्ला हा दोघांविरुद्धचा हल्ला मानला जाईल, असे म्हटले आहे. कतारवरील इस्रायली हल्ल्यानंतर आठ दिवसांनी पाकिस्तान आणि सौदी अरेबियामध्ये हा करार झाला. एकीकडे हा करार इस्त्रायलला शह देण्यासाठी असल्याचे चित्र रंगवले जात असले, तरी पाकिस्तान आणि सौदी अमेरिकेच्या विरोधात जाण्याचे धाडस करणार नाहीत. सौदी अरेबिया परस्पर हितसंबंध आणि संवेदनशीलता लक्षात घेईल, अशी अपेक्षा या करारानंतर भारताने व्यक्त केली आहे.

पाकिस्तान आणि सौदी अरेबियाचे संबंध परस्परगरजांवर आधारित आहेत. सौदी अरेबिया आर्थिक मदत पुरवतो आणि पाकिस्तान लष्करी मदत पुरवतो. पाकिस्तान सौदी अरेबियाच्या नेतृत्वाखालील लष्करी प्रयत्नांमध्ये सहभागी आहे. २०१५ पासून पाकिस्तानचे माजी लष्करप्रमुख राहिल शरीफ इस्लामिक लष्करी दहशतवादविरोधी युतीचे नेतृत्व करत आहेत. २०१८ मध्ये पाकिस्तानने येमेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षात सौदी अरेबियाला मदत करण्यासाठी सैन्य पाठवले. असा अंदाज आहे की बाराशे ते दोन हजार पाकिस्तानी लष्करी जवान आधीच सौदी अरेबियामध्ये तैनात आहेत. त्या बदल्यात पाकिस्तानला सौदी अरेबियाकडून आर्थिक मदत मिळत राहील. भविष्यात भारताशी कधी संघर्ष झाला तर सौदी अरेबिया काही मदत करेल, अशी पाकिस्तानला आशा आहे. पाकिस्तान आणि सौदी अरेबियामधील 'स्ट्रॅटेजी म्युच्युअल डिफेन्स ॲग्रीमेंट' म्हणजे काय, हे जाणून घेतले पाहिजे. पाकिस्तानच्या तुलनेत भारताची सौदी अरेबियासोबतची संरक्षण भागीदारी अद्याप बाल्यावस्थेत आहे. भारताने सौदी अरेबियाच्या सशस्त्र दलांना प्रशिक्षण देण्याची ऑफर दिली आहे. भारत आणि सौदी अरेबियामधील भागीदारी अलिकडील काही महिन्यांमध्ये वाढली आहे. त्यात दोन्ही देशांमधील संयुक्त लष्करी सराव आणि संरक्षणमंत्रीस्तरीय समितीची स्थापना या पावलांचा समावेश आहे. हे त्यांच्या संबंधांच्या बळकटीकरणाचे प्रतीक आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये संघर्ष सुरू झाल्यावर तटस्थ राहण्याचा फायदा सौदी अरेबियाला झाला आहे. या वर्षी मे महिन्यात भारत आणि पाकिस्तानमध्ये संघर्ष झाला, तेव्हा सौदी अरेबियाने पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला; परंतु 'ऑपरेशन सिंदूर'बाबत कोणतेही निवेदन जारी केले नाही. सौदी अरेबियासाठी पाकिस्तानपेक्षा भारत अधिक महत्त्वाचा आहे आणि भारतासोबतची त्याची आर्थिक आणि सामरिक भागीदारी महत्त्वाची आहे. पाकिस्तानसोबतच्या संरक्षण करारानंतरही वरिष्ठ सौदी अधिकाऱ्यांनी याचा पुनरुच्चार केला आहे. पाकिस्तानला सौदी अरेबियाकडून सातत्याने मोठे आणि परवडणारे कर्ज मिळत आले आहे. अहवालांवरून दिसून येते, की मुळात एक वर्षासाठी दिलेले कर्ज पाकिस्तानने फेडलेले नाही. सौदी सरकारने पाकिस्तानप्रती उदारता दाखवली आहे आणि कोणतेही अतिरिक्त व्याज न आकारता दर वर्षी ही कर्जे वाढवत आहे. पाकिस्तानला मिळालेली सौदी अरेबियाची कर्जे चीनकडून घेतलेल्या कर्जांपेक्षा एक तृतीयांश स्वस्त आहेत आणि परदेशी व्यावसायिक कर्जांच्या किमतीच्या निम्मी आहेत. सौदी अरेबिया, चीन आणि संयुक्त अरब अमिरातीने तीन वर्षांच्या कार्यक्रमाच्या पूर्ततेपर्यंत पाकिस्तानला आपल्या रोख ठेवी ठेवण्याची अट घातली आहे. या देशांनी पाकिस्तानला एकूण बारा अब्ज अमेरिकन डॉलर्सचे कर्ज दिले आहे. तो पाकिस्तानी मध्यवर्ती बँकेच्या एकूण परकीय चलन साठ्याचा १४.३ अब्ज डॉलर्सचा भाग आहे.

पाकिस्तान आणि सौदी अरेबिया एकत्र आले, तरी भारतावर संरक्षणात्मक दृष्ट्या फारसा परिणाम होणार नाही. 'ग्लोबल फायरपॉवर इंडेक्स'नुसार, भारताकडे जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात शक्तिशाली सेना आहे तर पाकिस्तान बाराव्या क्रमांकावर आहे. सौदी अरेबिया २४ व्या क्रमांकावर आहे. सौदी अरेबियाची ताकद अमेरिकन शस्त्रांमध्ये आहे. २०१५-२०२२ च्या येमेन युद्धात हौथी बंडखोरांच्या ड्रोन हल्ल्यांमुळे सौदी अरेबियाला मोठे नुकसान सहन करावे लागले. त्यामुळे त्यांचे हवाई संरक्षण काहीसे कमकुवत झाले. सौदी सैन्य परदेशी (पाकिस्तानी आणि अमेरिकन) सल्लागारांवर अवलंबून आहे आणि त्यांच्याकडे अंतर्गत प्रशिक्षणाचा अभाव आहे.

भारतासाठी हा करार दुधारी तलवार आहे. एकीकडे, भारत आणि सौदी अरेबियाचे मजबूत आर्थिक संबंध आहेत. भारत सौदी अरेबियासोबत शंभर अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त व्यापार करतो. पाकिस्तानसोबत करार झाल्यानंतरही सौदी अरेबियाने स्पष्ट केले आहे, की भारतासोबतचे त्यांचे संबंध मजबूत राहतील आणि हा करार भारताविरुद्ध नाही. आज नव्वद लाखांपेक्षा अधिक भारतीय आखाती देशांमध्ये काम करतात. ते आखाती देशातून मोठ्या प्रमाणात पैसे भारतात पाठवतात. तथापि, या करारामुळे लक्षात येते की पाकिस्तान आता मुस्लिम जगात आपले स्थान मजबूत करू शकतो. त्याचा वापर काश्मीरप्रश्नी भारताविरुद्ध केला जाऊ शकतो. भारताने या करारावर संयमी भूमिका घेतली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटले आहे, की भारत कराराचा अभ्यास करेल आणि प्रादेशिक स्थिरतेसाठी वचनबद्ध राहील. असे असले तरी हा करार भारताला त्याच्या संरक्षण क्षमता मजबूत करण्याची संधी प्रदान करतो. क्वाड (भारत, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया) सारख्या युती मजबूत करणे, अंदमान आणि निकोबार बेटांमध्ये संरक्षणविषयक पायाभूत सुविधा विकसित करणे आणि नौदल गस्त वाढवणे आवश्यक आहे. ओमान, युएई आणि बहरीनसारख्या मध्यममार्गी आखाती देशांशीही भारत संबंध मजबूत करू शकतो. भारताने ऊर्जा विविधीकरणासाठी अक्षय स्रोतांवरही भर दिला पाहिजे.

अलिकडेच इस्रायलने सौदी अरेबियाच्या सीमेला लागून असलेल्या कतारची राजधानी दोहावर हल्ला केला. या हल्ल्यावर अमेरिकेने बाळगलेल्या मौनामुळे आखाती देशांमध्ये अमेरिकेच्या सुरक्षा हमींबद्दल शंका निर्माण झाल्या आहेत. पश्चिम आशियात अमेरिकेचे अंदाजे चाळीस ते पन्नास हजार सैन्य तैनात आहे; परंतु इस्रायली आक्रमणासमोर अमेरिकेच्या निष्क्रियतेमुळे सौदी अरेबियाला पर्यायी सुरक्षा भागीदार शोधण्यास भाग पडले. या संदर्भात, मुस्लिमजगतातील एकमेव अण्वस्त्रधारी देश असलेला पाकिस्तान सौदी अरेबियासाठी आकर्षक मित्र बनला. सौदी आणि पाकिस्तानच्या करारात संरक्षण उद्योग सहकार्य, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि लष्करी सह-उत्पादन यांचा समावेश असल्यामुळे दोन्ही देशांच्या लष्करी क्षमता बळकट होतील. पश्चिम आशियातील इस्रायली आक्रमण आणि इराणशी तणावाच्या दरम्यान, सौदी अरेबियाला एका मजबूत मित्राची आवश्यकता होती, तर पाकिस्तानला ते आर्थिक आणि सामरिक फायद्याचे स्रोत म्हणून दिसले. सौदी अरेबियासाठी, ते अमेरिकेच्या अवलंबित्वापासून मुक्त होण्याच्या दिशेने एक पाऊल दर्शवते. पाकिस्तानला सौदी अरेबियाकडून तेल पुरवठा, गुंतवणूक आणि लष्करी मदत मिळू शकते. यामुळे युद्धप्रसंगी पाकिस्तानची शक्ती वाढेल. भारताने पाकिस्तानवर हल्ला केल्यास सौदी अरेबिया प्रत्युत्तर देऊ शकतो. सौदी तेल आयातीवरील अवलंबित्व पाहता, या कराराचा भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत भारताला रशिया आणि इतर स्रोतांकडून विविधीकरणाला गती द्यावी लागेल. पश्चिम आणि दक्षिण आशियातील सत्तेचे संतुलन बदलणारा हा करार भारतासाठी धोक्याची घंटा आहे. परिणामी, भारताला आपल्या राजनैतिक आणि संरक्षण धोरणांमध्ये बदल करावे लागतील. तथापि, मजबूत नेतृत्व आणि धोरणात्मक स्वायत्ततेसह, भारत हे आव्हान पेलू शकतो.

चर्चा आजची

# सीमोल्लंघन काळाची गरज

सुयोग आंग्रे

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांनी रावणावर विजय मिळवलेला होता. त्याचं प्रतिक म्हणून नवरात्रोत्सव पर्वात ठिकठिकाणी रामलीला सादर केली जाते.तसेच दसऱ्याच्या दिवशी रावणदहन करून रामाने रावणावर मिळवलेल्या विजयाचा उत्सव साजरा केला जातो. आज लंकापती रावण नसला तरी भ्रष्टाचार, अत्याचार, दहशतवाद, गुन्हेगारी, महागाई, दुष्काळ, दारिद्र्य, रोगराई, कुपोषण आणि अंधश्रद्धा ही दहा तोंडे असलेला समस्यारूपी रावण आजही जिवंत आहे.आजच्या काळात प्रभू रामचंद्रांची भूमिका कोणी एकटा बजावू शकणार नाही. त्यासाठी एकजूटच हवी. सीमोल्लंघन म्हणजे काय? कधी केलाय विचार? सीमांच उल्लंघन म्हणजे सीमोल्लंघन. ज्याप्रमाणे रामाने रावणावर विजय मिळवला त्याप्रमाणे आपण आपल्यातील एका दुर्गुणावर विजय मिळवला तर? पांडवांनी जशी दसऱ्याला आपली शस्त्रे शमीच्या झाडावरून उतरवली तसेच आपण आपले एखादे कला अथवा सद्गुणरुपी शस्त्र जे व्यापामुळे बाजूला पडले आहे ते पुन्हा उपयोगात आणले तर? किंवा ते उपयोगात असल्यास त्याला अधिक धार लावली तर?सीमोल्लंघनाचा खरा अर्थ असा आहे. ऐतिहासिक काळात या दिवशी सीमोल्लंघन करून लोक लढाईवर, मोहिमांवर जात. दसऱ्याचा सण साजरा करून शेतकरी लढाईसाठी बाहेर पडत, तेच सीमोल्लंघन. काळ बदलला. काळाचे संदर्भ बदलले. आज सीमोल्लंघन केवळ व्यक्तिगत आयुष्यापुरते मर्यादित राहिले नसून ते देशाच्या पातळीवरील व्यापक कृती म्हणूनही पाहिले जाते. तेच खऱ्या अर्थाने चौफेर प्रगतीच्या, विकासाच्या दिशेने सुरू असलेले सीमोल्लंघन. अलिकडच्या काळात भारताने केवळ जमिनीवर, पाण्यात आणि हवेत उड्डाणे मारून ते केलेले नाही तर त्यापलिकडे अवकाशात भराऱ्या घेतल्या. मंगळयान पूर्वीच झेपावले. यंदा चांद्रयान-३ मोहीम यशस्वी झाल्यानंतर सूर्याच्या दिशेने भारताने नवी झेप घेतली. पाठोपाठ अवकाशात स्थानक उभारण्याची तयारी सुरू केली. पृथ्वीच्या कक्षेच्या पलीकडचे हे सीमोल्लंघन प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटायला लावणारे आणि व्यक्तिगत आयुष्यातील सीमोल्लंघनासाठी प्रेरणा देणारे ठरले. सणावारांचे पारंपरिक संदर्भ जोपासतानाच त्याला आधुनिक काळाशी जोडून घेण्यामुळे संस्कृती प्रवाही राहू शकते आणि संस्कृती प्रवाही ठेवायची असेल, तर पारंपरिक सीमोल्लंघनाला अनेक कल्पनांचे पंख लावून दशदिशांतून भरारीसाठी सज्ज व्हायला हवे. संस्कृतीच्या जपणुकीबरोबर त्याच संस्कृतीमधील सकस मूल्ये घेऊन भविष्याकडे वाटचाल त्यामुळेच सुकर होईल. सीमोल्लंघनाशिवाय आयुष्यात प्रगती नाही, त्यामुळे प्रत्येक माणसाच्या आयुष्यात त्या दिशेने झेप जशी महत्त्वाची, त्यासाठीचा संकल्पही त्याहून अधिक! देशातील ऐंशी टक्के जनतेला रोजच्या जगण्याशी संघर्ष करावा लागतो. जगण्याच्या या कुरुक्षेत्रावर सामान्य माणूस प्रत्येक लढाई जिंकतोच असे नाही. अनेकदा त्याला हारही मानावी लागते. ही हार व्यवस्थेपुढे असते. व्यवस्थेतील भ्रष्टाचार, अनाचार, अनिष्ट प्रथा यांच्यापुढे असते. अनेकदा सामान्यातली सामान्य माणसेही या व्यवस्थेवर मात करून मोठ्या निर्धाराने पुढे जात असतात, त्यातून अनेकांना प्रेरणा मिळत असते. व्यवस्थेवर मात करून केले जाणारे सीमोल्लंघन सामान्य माणसांच्या जगण्याला हत्तीचे बळ देत असते.

आजच्या पुरोगामी विचारसरणीच्या काळात सीमोल्लंघनाकडे नव्या संदर्भात पाहण्याची गरज आहे. हा दिवस शस्त्रे घेऊन बाहेर पडण्याचा नव्हे, तर अलीकडच्या काळात समाजजीवनातील विस्कटलेली घडी नव्याने मांडण्याचा ठरावा, जी काळाची गरज आहे. दिवसागणिक होणाऱ्या सीमोल्लंघनाने महागाईचा कहर सीमापार चालला आहे. एकूणच समाजजीवन अशा घटनांनी ढवळून निघत असताना राजकीय क्षेत्रही अपवाद राहिलेले नाही. आगामी निवडणूक लक्षात घेता सर्वच राजकीय पक्षांनी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा नियोजनबद्ध आराखडा तयार केला असणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थानाच्या निवडणुकांमध्ये सत्ता मिळविण्यासाठी राजकारण्यांचे सीमोल्लंघन अपेक्षित आहे. त्याचबरोबर आपल्या अवतीभोवती सुरु असलेला ग्रामीण आणि शहरी विकासाचा नियोजनबद्ध राडा लक्षात घेऊन मतदारांनादेखील नव्या सत्तेसाठी सीमोल्लंघन करण्यासाठीची उत्तम वेळ समोर आली आहे. नुसतं गावाची सीमा ओलांडून किंवा रावणाचे पुतळे जाळून परिस्थिती बदलणार नाही. सगळ सुजलाम्-सुफलाम व्हावं, आपल जीवन भयमुक्त, सुखी,आनंदी आणि समाधानी व्हावं अस सगळ्यानांच वाटत. हे व्हायचं असेल तर देशातलं सरकार बदलून उपयोगाच नाही.सरकार फक्त सुविधा पुरवत असत. भ्रष्टाचार, अत्याचार, दहशतवाद, गुन्हेगारी, महागाई, दुष्काळ, दारिद्र्य, रोगराई, कुपोषण आणि अंधश्रद्धा हे सगळ जर समाजातून मुळासकट नष्ट करायचं असेल तर प्रत्येकाने सुपंथावर चालण्याचा संकल्प करावा. सगळंच बरोबर आणि उत्तम करायला आपण देव नाहीत, संतही नाहीत,पण वाईट वागायला आपण राक्षसही नाहीत. प्रत्येकाने दुसऱ्यांना सुधरवत बसण्यापेक्षा स्वतःमध्ये बदल करावा. एक एक सद्गुण आत्मसात करण्याचा प्रतिवर्षी दसऱ्याला संकल्प करावा.एक दुर्गुण किंवा कमतरता दूर करून एक सद्गुण आचरणात आणला तर आयुष्यात आपल्याला खूप मोठी मजल मारता येईल. आयुष्य हे असच जगायचं आहे. त्यामुळे यंदाच्या दसऱ्यापासून असं सीमोल्लंघन करा आणि दुर्गुणांवर, मर्यादांवर मिळवलेल्या विजयाच सोन सुख-समाधानाने लुटा.

लोकसंसद

## सासवणे भेटीत महात्माजींना "पोरबंदर" आठवले

आज २ ऑक्टोबर २०२५ महात्मा गांधीजींची १५६ वी जयंती आहे. महात्माजींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरात प्रांतातील पोरबंदर येथे झाला. बापूजींची जयंती भारतातच नव्हे तर विदेशातही साजरी होते. त्यांचे मोठेपण बॅरिस्टर होण्यात नाही तर स्वावलंबी जीवन, साधी राहणी, साधा पोशाख (फक्त खादीचा पंचा) व हलक्या दर्जाची कामे (शौचकूप सफाई) करणे आणि अनवाणी चालणे यात आहे. माझा देश गरीब आहे. जनतेची अन्नान्न दशा आहे. लज्जा रक्षणार्थ कपडे नाहीत, काहींना निवाऱ्यासाठी झोपडीही नाही. म्हणून बॅरिस्टर असलेल्या बापूजींनी ऐशारामी जीवनास फाटा देऊन साधी राहणी व अनवाणी फिरणे हे व्रत स्वीकारले. अहिंसा मार्गाने लढा देऊन देश स्वतंत्र करणे ही त्यांची अंतिमेच्छा होती. मूलतः बापूजी कायदा शाखेचे विद्यार्थी. कायद्याची सर्वोच्च पदवी घेण्यासाठी ते इंग्लंडला गेले व बॅरिस्टर होताच मायभूमीत परतले. पहिल्यांदाच एका अशिलाची केस लढविण्यासाठी ते मुंबई हायकोर्टाच्या न्याय कक्षात काळा कोट परिधान करून गेले. न्यायाधीश येताच कामकाज सुरू झाले. ब.मोहनदास करमचंद गांधी हे नाव पुकारताच मिस्टर गांधी उभे राहिले पण ते फारच घाबरलेले होते. नंतर त्यांनी आफ्रिकेचा रस्ता पकडला. तेथे काळ्या लोकांवर होणारा अन्याय अहिंसेच्या मार्गाने दूर केला व स्वातंत्र्य चळवळ बळकट करण्यासाठी भारतात परतले. स्वावलंबनाचा, सत्याग्रहाचा व खादीचा सर्वत्र प्रचार केला. सासवणे हे पुराणकालीन अष्टागरातील निसर्ग रमणीय गाव आहे. सागर सान्निध्यामुळे ते पर्यटकांचे आकर्षण बनले आहे. ब्रिटिशांची काळी कारकीर्द नष्ट होण्यासाठी, स्वातंत्र्य प्रेमी पिढी निर्माण व्हावी या हेतूने आचार्य ढवण यांनी वैश्य समाजामार्फत निवासी शाळा सुरू केली. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत ७० विद्यार्थी अध्ययन करीत होते. या निवासी शाळेत वैश्य समाजातील मुलांना भोजन व निवास सेवा मोफत होती. अन्य जातीच्या मुलांनाही येथे शिक्षणासाठी मुक्त प्रवेश होता. या शाळेत भाषा, गणित, शास्त्र या विषयांसोबत स्वावलंबन, श्रममूल्य, संस्कृतीची जपणूक, स्वयंशिस्त, चरख्यावर सूत कातणे यास प्राधान्य होते. चार दिवसांच्या मुक्कामात बापूजींना स्वयंपाक करण्यास, चरख्यावर सूत कातण्यास, देशभक्तीपर गाणी व प्रार्थना म्हणण्यास अनेक मुला-मुलींनी मदत केली. रामजी लक्ष्मण घरत हा धडपड्या तरूण पदवीधर होता. इंग्रजी भाषेवर "कमांड" होती. बापूजींचा आवडता अनुयायी होता. गावातील प्रत्येक कार्यक्रमात त्याचा सहभाग होता. आश्रमशाळेतही अध्यापन करीत होता. ब्रिटिशांनी वाढविलेला शेतसारा ऐकून तो गर्भगळित होत असे. या एकाधिकारशाहीस वाचा फोडण्यासाठी "टाईम्स ऑफ इंडिया"या इंग्रजी वृत्तपत्रात लेखमाला सुरू केली . या लेखमालेचे पडसाद इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये उमटले. म्हणून वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी पार्लमेंटने प्रतिनिधी भारतात पाठविला. या प्रतिनिधीने सासवणे गावास भेट देऊन परिसरातील शेतकऱ्यांशी शेतसाऱ्याबाबत चर्चा केली व अहवाल पार्लमेंटला सादर केला. शेवटी वाढीव शेतसारा ब्रिटिश सरकारला रद्द करावा लागला. हा तपस्वी घरत यांच्या लेखणीचा विजय आहे. काळ्या यादीत प्रथम क्रमांकावर असलेल्या सासवणे शाळेच्या तुकडीस पोलिसांनी लगेचच पकडले. त्यात आश्रम शाळेचे विद्यार्थी व शिक्षक आढळल्यामुळे पोलिस चिडले व त्यांनी आश्रमशाळेची मान्यता लगेचच रद्द केली. स्वातंत्र्यप्रेमीपिढी निर्माण होण्यासाठी वैश्य समाजाने निवासीशाळा चालविली होती. वैश्य मुलांना भोजन व निवास मोफत होते. त्यासाठी या समाजाने हजारो रुपयांचा निधी जमविला होता. पण या निवासी शाळेची मान्यता ब्रिटिशांनी पूर्वग्रह दूषिततेने काढून घेतल्यामुळे वैश्य समाजास मोठा धक्का बसला. इतर समाजातील मुलांनी कुलाबा जिल्हा स्कूल बोर्डाच्या शाळेत प्रवेश घेतला. ब्रिटिश सत्ता असेपर्यंत शाळेला मान्यता मिळणे अशक्य होते. सुदैवाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाल्यामुळे भारतीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला. वैश्य समाजाच्या आशा पल्लवित झाल्या. परंतु ३० जानेवारी १९४८ रोजी महात्माजींवर गोळ्या झाडल्यामुळे त्यांना हौतात्म्य मिळाले व संपूर्ण भारत देश दुःख सागरात बुडाला.

**- बळवंत वालेकर, अलिबाग**

दिनविशेष

# शिक्षणतज्ज्ञ स्वामी रामानंद तीर्थ



स्वामी रामानंद तीर्थ यांचा आज स्मृतिदिन. स्वामी रामानंद हे स्वातंत्र्य लढ्यातील एक थोर नेते, शिक्षणतज्ज्ञ, विद्वान व ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव व्यंकटेश भगवान खेडगीकर होते. त्यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९०३ रोजी कर्नाटकातील सिंदगी येथे कर्मठ ब्राह्मण कुटुंबात झाला. वडील भगवानराव प्राथमिक शाळेत शिक्षक होते. रामानंदांचे प्राथमिक शिक्षण जन्मगावी झाले. त्यांनी एका राष्ट्रीय विद्यालयातून मॅट्रिकची परीक्षा दिली आणि पुढे अमळनेर व पुणे येथील महाराष्ट्र विद्यापीठातून इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांसह बी. ए. व एम. ए. पदवी संपादन केली. त्यानंतर १९२६ मध्ये ना. म. जोशी यांच्या स्वीय सहाय्यकपदी ते रुजू झाले. कृषी उत्पादने त्यामुळे आपाततः गिरणी कामगारांच्या लढ्यात ते सक्रिय सहभागी झाले. ना. म. जोशींनी स्वामीजींना कामगारविषयक विधेयकाची माहिती घेण्यासाठी ऐन हिवाळ्यात दिल्लीला पाठविले. नंतर त्यांनी अध्यात्माची कास धरली. आपल्या जन्मनावाचा त्याग करून भिक्षुकी अंगीकारली. त्यानंतर हिप्परगा (तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद) येथे लखनौस्थित स्वामी नारायण यांच्याकडून संन्यासदीक्षा घेऊन ते स्वामी रामानंद तीर्थ झाले. त्यांनी हिप्परगा येथे १९३० मध्ये राष्ट्रीय विचारांच्या प्रचारार्थ शिक्षण संस्था काढली. सहा-सात वर्षे राष्ट्रीय बाण्याने हे कार्य केल्यानंतर ते १९३५ मध्ये सक्रिय राजकारणात सहभागी झाले आणि याच सुमारास आंबेजोगाई येथे योगेश्वरी नूतन विद्यालयात शिक्षकाची नोकरी धरली. पुढे ते मुख्याध्यापकही झाले. नंतर त्यांनी नांदेड येथे १९५० मध्ये नांदेड एज्युकेशन संस्थेची स्थापना केली आणि नांदेड शहरात पीपल्स कॉलेज काढले. त्यानंतर त्यांनी १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकांत गुलबर्गा मतदारसंघातून निवडणूक लढवून संसदेत प्रवेश केला. १९५३ मध्ये अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी हैदराबाद राज्याच्या विभाजनाचा प्रश्न प्रभावीपणे मांडला. अशा या कर्तृत्ववान शिक्षणतज्ज्ञाचे २२ जानेवारी १९७२ रोजी निधन झाले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**३ ऑक्टोबर**

१) श्रीम. क्षमा दत्तात्रेय जोशी चेंढरे-अलिबाग ३-१०-१९५४

२) श्री. हरिश्चंद्र मोरू पाटील मु.कार्ले-खंडाळे अलिबाग, ३-१०-१९५३

## सुवर्णकण



आपल्या बुद्धीचे ठिकाणी सर्वांच्या विषयी समभाव आल्याशिवाय, समत्व आल्याशिवाय आपल्याला भगवंताशी एकरूप होता येणार नाही

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# आदिवासी नागरीकांचा खड्डेमय प्रवास

## पनवेल पालिकेकडे संवेदनशीलतेची कमतरता

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

**पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीत असलेला आरबीआय मेट्रो स्टेशनपासून फणसवाडी–चाफेवाडी या वाड्यांपर्यंत जाणारा सुमारे ५ किमी लांबीचा रस्ता आजही खड्डेमय व अत्यंत दुरवस्थेत आहे. अनेक वर्षे या रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रश्न सोडवला गेला नाही. परिणामी आदिवासी नागरिकांना रोजच्या प्रवासात जीव मुठीत धरून जगावे लागत आहे.**




दररोज या रस्त्याचा वापर शाळकरी मुले, दुचाकीस्वार, आदिवासी बांधव तसेच सकाळी व्यायामासाठी जाणारे नागरिक करतात. पावसाळ्यात दलदल आणि उन्हाळ्यात धुळीचा पट्टा बनलेला हा रस्ता अपघातांचे निमंत्रण ठरतो आहे. प्रशासन एखाद्या गंभीर अपघाताची वाट पाहत आहे का? असा थेट सवाल सजग नागरिक मंच व खारघर हिल्स वेलफेअर असोशिएशन यांनी स्मरणपत्रातून केला आहे. नागरिकांच्या निवेदनाला उत्तर देण्याची तसदीदेखील पनवेल महानगरपालिका प्रशासन घेताना दिसत नाही. समस्यांचे निराकरण तर दूरची गोष्ट झाली. पालिकेच्या व्हाट्सअँप तक्रार नोंदणी अँपवरदेखील तक्रार करून प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. त्यामुळे लोकाभिमुख कारभार, सुशासन हे पालिकेचे दावे केवळ मृगजळच असल्याचे दिसते.

स्मरणपत्रात असेही नमूद केले आहे की, लोकशाही व्यवस्थेचे मूलभूत तत्त्व 'सर्व समान' असूनही पनवेल महापालिका आदिवासी वाड्यांचा प्रश्न कायम दुर्लक्षित करत आहे. शहरातील रस्त्यांवर अनियंत्रित खर्च करणाऱ्या पालिकेला आदिवासी वाड्यांच्या रस्त्यासाठी निधी नसावा, ही खरोखरच शोकांतिका आहे, अशी प्रतिक्रिया सजग नागरिक मंचाचे सुरेश थोरात यांनी दिली.

सजग नागरिक मंचाचे संघटक सुधीर दाणी यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, पावसाळा संपल्यानंतर रस्ता नव्याने तयार केला नाही, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल.

पालिका प्रशासनाकडे निधीची नव्हे तर संवेदनशीलतेची कमतरता आहे, हे या रस्त्याच्या दुरवस्थेतून स्पष्ट दिसून येते. न्यायासाठी आदिवासी बांधवांना अजून किती प्रतीक्षा करावी लागणार, हा खरा प्रश्न आहे.

### वंचित घटकांना जाणीवपूर्वक विकासापासून दूर ठेवले

पालिकेने शहरातील टापटिप रस्त्यांचे वारंवार डांबरीकरण केले. सुस्थितीतील डांबरी रस्ते तोडून त्याजागी सिमेंट रस्ते उभारले. कोट्यवधींची कामे हाती घेतली जात असताना आदिवासी वाड्यांचा एकमेव रस्ता मात्र वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिला. यामुळे वंचित घटकांना विकासाच्या प्रवाहातून जाणीवपूर्वक दूर ठेवले जात असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.

> **लोकशाही व्यवस्थेत 'सर्व समान' या मूलभूत तत्त्वाची पायमल्ली पनवेल महानगरपालिका करते आहे. शहरातील रस्त्यांवर अनियंत्रित खर्च करणाऱ्या पालिकेला आदिवासी वाड्यांच्या रस्त्यासाठी निधी नसावा, ही खरोखरच शोकांतिका आहे.**
> **– सुरेश थोरात, सजग नागरिक मंच, नवी मुंबई**

## लक्ष्मी मांजरे यांचे निधन



**कोलाड :** रोहा तालुक्यातील गोवे गावच्या रहिवासी लक्ष्मी विठ्ठल मांजरे यांचे शुक्रवार दि.२६ सप्टेंबर रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७६ वर्ष होते. त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच त्यांच्या अंत्यविधीसाठी, समाजबांधव, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच समस्त गोवे ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात त्यांचे पती, दोन मुलगे, दोन मुली, सुना, एक जाऊ, पुतणे, नातवंडे व मोठा मांजरे परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवार दि.५ ऑक्टोबर, तर उत्तरकार्य विधी बुधवार दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी त्याच्या राहत्या निवास्थानी होणार आहेत.

## विनोद चोगले यांचे निधन

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन तालुक्यातील समाजसेवक विनोद चोगले यांचे दि. २९ सप्टेंबर रोजी वयाच्या ५४ व्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच चाहत्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुलगी आणि आप्तेष्ट असा परिवार आहे. त्यांना श्रद्धांजली वाहताना सेवानिवृत्त परिमंडळ अधिकारी बाळकृष्ण गोरनाक यांनी त्यांच्या कार्याला उजाळा देताना सांगितले की, माळी समाजातील एक निष्ठावंत, निस्वार्थी सेवकाच्या निधनाने माळी समाजात कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे.

# रातवड विद्यालय रंगले पालखी सोहळ्यात

**● तळवली ग्रामस्थांचा ऊस्फूर्त सहभाग**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित, माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयातर्फे शारदोस्तवानिमित्त पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा पालखी सोहळा तळवली गावात मंगळवार दि.३० सप्टेंबर रोजी साजरा झाला. या पालखी सोहळ्यात शाळेचे विध्यार्थी, माजी विध्यार्थी, तळवली ग्रामस्थ, पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी ऊत्स्फूर्त सहभाग घेतला.



सकाळी गावातील मान्यवर व ग्रामस्थांच्या उपस्थितीत ज्ञानेश्वर माऊली व शारदा मातेची आरती करण्यात आली. संपूर्ण गावात पालखी नेण्यात आली. गावातील घराघरात पालखीचे पूजन व स्वागत करण्यात आले. पालखीसोबत ग्रामस्थांचे भजन, लेझीम पथक व ढोलताशांची सोबत होती. गावातील घराघरात पालखीचे पूजन करण्यात आले. सुस्वर भजन, पारंपारिक नृत्य, फुगडी घालून पालखी सोहळ्याचा आनंद विध्यार्थी, महिला व ग्रामस्थांनी घेतला. पालखी सोहळ्यानंतर विद्यालयात श्री सत्यनारायण महापूजा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये विविध प्रकारची पारंपारिक नृत्य सादर करण्यात आले. विद्यालयात यानिमिताने सत्यनारायण महापूजा झाली. माजी विध्यार्थी, पालक, विविध समित्यांचे पदाधिकारी व सदस्य, ग्रामस्थांनी शारदोस्तव व सत्यनारायण पूजेसाठी विद्यालयात उपस्थित राहून दर्शन घेतले.

## महिलांचा जिजामाता पुरस्काराने सन्मान

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

नवरात्रीनिमित्त इनर व्हील क्लब कर्जततर्फे महिलांना जिजामाता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा सोहळा रॉयल गार्डनच्या सभागृहात उत्साहात पार पडला. याप्रसंगी दांडिया रासचेही आयोजन करण्यात आले होते.

ज्या महिलांनी त्यांच्या उत्कृष्ट कार्यामुळे समाजात मोलाचा बदल घडवून आणला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन समाजातील देविका वाघमारे, सीता उपाध्ये, जयश्री पाटील, शितल पुजारी, शोभा बोराडे, डॉ. संगीता दळवी, डॉ. मनीषा गुट्टे , गायत्री बडेकर, सुचिता वांजळे, छाया दिवेकर, धन्यविता बरोळे यांना जिजामाता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमात महिलांनी, युवकांनी व लहानग्यांनी रंगीबेरंगी वेशभूषा परिधान करून दांडियाच्या तालावर नृत्य सादर केले. अधूनमधून लकी ड्रॉची पारितोषिके ठेवण्यात आली. त्यात पैठणीचा समावेश होता. सर्वोत्तम वेशभूषा, उत्कृष्ट दांडिया नृत्य, गटनृत्य तसेच विशेष आकर्षण अशा विविध विभागांमध्ये विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.




## रॅलीतून आरोग्य संवर्धनाचा संकल्प

**। पनवेल । प्रतिनिधी।**

जागतिक हृदय महिनानिमित्त पनवेलमध्ये मान्यवर नागरिकांच्या सहभागानेजनजागृतीरॅलीकाढण्यात आली. टेंशन घेऊ नका, आपले हृदय बळकट बनवा, असा संदेश देत नागरिकांना आरोग्याची जाणीव करून देण्यात आली. या रॅलीतून हृदयाची काळजी घेणे, योग्य आहार व नियमित व्यायामाचे महत्त्व पटवून सांगण्यात आले. पनवेलकरांनी मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभाग नोंदवत आरोग्य संवर्धनाचा संकल्प केला.




# महात्मा गांधीजींचे विचार जोपासावे

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सत्य आणि अहिंसेच्या तत्वांनी ब्रिटिश राजवटी विरुद्धच्या स्वातंत्र्य लढ्यात स्वतः ला झोकून दिले. देशाविषयी बांधिलकी काय असते ते दाखवून दिले होते.अनेक लोकांना प्रेरणा दिली. त्यांचा आदर्श व त्यांचे कार्य सर्वांनी जोपासले पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. जनार्दन कांबळे यांनी केले. कोकण उन्नती मित्र मंडळ वसंतराव नाईक कॉलेज, बॅरिस्टर ए.आर.अंतुले शैक्षणिक संकुल एनएसएस युनिट १० व आदिवासी विकास सेवा संघ यांच्या संयुक्त



**● डॉ. जनार्दन कांबळे यांचे प्रतिपादन**

विद्यमाने महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी व्याख्यान कार्यक्रमावेळी ते बोलत होते. यावेळी मुरूड पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांनी स्पर्धा परीक्षा हा विद्यार्थी आणि युवकांसाठी एक महत्त्वाचा मार्ग आहे. ज्याच्या माध्यमातून त्यांना त्यांच्या करिअरच्या स्वप्नांचा पाठपुरावा करता येतो, असे सांगितले. तसेच, बॅक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक पाध्ये यांनी प्रणाली विविध योजनांविषयी मार्गदर्शन केले.

## प्रा.हर्षल जोशी सेवानिवृत्त

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजचे सहयोगी प्राध्यापक व माजी प्रभारी प्रा. हर्षल विष्णू जोशी सेवानिवृत्त झाले. याबद्दल जे.बी. सावंत संस्थेतर्फे व टिएमसी कॉलेजतर्फे प्रा. हर्षल जोशी यांचा सत्कार करण्यात आला.



महाविद्यालयातर्फे तसेच संस्थेतर्फे त्यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम दि.३० सप्टेंबर रोजी महाविद्यालयात पार पडला. या कार्यक्रमात संस्थेतर्फे, महाविद्यालयातर्फे प्रा. हर्षल जोशी यांचा भेटवस्तू देऊन यथोचित गौरव करण्यात आला. तर एस.वाय.बीकॉम आणि टि.वाय. बीकॉमच्या विद्यार्थ्यांनी प्रा. हर्षल जोशी यांना शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली.

## रोटरी क्लब ऑफ खोपोलीची शिक्षकांप्रती कृतज्ञता

**शिक्षकांचा नेशन बिल्डर अवॉर्डने सन्मान**

**। खोपोली । प्रतिनीधी ।**

चिमुकल्या मुलांना प्राथमिक शिक्षण देऊन भविष्यात आदर्श नागरिक घडविण्यासाठी शिक्षकांच्या कार्याचा राष्ट्राच्या उभारणीमध्ये मोलाचा वाटा आहे.

शिक्षकांच्या या कार्याची दखल घेऊन येथील रोटरी क्लब ऑफ खोपोलीने शहर आणि खालापूर तालुक्यातील पूर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक आणि माजी मुख्याध्यापक नामांकीत शिक्षकांची निवड करून नेशन बिल्डर अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ खोपोलीच्या सभागृहात नेशन बिल्डर अवॉर्ड सोहळा सोमवार दि.२९ सप्टेंबर रोजी माजी उपनगराध्यक्ष कुलदिपक शेंडे यांच्या उपस्थितीत प्रोजेक्ट चेअरमन डॉ. गौरव तिवारी यांच्या संकल्पनेतून पार पडला. याप्रसंगी डिस्ट्रीट डायरेक्टर वसंतराव मालुंजकर, अशिस मेहता, रोटरी क्लब ऑफ खोपोलीच्या अध्यक्षा रो. सुनिता चव्हाण, सेक्रेटरी रो. नलीनी रामास्वामी, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. गौरव तिवारी व्यासपीठावर उपस्थित होते.

खोपोलीने शहर आणि खालापूर तालुक्यातील पूर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक १६ शाळांमधील शिक्षक आणि ३६ माजी मुख्याध्यापक नामांकीत शिक्षकांची निवड करून १०० गुरूजनांना नेशन बिल्डर अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रो. अजय पिल्ले, पाहुण्यांचा परिचय रो. राजेंद्र जगताप यांनी करून दिला.

आताच्या पिढीला शिकवताना शिक्षकांना मोठी तारेवरची कसरत करावी लागते, अशी खंत माजी उपनगराध्यक्ष कुलदिपक शेंडे यांनी व्यक्त केली. तसेच, आईवडील कामानिमित्ताने बाहेर असल्यामुळे मुलांचा कल मोबाइलकडे वळला असल्याचे दुर्दैव आहे. तरीही शिक्षक आदर्श विद्यार्थी घडविण्यासाठी काम करीत असल्याचे कौतुक शेंडे यांनी करीत शहराच्या विकासासाठी भविष्यात एकत्र काम करू, असे अभिवचन शिक्षकांना दिले.

**उपक्रमातून सामाजिक योजनांचा नागरिकांना लाभ** | **सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य**

# सुधागडमध्ये 'सेवा पंधरवडा' यशस्वीपणे साजरा

**। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।**

**शासनाच्या आदेशानुसार महसूल विभागामार्फत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेला 'सेवा पंधरवडा' उत्साहात पार पडला. महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा मानला जात असल्याने या उपक्रमाद्वारे सर्वसामान्य नागरिकांशी निगडित विविध महत्त्वाचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य देण्यात आले.**

१७ ते २२ सप्टेंबर दरम्यानच्या पहिल्या टप्प्यात 'पाणंद रस्ते विषयक मोहीम' राबविण्यात आली. सुधागड तालुक्यात राबगाव, तिवरे, आतोणे व माणगाव खुर्द या ग्रामपंचायतींमध्ये ग्रामस्थ, महसूल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी तसेच स्थानिक सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांच्या सहभागातून शिवार फेरी काढण्यात आली. या मोहिमेत आधीपासून नकाशावर असलेले ३ रस्ते व नव्याने निश्चित झालेले ३८ शेतरस्ते, पाणंद व वहिवाटीचे रस्ते नोंदविण्यात आले. एकूण ४१ रस्त्यांना भू-सांकेतिक क्रमांक देऊन ग्रामसभेत मंजुरी घेण्यात आली.

२३ ते २७ सप्टेंबर दरम्यानच्या दुसऱ्या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे' हा पूरक उपक्रम राबविण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या अतिक्रमणधारकांना निवासी जमिनींचे पट्टे देण्याच्या दृष्टीने पाहणी व मोजणी करण्यात आली. नगरपंचायत पाली क्षेत्रातील टेंभी वसाहतीतील ४६ अतिक्रमणांपैकी २० अतिक्रमणे पात्र आढळली. तर महागाव येथील गुरचरन जमिनीवरील ३७ अतिक्रमणे पात्र ठरली. या अतिक्रमणधारकांना जमिनींचे पट्टे वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आला असून लवकरच वाटपाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्थानिक गरजांनुसार नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले.

**जन्म नोंदणी दाखले वितरण :** कातकरी व इतर वंचित घटकातील ४८ विद्यार्थ्यांना जन्म आदेश देण्यात आले. यामुळे त्यांना आधारकार्ड व शैक्षणिक कागदपत्रे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

**सामाजिक निवृत्तीवेतन योजनांची पडताळणी :** तालुक्यातील एकूण १,५७४ लाभार्थ्यांपैकी उर्वरित २७६ लाभार्थ्यांची पडताळणी महसूल व मंडळ अधिकाऱ्यांनी घरी भेट देऊन पूर्ण केली.

**माजी सैनिक भेटी :** 'सैनिक हो तुमच्यासाठी' या उपक्रमांतर्गत महसूल अधिकाऱ्यांनी माजी सैनिकांच्या घरी भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

**आयुष्मान भारत कार्ड वाटप :** तहसील कार्यालय व तालुका आरोग्य विभागाच्या संयुक्त उपक्रमातून विविध ठिकाणी शिबिरे घेऊन ४२८ नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड वितरित करण्यात आले. यामुळे प्रत्येकी कुटुंबाला वर्षाकाठी ५ लाखांपर्यंत मोफत आरोग्य विम्याचा लाभ मिळणार आहे.

या 'सेवा पंधरवडा' उपक्रमाला सुधागड तालुक्यात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गावनिहाय फेऱ्या, ग्रामसभांमधील मंजुरी, अतिक्रमणांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण, घराघरांत जाऊन पडताळणी, शिबिरे अशा माध्यमांतून अनेक कामे वेगाने मार्गी लागली.

तहसील कार्यालय, सुधागड–पाली यांच्या पुढाकारामुळे तालुक्यातील शेतकरी, अतिक्रमणधारक, विद्यार्थी, सामाजिक योजना लाभार्थी तसेच आरोग्य सुविधांपासून वंचित नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळाल्याने सेवा पंधरवडा हा उपक्रम केवळ औपचारिक न ठरता लोकाभिमुख ठरला, अशी सर्वत्र प्रशंसा होत आहे.

## निवडक



### आर्पिता पाटील यांचा सन्मान

**पाताळगंगा :** शेती अर्थशास्त्राचा कणा असून या माध्यमातून आपणास खूप काही मिळत असते. शेती वाचली पाहिजे तसेच, ती लागवडीखाली आली पाहिजे, या उद्दात विचारांतून वरद विनायक सामाजिक संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेकडून शेतात अमुलाग्र बदल घडविणाऱ्या खालापूर तालुक्यातील २५ शेतकरी बांधावांना प्रगत शेतकरी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी महिला शेतकरी म्हणून अर्पिता पाटील, परखंडे यांचा प्रमाणपत्र समवेत वृक्ष देऊन सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम वावोशी येथील जेष्ठ नागरिक समाज हॉल येथे पार पडला. हा उपक्रम घेण्यामागील एकच हेतू की, शेतकरी बांधवास न्याय मिळावा. तसेच, शासनांच्या योजना तळा-गाळापर्यंत पोहचावे, यामुळे हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. विषेश म्हणजे, या माध्यमातून शेतकरी वर्गांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यात अप्ल शेतीत अधिक उत्पन कसे काढता येइल, या विषयावर भर देण्यात आला.



### कृत्रिम बुद्धिमत्ता कार्यशाळा

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपला विकास साधावा, असे प्रतिपादन केले. प्रथम इन्फोटेक फाउंडेशन एनजीओचे अधिकारी मा. प्रशांत भालेराव यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. कंपनीत मुलाखतीला कसे सामोरे जायचे, रेझ्युम कसा तयार करायचा, मुलाखत कशी द्यायची, सद्यस्थितीतील नोकरीच्या विविध संधी इत्यादी विषयी मार्गदर्शन केले व प्रश्नोत्तरे घेऊन विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. तसेच, एआयमधील विविध संधी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी प्रथम इन्फोटेक फाउंडेशनच्या मनीषा सुरवडकर उपस्थित होत्या.



### यु.ई.एस. स्कूलमध्ये स्वच्छता मोहीम

**उरण :** राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांचा २ ऑक्टोबर या दिवशी जन्मदिवस साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून संपूर्ण देशभर स्वच्छता मोहिमही राबवली जाते. याच मोहिमेचा भाग म्हणून बुधवारी (दि.१) यु.ई.एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स अ‍ॅण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीमध्येही स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी काही विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांना मानवंदना दिली. त्यानंतर स्वच्छता मोहिमेच्या अंतर्गत, सर्व विभागातील विदयार्थ्यांनी संपूर्ण स्कूल व कॉलेजचे वर्ग, शाळेबाहेरच्या आजूबाजूचाही परिसर स्वच्छ केला. सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, समन्वयक तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील शिक्षकवर्ग व यु.ई.एस. संस्थेचे संस्थापकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविली.



### उपप्राचार्यपदी डी.बी. म्हात्रे

**खोपोली :** खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या जनता कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्यपदी डी.बी. म्हात्रे, तर उपमुख्याध्यापकपदी डी.एस. महावरकर यांची निवड करण्यात आली. यांनी बुधवारी (दि.१) संस्थेचे कार्यवाह किशोर पाटील, उपाध्यक्ष अबू जळगांवकर यांच्या उपस्थितीत पदभार स्विकारला. दोन्हीही नवनिर्वाचित उपप्राचार्य आणि उपमुख्याध्यपकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जनता कनिष्ठ महाविद्यालयात पदभार सोहळ्याचे छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेचे कार्यवाह किशोर पाटील, उपाध्यक्ष अबू जळगांवकर,शालेय समितीचे अध्यक्ष कैलास गायकवाड,संस्थेचे पदसिध्द कार्यवाह कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक के.एम. गोरे आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### अपूर्वा जंगम यांना शिक्षक पुरस्कार



**माणगाव :** माणगाव येथील आदर्श शिक्षिका अपूर्वा अमोल जंगम यांना क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दि. २२ सप्टेंबर रोजी मुंबई येथे झालेल्या भव्यदिव्य अशा कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते आकर्षक सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व धनादेश देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार अपूर्वा जंगम यांनी आपल्या कुटुंबियांसमवेत स्वीकारला. शिक्षिका अपूर्वा जंगम यांना महाराष्ट्र शासनाचा हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाल्याने त्यांचे तालुक्यासह रायगड जिल्ह्यातून विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे. या पुरस्काराबाबत प्रसार माध्यमांजवळ बोलताना अपूर्वा जंगम यांनी सांगितले कि, या पुरस्कारात मला १ लाख १० हजार रुपये बक्षीसरूपी रक्कम मिळाली आहे. या १ लाख १० हजार रुपये बक्षीस रक्कमेतील २५,००० रुपये राजिप कशेणे शाळेसाठी दान देणार आहे. उर्वरित ८५ हजार रुपयांचे बँकेत सर्टिफिकेट काढणार व दरवर्षी त्यावर येणाऱ्या व्याजाच्या रक्कमेतून गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत किंवा वृद्धाश्रमात गरजेच्या वस्तू वाटप करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# ‘नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा’

■ शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान
■ उरण तहसील कार्यालयात निवेदन

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील चिरनेर परिसरात २७ व २८ सप्टेंबर रोजी झालेल्या हस्त नक्षत्राच्या परतीच्या पावसात भात शेतीचे मोठे नुकसान झाले असून, हाता तोंडाशी आलेले भाताचे पीक पाण्यात भिजवून वाया गेले आहे. पिकांची नासाडी झाली आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या भात पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाईची मदत मिळावी, यासाठी चिरनेरचे कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील व संजय पाटील यांनी शेतकऱ्यांच्या वतीने उरण तहसील कार्यालयात सोमवारी (दि.२९) निवासी नायब तहसीलदार महेश पाटील यांना हे लेखी निवेदन दिले आहे.



तालुक्यात औद्योगीकरण झपाट्याने वाढत असले तरी आजही या भागातील अनेक गावातील शेतकरी मोठ्या प्रमाणात पावसाळ्यात भात पिकांची शेती करतात. परंतु परतीच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर भात शेतीची नासाडी केली आहे. याआधी भात पिकांवर पडलेल्या रोगांच्या प्रादुर्भावातून या तालुक्यातील शेतकरी सावरतोय, तोच परतीच्या पावसाने सध्या या तालुक्यात दमदार हजेरी लावल्याने भाताची पिके जमिनीवर आडवी झाली आहेत. त्यामुळे येथील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

एकंदरीत पाऊस असाच पडत राहिला तर हातातोंडांशी आलेला घास हिरावून घेईल याची शेतकऱ्याना भीती वाटत आहे. जमिनीवर पडलेल्या भाताच्या दाण्याला मोड येण्याची वेळ आली असून, काही भातपिके हि पोटरीला येण्याआधीच कोसळून पडली आहेत. त्यामुळे शेतकरी धास्तावला आहे. यावर्षी भात पिके उत्तम आल्यामुळे येथील शेतकरी समाधानी दिसत होता. परंतु हे समाधान फार काळ टिकू शकले नाही. कारण हाता तोंडाशी आलेले पीक परतीच्या पावसाने हिरावून नेल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

दरवर्षी दसरा झाल्यानंतर भात कापणीला सुरुवात होते. त्यानंतर दिवाळी पूर्वी बांधणी करून पूर्ण होत असते. मात्र पावसाच्या भीतीने कापणी बांधणीची कामे लांबणीवर जातील असे मत येथील शेतकऱ्यांकडून व्यक्त केले जात आहे.

पावसामुळे शेतात पाणी असल्यामुळे उभी पीके जमीनदोस्त झाली आहेत. त्यामुळे नुकसान झालेल्या भात शेतीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

### जंगली प्राण्याचा मोठा धोका

**चिरनेर परिसरातील असंख्य गावे जंगल परिसरात असून येथे रानडुक्कर व माकडांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. ही जनावरे शेतात हैदोस घालत असून, उरल्या सुरल्या पिकांचे नुकसान करत आहेत, याचाही मोठा फटका शेतकऱ्यांना बसत असून, शेतकरी हवालदिल झाला आहे.**

## निवडक



### उरणमध्ये नवदुर्गांचा सन्मान

**उरण** : उरण तालुक्यामध्ये सन्मान नवदुर्गा कार्यक्रमाअंतर्गत उरण तालुक्यातील आशा वर्कर, डॉक्टर, प्राध्यापिका, बचतगट अध्यक्षा, गायिका, टेंपो चालवणाऱ्या ताई महिला भगिनींना सन्मानीत करण्यात आले. याप्रसंगी कुंदा ठाकुर, निर्मला ठाकुर,भारती कटेकर, उज्ज्वला ठाकुर, रंजना ठाकुर, प्रणाली घरत यांच्या हस्ते कला क्रीडा, संगीत, सांस्कृतिक धार्मिक, सामाजिक शैक्षणिक पत्रकारिता, राजकीय आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी नीता पाटील, ज्योती पाटील, प्रियंका पाटील, मीनाक्षी पाटील, कांचना पाटील, संगीता पाटील, कल्पना पाटील, कविता पाटील, अक्षता पाटील, नंदिनी पाटील, सुवर्णा ठाकूर, वंदना ठाकुर, रूपाली गणेश पाटील, ललिता बकले, निर्मला म्हात्रे, वैशाली म्हात्रे, चैताली म्हात्रे, कविता पाटील,कविता कुंभार या महिलांचा सन्मान करण्यात आला. तसेच तालुक्यातील विविध आदिवासीवाडी वरील आदिवासी महिलांचा देखील विशेष सत्कार- सन्मान करण्यात आला.




### आदिवासी बांधवांना ब्लँकेटचे वाटप

**उरण** : लायन्स क्लब ऑफ उरण गोल्डच्या वतीने सेवा सप्ताह आयोजित केला आहे. त्याचे औचित्त साधून डिस्ट्रीक्ट चेअरमन लायन ॲड. दत्तात्रेय नवाळे यांच्या वतीने बुधवार (दि.१)ऑक्टोबर रोजी विंधणे येथील अदिवासी बांधवांना १०० ब्लॅंकेटचे वाटप करण्यात आले. या वेळी लायन्स क्लब ऑफ उरण गोल्डच्या निरज कार्डीयन, संदीप म्हात्रे, निखील भोईर, मच्छिंद्र घरत, श्रेयस घरत, राजेद्र ठाकुर, रेखा घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

### देवकान्हेत गावदेवीचा उत्सव साजरा

**खांब** : देवकान्हे येथील गावाचे श्रद्धास्थान असलेल्या आई गावदेवी माता आई लक्ष्मी व बापदेव आदी देवांचा उत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. घटस्थापनेला आई गावदेवी, आई लक्ष्मी व बापदेव या देव-देवता मंदिरात घटी बसविल्यावर मंदिरात नित्यनेमाने सकाळ-संध्याकाळ पूजा अर्चा, पूजा पाठ, सायंकाळी हरिपाठ व रात्रौ.जागर भजन आदी धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने करण्यात आले.गावामध्ये नवचैतन्य निर्माण होऊन गावामध्ये धार्मिकतेचे स्वरूप प्राप्त झाले होते. दैवतांचे दर्शनासाठी त्यावेळी पुणे,ठाणे व मुंबई येथून फार मोठे भाविक भक्त गावामध्ये जमा झाले होते. गावातील प्रत्येकाची या मंदिरातील दैवतांवर मोठी श्रद्धा भक्ती असल्याने या मंदिरात गेली नऊ दहा दिवस ग्रामस्थांनी तसेच परिसरातील नागरिकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.




### खालापुर प्राथमिक आरोग्य केंद्राची रुग्णवाहिका सुरू

**खोपोली** : खालापूर तालुक्यातील खालापूर या तालुक्याच्या ठिकाणी असणारा प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी शासनामार्फत रुग्णांना अन्य ठिकाणी उपचाराची गरज पडल्यास ने आण करण्यासाठी २४ तास उपलब्धअसावी यासाठी १०८ रुग्णवाहिका सुरू होती या रुग्णवाहिकेत १४ ने २०२४ रोजी अलिबाग येथे पाठविण्यात आली होती परतीच्या प्रवासात या रुग्णवाहिकेला अपघात झाला होता अपघातानंतर सदरची रुग्णवाहिका दुरुस्तीसाठी पाठविण्यात आली मात्र वर्ष उलटून ही रुग्णवाहिकेची दुरुस्तीच सुरू होती त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला या ही समस्या सोडविण्यासाठी खालापूर येथील वैभव भोईर यांनी थेट राज्याच्या महिला बालकल्याण मंत्री आदीती तटकरे यांना कल्पना देऊन रुग्णवाहिका खालापूर आरोग्य केंद्राला मिळावी अशी मागणी केली होती. तटकरे यांनी येथील अधिकारी वर्गाकडून माहिती घेऊन रुग्णवाही देण्याच्या सूचना केल्यामुळे खालापूर आरोग्य केंद्रात १ ऑक्टोबर रोजी रुग्णवाहीका रुग्णांच्या सेवेसाठी दाखल झाल्याने खालापूरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

### बासरीवादने नागोठणेकर भारावले

**नागोठणे** : नागोठणे शहरातील मराठा आळीतील रहिवासी, उत्तम बासरी वादक तसेच कान्हा फ्लूट्स या बासरी वाद्याचे निर्माते निलेश पोटे यांचे चिरंजीव मेघ पोटे याने दसऱ्यानिमित्त ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता मंदिरात सादर केलेल्या बासरी वादनाच्या कार्यक्रमाने उपस्थित नागोठणेकर भारावून गेले. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर, विवेक देशपांडे, सचिन ठोंबरे, आनंद लाड, शेखर गोळे, बाळाराम पोटे, निलेश पोटे, नरेश भंडारे आदींसह उत्सव समितीचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. बासरी वादनाला सुहान बाईत याने तबला वादनाची तर नागोठणे आंगर आळीतील रणवीर नरेश भंडारे याने टाळ वादनाची साथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण धाडसे यांनी केले.



## कर्जतकरांकडून जीवनवाहिनीची पूजा



| कर्जत | प्रतिनिधी |

दररोज इच्छित स्थळी वेळेवर व न चुकता पोहोचविणाऱ्या प्रवाशांची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकल गाड्यांची पूजा गेल्या अनेक वर्षांपासून कर्जतकर दसऱ्याच्या निमित्ताने करतात. जीवन वाहिनीच्या पूजेची परंपरा अजूनही सुरु आहे. काही प्रवासी निवृत्त झाले तरीही ते जीवनवाहिनीच्या पूजेसाठी आवर्जून उपस्थित असतात. कर्जतहून सुटणाऱ्या बहुतांश लोकल गाड्यांची पूजा त्या-त्या गाडीने जाणाऱ्या प्रवाशांनी अगदी मनोभावे करून आपल्या जीवनवाहिनी बद्दल आदर व्यक्त केला.

पहाटे चार नंतर सुटणाऱ्या लोकल गाड्यांमधून चाकरमानी व व्यावसायिक दररोज प्रवास करतात. मुंबईला जाण्यासाठी सर्वात वेळेवर, सर्वात स्वस्त व सुरक्षित प्रवास म्हणजे रेल्वेचा त्यातच लोकल गाड्यांनी हजारो प्रवाशी जा-ये करीत असतात. याची उतराई दसऱ्याच्या दिवशी हे प्रवासी आपल्या जीवनवाहिनीची न चुकता पूजा करतात. या सर्व लोकल सकाळी ७ वाजून ५२ मिनिटांनी कर्जतहून सुटणाऱ्या लोकलचे प्रवासी फारच हौसी त्यांनी आपापले डबे सजविलेच शिवाय लोकलच्या पहिल्या डब्याचा पुढचा भागही सजविला होता. या लोकलचे मोटरमन समीर पाल आणि गार्ड दीपक कुमारांचा सत्कार असिफ मिर्झा यांनी केला.

### पनवेलमध्ये चित्रमय प्रदर्शनास सुरुवात

| पनवेल | प्रतिनिधी |

१ ऑक्टोबर २०१६ रोजी स्थापना झाल्यापासून मागील ९ वर्षांत पनवेल महानगरपालिकेने केलेल्या विविध विकासकामांची विभागनिहाय माहिती चित्रमय प्रदर्शनाच्या माध्यमातून आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये पनवेलकरांसमोर सादर करण्यात आली आहे. यावेळी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, कैलास गावडे, अनिल भगत, अरूणकुमार भगत, प्रकाश बिनेदार, बबन मुकादम, चारूशीला घरत, प्रिती जॉर्ज, सुरेखा मोहकर, सारिका भगत, निर्मला म्हात्रे, नीता माळी, रामदास शेवळे, प्रथमेश सोमण, डॉ. वैभव विधाते, उपायुक्त मंगला माळवे, अभिषेक पराडकर, मंगेश गावडे, केशव शिंदे, संजय कटेकर, निलेश नलावडे, संग्राम व्हारेकाटे, डॉ. रूपाली माने, सुबोध ठाणेकर, शहर अभियंता संजय कटेकर, डॉ. राजू पाटोदकर पालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पनवेलमध्ये दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर सराफांच्या दुकानात महिलांनी मोठ्या उत्साहात सोन्याची खरेदी केली.




दसऱ्यानिमित्त नवी मुंबई पोलीस मुख्यालय, कळंबोली येथे पारंपरिक शस्त्रपूजनाचा कार्यक्रम पार पडला.

## पराग बोरसेंचा अमेरिकेत सन्मान

| माथेरान | प्रतिनिधी |

आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेले भारतीय कलाकार पराग बोरसे यांना नुकताच त्यांच्या ‘द पियर्सिंग लूक’ या चित्रासाठी पेस्टल सोसायटी ऑफ द वेस्ट कोस्ट तर्फे दिला जाणारा ‘फाइन आर्ट कॉनोइस्सर अवॉर्ड २०२५’ मिळाला आहे. याआधी सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला त्यांना न्यूयॉर्क येथील पेस्टल सोसायटी ऑफ अमेरीकाकडून पुरस्कार मिळाला होता. १९८४ मध्ये स्थापन झालेली पेस्टल सोसायटी ऑफ द वेस्ट कोस्ट ही संस्था गेली ४० वर्षे पेस्टल कलाकारांच्या प्रोत्साहनासाठी कार्यरत आहे. त्यांच्या २०२५च्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनासाठी जगभरातून आलेल्या चित्रांमधून केवळ ९९ कलाकृती अंतिम निवडीसाठी स्वीकारल्या गेल्या. या स्पर्धेतील परीक्षक म्हणून प्रख्यात पेस्टल कलाकार कोलेट ओड्या स्मिथ यांनी निवड प्रक्रिया पार पाडली. या निवडीत पराग बोरसे यांच्या ‘द पियर्सिंग लूक’ या चित्राला विशेष मान मिळाला असून त्यांना १ हजार अमेरिकन डॉलर्स इतक्या रकमेचा पुरस्कार देण्यात आला आहे. दात्यांनी प्रायोजित केलेला हा पुरस्कार बोरसे यांना तिसऱ्यांदा पीएसडब्लूसीकडून मिळाला आहे. पुरस्कारप्राप्त चित्र सध्या लॉस एंजेलिसजवळील हिल्बर्ट म्युझियम ऑफ कॅलिफोर्निया येथे प्रदर्शित असून हे प्रदर्शन नोव्हेंबर अखेरपर्यंत सुरू राहणार आहे.



### रयत इन्स्पायर कार्यशाळा साजरी

**उरण** : रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, फुंडे येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३८ व्या जयंतीच्या निमित्ताने ‘रयत इन्स्पायर’ कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यशाळेत विविध उच्च माध्यमिक शाळेतून सुमारे १७५ गुणवत्ताधारक प्रथम २० मेरिट लिस्टमधील व विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

### नागोठण्यात गुरे चोरणारी टोळी जेरबंद

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठणे पिगोंडे गावच्या हद्दीतील मोकळ्या मैदानातून १८ सप्टेंबर रोजी २ गुरे चोरट्यांनी गाडीत भरुन रोहा बाजूकडे पळवून नेली होती. यासंदर्भात नागोठणे पोलीस ठाण्यात गुरे मालकाच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्हा पोलीस अधिक्षक दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांनी पोलीस पथक तयार करुन रसायनी पोलिसांच्या मदतीने २२ सप्टेंबर रोजी या गुन्ह्यातील दोन आरोपींना मोठ्या शिताफीने अटक केली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वेलशेत येथील गुरे मालकाच्या तक्रारीवरून नागोठणे पोलीस ठाण्यात चोरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर रसायनी पोलिसांच्या मदतीने या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेतला. त्यातली पापा इसा कच्ची (२९), व आलम अनिस शेख (२६) या दोघांना रसायनी पोलिसांकडून ताब्यात घेऊन २२ सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली. या आरोपींना १० ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

### दत्तवाडीत दसरा गणेशोत्सव

उरण : कातळपाडा येथील दत्तवाडीत दसरा गणेशोत्सव साजरा करण्याची अनेक वर्षाची परंपरा श्री गणराज मित्र मंडळ चिरनेर कातळपाडा मंडळातर्फे आजही जपली जात आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर गुरुवारी (दि.२) रोजी श्री गणरायाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली असून, विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम गणेशोत्सवाच्या कालावधी राबविले जात आहेत. याप्रसंगी हरेश बैकर, नितेश सिंग, विनोद बैकर, महेश परदेशी, अविनाश बैकर, निलेश परदेशी, संतोष वशेणीकर, सचिन केणी, प्रितेश गोंधळी, दिनेश केणी, गणेश मेस्त्री, अशोक येलमकर, सचिन कडू, समीर म्हात्रे, मयंक कलमकर व नैतिक केणी उपस्थित होते.

### कर्जतमध्ये झुगरेवाडी परिसरात विद्यार्थ्यांना वह्या वाटप

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या झुगरेवाडी परिसरातील शाळेत जिजाऊ संस्थेचे वतीने वह्या वाटप करण्यात आल्या. तालुका हा आदिवासी बहुल तालुका आहे या तालुक्यामध्ये ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज राहात आहे. जिजाऊ संस्थाकडून आता तालुक्यात देखील विविध उपक्रम राबले जात आहे.



ओलमण ग्रामपंचायतीमधील राजिप शाळा झुगरेवाडी, ऐनाची वाडी येथील जिल्हा परिषद शाळा, यासह कोतवाल वाडी आणि चई गावातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना आणि भीमाद्री माध्यमिक विद्यालय मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. त्यावेळी जिजाऊ संस्थेचे संजय जमदाडे, वैभव म्हसणे, जनार्दन पारधी, तसेच स्थानिक कार्यकर्ते भाऊ झुगरे, परशुराम झुगरे तसेच राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते शिक्षक सतीश घावट आदी उपस्थित होते.

**मेहनतीचे प्रतिकाला विशेष स्थान | स्थानिक महिला विक्रीतून रोजगार**

## दसऱ्यानिमित्त भाताच्या लोंबीना मागणी

| माणगाव | प्रतिनिधी |

दसरा सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारामध्ये झेंडूची फुले भाताच्या लोंबी व सोनालूची फुले यांची आवक झाली असून या सणासाठी निसर्गात उपलब्ध असलेल्या या वस्तूंना मोठी मागणी आहे.

दसरा हा विजय, ऐक्य आणि समृद्धीचा संदेश देणारा सण आहे. या सणाला धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या जितके महत्व आहे, तितकाच निसर्गाशी जोडलेला वारसा जपण्याचा संदेशही त्यातून मिळत असतो.

दसऱ्याच्या निमित्ताने झेंडूची फुले, भाताच्या लोंबी आणि सोनालुची फुले यांचा विशेष सन्मान केला जातो.



झेंडूची फुले दसऱ्याच्या सजावटीत झेंडूची फुले अत्यावश्यक मानली जातात. पिवळ्या व केशरी झेंडूच्या माळा, तोरणे आणि रांगोळ्या घराघरांत दिसतात. शुभत्व, उर्जा आणि आनंदाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या या फुलांचा वापर देवी-देवतांच्या पूजेत मोठ्या श्रद्धेने केला जातो. भाताच्या लोंबी शेतकऱ्याच्या मेहनतीचे प्रतिक असलेल्या भाताच्या लोंबीला दसऱ्याला विशेष स्थान आहे.

### आजही प्रथा कायम

**सोनालुची फुले सोनालु किंवा सोन्याच्या झाडाची फुले दसऱ्याला ङ्गसोनंफम्हणून एकमेकांना दिली जातात. या फुलांना ऐश्वर्य, मैत्री आणि ऐक्याचे प्रतीक मानले जाते. परंपरेनुसार सोनालुची फुले देऊन परस्पर संबंध दृढ करण्याची प्रथा आजही कायम आहे. या फुलांची १० ते २० रुपयांना जुडी करून विकली जाते.**

अन्नधान्याची संपन्नता आणि भरभराट दर्शविणाऱ्या या लोंबी ग्रामीण भागात देवांना अर्पण करून समाजामध्ये वाटल्या जातात. त्यामुळे कृषी संस्कृतीचे महत्व अधोरेखित होते.

स्थानिक महिला विक्री करतात व यातून रोजगारही मिळत आहे. या तीन नैसर्गिक प्रतीकांमधून दसरा सण आनंद, समृद्धी आणि समाजातील ऐक्याचा संदेश देतो. धार्मिक परंपरा, कृषी संस्कृती आणि मैत्रीचे बंधांचा संगम असलेला हा उत्सव लोकजीवनात नवचैतन्य निर्माण करणारा आहे.

# लायन्स मांडवातर्फे निसर्गबंध वृक्षारोपण




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**लायन्स क्लब ऑफ अलिबाग मांडवाच्या वतीने आयोजित निसर्गबंध वृक्षारोपण २०२५ या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा आणि जलसंधारणासाठी चेक डॅम भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला होता. मंगळवार, ३० सप्टेंबर रोजी अलिबाग तालुक्यातील चोरोंडे येथील क्रिकेट मैदानावर रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.**

यावेळी रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे म्हणाले की, रायगड जिल्ह्यात लायन्स क्लबचे कार्य उत्तमरित्या चालले आहे. अलिबाग, मांडवा, पोयनाड आदी लायन्स क्लबने सेवेचा आदर्श निर्माण केला आहे. तसेच, लायन्स हेल्थ फाऊंडेशनच्या चोरोंडे येथील निर्माणाधीन हॉस्पिटलसाठी आणि इतरही काही मदत लागल्यास ती देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने आपण तत्पर असू, असेही त्यांनी सांगितले.

निसर्गबंध उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात १५०० झाडांची लागवड करण्यात आली. पुढील टप्प्यात ५००० झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. केवळ झाडे लावून न थांबता, त्यांच्या योग्य संवर्धनासाठी नयन कवळे यांच्या सहकार्याने चेक डॅमचे भूमिपूजनदेखील करण्यात आले. या चेक डॅममुळे वर्षभर पाण्याची उपलब्धता सुनिश्चित होईल, ज्यामुळे झाडांचे संवर्धन आणि पाण्याचे शाश्वत नियोजन यांचा दुहेरी उद्देश साध्य होणार आहे.

या महत्त्वपूर्ण सामाजिक कार्यात सामाजिक संस्था, शाळा, महाविद्यालये आणि स्थानिक ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सक्रिय सहभाग घेतला. चोरोंडे क्रिकेट ग्राऊंडवर आयोजित या कार्यक्रमात जिल्ह्यातील रिजन ४ च्या १३ लायन्स क्लबचे सुमारे १५० सदस्य उपस्थित होते. लायन्स क्लब ऑफ अलिबाग मांडवा नेहमीच विविध सामाजिक कामांमध्ये अग्रेसर राहिला असून, हा निसर्गबंध उपक्रम पर्यावरणाच्या संवर्धनासाठी एक नवा आदर्श निर्माण करणारा ठरला आहे.

# महात्मा गांधी जयंती साजरी



**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहा विज वितरण कार्यालयात जगाला अहिंसा, सत्य आणि शिष्णूता याची शिकवण देणारे, राष्ट्रपिता महात्मा गांधी व देशाचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गाने म. गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्प मालिका वाहून आदरांजली अर्पण केली. यावेळी विज वितरण कंपनी रोहा कार्यालयाचे शहर अभियंता योगेश आभाळे, श्वेताली कोंडाळकर, करुणा माळी, शितल आठवले आदी कर्मचारी उपस्थित होते.

# ५०१ महिलांचा सन्मान

**। रोहा । प्रतिनिधी ।**

नवरात्रौत्सवानिमित्त यंदा रोहा शहर शिवसेनेच्या वतीने एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला. यात रोहा शहरातील ५०१ नवदूर्गा महिलांना भेट वस्तू व प्रमाणपत्र देऊन सन्मान व गौरव करण्यात आले.

आपल्या जीवाची आणि आरोग्याची काळजी न करता कुटूंबातील प्रत्येक सदस्यांसाठी सेवा देणाऱ्या महिला भगिनींचादेखील सन्मान होणे गरजेचे आहे, या उद्दात हेतूने घरातील गृहिणी, माता-भगिनींना घरोघरी जाऊन सन्मानपत्र व साडी वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. समाजात आपलीदेखील दखल घेतली जात असल्याने सन्मानित केलेल्या महिलांच्या चेहऱ्यावर आंनद ओसंडून वाहत होता.

शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. मनोज कुमार शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना रोहा शहर प्रमुख मंगेश रावकर यांच्या माध्यमातून नवदूर्गांचा सन्मान उपक्रम आयोजित करण्यात आला होत. गौरव करण्यात आलेल्या महिलांनी शिवसेनेचे स्थानिक नेते मंडळींचे विशेष आभार मानले.



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनकडून आमचे अशिल यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :-बांधिवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./प्लॉट नं. | क्षेत्र : हे.आर.चौ.मीटर. | आकार |
|---|---|---|---|
| १.अनिकेत दत्ताराम राणे,<br>२. पिंकी सुनील झा | १३६/२१ | २५० चौ.मीटर | २५० रु पैसे |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : सदनिका क्रं.१०८,
पहिला मजला, विंग बी, लक्ष्मी अपार्टमेंट
बांधिवली, ता.कर्जत, जि.रायगड.
ठिकाण : कर्जत

सही/-
**ॲड.सुर्यकांत भाऊ मसणे,**
दिनांक : ०३/१०/२०२५
मो.नं. ९९२२१५५१५३

**महाराष्ट्र शासन**
**महसूल वनविभाग**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु. अलिबाग**
मा. जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालयाचे आवारात अलिबाग ४०२२०१
दुरध्वनी क्र. ०२१४१ २२२४२८ Email: dslrraigad@gmail.com

क्र.अपील एस.आर.३७/२०२५ ता.माणगांव/जि.रायगड २०२५/२०९७ अलिबाग दिनांक १/१०/२०२५

जाहिर नोटीस
प्रति
१. निगार सुलताना अब्दुल गणी जुवले — **अपीलदार**
रा. साई, ता.माणगांव, जि.रायगड

**विरुद्ध**

१. उप अधीक्षक भूमि अभिलेख, माणगांव ता.माणगांव, जि.रायगड
२. रजिया नसरुद्दीन सोलकर
३. नूरजहाँ म.जाफर सोलकर
४. सौदाबी दाऊद सोलकर
५. म. अली म.जाफर सोलकर
६. मुमताज अ.अजिज सोलकर
७. सुलताना अ.लतिफ जालगांवकर
८. इम्रान अ.लतिफ जालगांवकर
९. तनवीर अ.लतिफ जालगांवकर
१०. तैसीम अ.लतिफ जालगांवकर
११. रफत इनुसमिया सोलकर
१२. खुर्शीद इसुफ बडे
१३. नुरबेगम मुबिन सोलकर
१४. म.इकबाल इनुसमीया सोलकर
१५. मैमुना इनुसमिया सोलकर
१६. म.आरीफ इनुसमीया सोलकर
१७. म.फारुख इनुसमीया सोलकर
१८. अजिम इनुसमीया सोलकर
१९ मुद्दसीर म.हनीफ सोलकर
२०. अब्दुल अजीज शहाबुद्दीन सोलकर
२१. अब्दुल कय्युम म. युसूफ सोलकर
२२. अब्दुल रहीम म. युसूफ सोलकर
२३. अब्दुल हननान म. युसुफ सोलकर
२४, अमिना शहजाद बंदरकर
२५. आतीफा अब्दुला म्हैसकर
२६ नसीमा म.युसुफ सोलकर
२७. नसीमा म.हनीफ सोलकर — जाबदार
२८. मुज्जमील म.हनीफ खोलकर
२९. आमिन हारून सोलकर
३०. मामुन हारून सोलकर
३१. मोतसीम हारून सोलकर
३२. मुबीन हारून सोलकर
३३. अंजुम तारीक काझी
३४. मासुम मकसुद रखांगे
३५. तबस्सुम मुजीब परकार
३६. तरन्नुम अशफाक काझी
३७. तन्सीम इकबाल सोलकर

क्र.२ ते ३७ रा.साई, ता.माणगांव, जि.रायगड

**विषय** :- मौजे साई, ता.माणगांव, जि.रायगड येथील सि.स.नं. ५४५, ५४६, ५४७, ५५६ व ५५७ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.

**संदर्भ** :- १. अर्जदार निगार सुलताना अब्दुल गणी जवले यांचा दिनांक २६/०६/२०२४ अपील अर्ज.
२. इकडील पत्र क्र. अपील क्र. ३७/२०२५/जा.क्र. १८८१ दिनांक २२/०८/२०२५

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपील प्रकरण दाखल करुन घेणेकामी सुनावणीची तारीख ०५.०८.२०२५, १९.०८.२०२५, ०९.०९.२०२५, २३.०९.२०२५ व ३०.०९.२०२५ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहीर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून सुनावणी पुढील तारीख ०७/१०/२०२५ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी सकाळी/दुपारी ११.०० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड मु.अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १/१०/२०२५

सही/-
**(सुनिल इंदलकर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**रायगड, मु. अलिबाग.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे निकोप, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री आत्माराम बाळकृष्ण झांजे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ४० | ३ | ०-२४-०० | ०.२५ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.०३/१०/२०२५.

**ॲड.सतीश धर्मा डायरे,**
पत्ता - ००२, शिवतीर्थ, सहयोग
को.ऑ.हौ.सो.ब्राम्हण आळी,
नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.९८५०४०२६५७.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे हुमगाव, ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिल श्री रातुल लहिरी यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक कृष्णकांत गोपाळराव पित्ती यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे.हुमगाव, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रु. पै |
|---|---|---|---|
| ७५ | २/अ | १-१५-४०<br>पैकी लिहुन देणार यांचे<br>०-९५-४० इतके विकत दिलेले क्षेत्र | ०-६३ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०३/१०/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभाग अलिबाग, जिल्हा रायगड यांजकडून
### अधिसूचना

क्रमांक/उविअ/कात-२/शहापूर/एसआर-०१/२०२३/२०२५,-ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगि विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.३) चे कलम १, पोट-कलम (३) अन्वये महाराष्ट्र उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.२०१९/(प्र.क्र.४५५)/उद्योग-१४, अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेच्या अनुसूचित विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रात दिनांक १२-१८ सप्टेंबर, २०१९ पासून लागू करण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे कलम ३२ अन्वये ज्या क्षेत्रात उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ लागू करण्यात आले आहे. या क्षेत्रातील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकस महामंडळास औद्योगिक किंवा उपरोक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी संपादन करण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनास प्रदान केले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाची शासन अधिसूचना क्रमांक आयडीसी/१८९२ (१७४४१)/उद्योग-१४, दिनांक ११ जून १९९३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ च्या नियम २८ नुसार सदर अधिनियमाच्या कलम ३२, कलम ३३, कलम ३६ व कलम ३८ चे अधिकार आणि कलम २(क) अन्वये उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभाग अलिबाग, जि.रायगड यांना कार्यान्वित करण्याचे अधिकारी देण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेले क्षेत्र महामंडळास धेरंड-शहापूर औद्योगिक क्षेत्र व विस्तारीत धेरंड शहापूर औद्योगिक क्षेत्रासाठी पोहोच रस्ता बनविण्यासाठी जमिनी संपादन करण्यात आलेल्या असून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(२), ३२(१), ३२(५) व कलम ३२(६) अन्वये कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तसेच जमिन मालकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम ३३(२) व ३३(३) अन्वये निवाडे घोषित करून नुकसानभरपाई वाटप करण्यात आली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(७) चा वापर करून सदरहू जमिनी उपरोक्त कारणांसाठी संपादीत करून व ताब्यात घेऊन ती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांजकडे हस्तांतरण करीत असल्याबाबतची अधिसूचना उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभाग अलिबाग हे प्रसिद्ध करीत आहेत.

**अनुसूची**

**मौजे शहापूर, तालुका अलिबाग, जिल्हा-रायगड**

| अ.क्र (१) | सर्व्हे नंबर (२) | हिस्सा नंबर (३) | जमिनीचे क्षेत्र हे.आर. (४) |
|---|---|---|---|
| १ | २४९ | १पै | ०.३४.१० |
| २ | २४९ | ३ पै | ०.००.७५ |
| ३ | २४९ | ४ पै | ०.२९.७० |
| ४ | २५० | ० पै | ०.४५.९० |
| ५ | २५२ | १ पै | ०.२१.४५ |
| ६ | २५१ | २ पै | ०.०२.१० |
| ७ | २५१ | ३ पै | ०.२३.४० |
| ८ | २५२ | ३ पै | ०.३५.९० |
| ९ | २५२ | ४ पै | ०.२१.०० |
| १० | २५३ | २ पै | ०.०२.४० |
| ११ | २५३ | ३ पै | ०.०७.१० |
| १२ | २४६ | १ पै | ०.२४.१० |
| १३ | २७१ | ५ पै | ०.२४.२५ |
| १४ | २७१ | ६ पै | ०.२३.२० |
| १५ | २७२ | ३ पै | ०.२५.८५ |
| १६ | २७२ | ४ पै | ०.०६.६० |
| १७ | २७२ | ५ पै | ०.०२.३० |
| १८ | २७२ | ६ पै | ०.०६.६० |
| १९ | २४० | २ पै | ०.४६.५५ |
| २० | २४० | ४ पै | ०.०५.४५ |
| २१ | २३९ | २ पै | ०.०३.३० |
| २२ | २४१ | ४ पै | ०.२१.२० |
| २३ | २४१ | ५ पै | ०.०२.७० |
| २४ | २३७ | १ पै | ०.१२.८० |
| २५ | २३७ | २ पै | ०.१९.२० |
| २६ | २३७ | ३ पै | ०.४०.८० |
| २७ | २८३ | १ पै | ०.१०.७० |
| २८ | २८३ | २ पै | ०.०४.४० |
| २९ | २८३ | ४ पै | ०.३६.४० |
| ३० | २८३ | ५ पै | ०.२०.०० |
| ३१ | २८२ | १ पै | ०.१३.९० |
| ३२ | २८२ | २ पै | ०.१७.८० |
| ३३ | २८२ | ३ पै | ०.११.९१ |
| ३४ | २८२ | ४ पै | ०.१७.३५ |
| ३५ | २७८ | १ पै | ०.२०.१० |
| ३६ | २७८ | २ पै | ०.०९.५० |
| ३७ | २७८ | ३ पै | ०.०४.२५ |
| ३८ | २७८ | ४ पै | ०.०५.५५ |
| ३९ | २७८ | ५ पै | ०.०७.१० |
| ४० | २७९ | १ पै | ०.०४.५० |
| ४१ | २७९ | २ पै | ०.०५.०० |
| ४२ | २७९ | ३ पै | ०.३४.६० |
| ४३ | ४१४ | २ पै | ०.०२.१० |
| ४४ | ४१४ | ३ पै | ०.०८.४५ |
| ४५ | ४१५ | १ पै | ०.४३.९० |
| ४६ | ४१५ | ४ पै | ०.००.८० |
| ४७ | ४१५ | ५ पै | ०.०२.३० |
| ४८ | ४१६ | १ पै | ०.४४.९० |
| ४९ | ४१६ | २ पै | ०.०२.७० |
| ५० | ४१७ | १ पै | ०.१७.०० |
| ५१ | ४१७ | २ पै | ०.३८.३० |
| ५२ | ४१७ | ३ पै | ०.०१.३० |
| ५३ | ४१७ | ४ पै | ०.१५.१५ |
| ५४ | ४१७ | ५ पै | ०.३०.५० |
| ५५ | ४१८ | १ पै | ०.०२.१० |
| ५६ | ४१८ | २ पै | ०.१२.७० |
| ५७ | ४९४ | १ पै | ०.१९.१० |
| ५८ | ४९४ | २ पै | ०.३२.०० |
| ५९ | ४९५ | ० पै | ०.७०.८५ |
| ६० | ४९८ | ३ पै | ०.६२.२० |
| ६१ | ४९९ | १ पै | ०.०५.५० |
| ६२ | ४९९ | २ पै | ०.१८.७० |
| ६३ | ५०० | १ पै | ०.१०.१० |
| ६४ | ५०० | ३ पै | ०.०७.८० |
| ६५ | ५०० | ४ पै | ०.११.९० |
| ६६ | ५०० | ५ पै | ०.३३.४० |
| ६७ | ५०३ | १ पै | ०.२४.३० |
| ६८ | ५०३ | २ पै | ०.०४.३० |
| ६९ | ५०३ | ३ पै | ०.६५.५० |
| ७० | ५०४ | २ पै | ०.२०.६० |
| ७१ | ५०४ | १ पै | ०.११.२५ |
| ७२ | ५१९ | २ पै | ०.३०.७० |
| ७३ | ५१९ | १ पै | ०.०९.४० |
| ७४ | ५२० | ० पै | ०.९७.०० |
| ७५ | ५९३ | ० पै | ०.०२.३० |
| ७६ | ५३० | १ पै | ०.३५.०० |
| ७७ | ५३० | २ पै | ०.३३.५३ |
| ७८ | ५३० | ३ पै | ०.२०.८५ |
| ७९ | ५३० | ४ पै | ०.२६.६० |
| ८० | ५२९ | १ पै | ०.०२.६० |
| ८१ | ५२९ | २ पै | ०.३१.२० |
| ८२ | ५२१ | २ पै | ०.०१.९५ |
| ८३ | ५२१ | ४ पै | ०.३६.८० |
| ८४ | ५२२ | १ पै | ०.९८.८५ |
| ८५ | ५२२ | २ पै | ०.१२.०० |
| ८६ | ५२२ | ३ पै | ०.०२.७५ |
| ८७ | ५२२ | ४ पै | ०.००.९५ |
| ८८ | ५१७ | १ पै | ०.०७.३० |
| ८९ | ५१७ | २ पै | ०.००.७५ |
| ९० | ५१७ | ४ पै | ०.०१.६० |
| ९१ | ५२३ | १ पै | ०.०१.९५ |
| ९२ | ५५० | १/१ पै | ०.४६.०० |
| ९३ | ५५० | १/२ पै | ०.१३.७० |
| ९४ | ५५१ | १ पै | ०.३५.१५ |
| ९५ | ५५१ | २ पै | ०.६१.६० |
| ९६ | ४३३ | ३ पै | ०.२५.२५ |
| ९७ | ४३२ | १ पै | ०.२६.८० |
| ९८ | ४३२ | ३ पै | ०.१५.१० |
| ९९ | ४३२ | ४ पै | ०.०८.९० |
| १०० | ४३१ | ४ पै | ०.१३.२५ |
| १०१ | ४३१ | ५ पै | ०.३९.१० |
| १०२ | ४२९ | ४ पै | ०.१३.९० |
| १०३ | ४२९ | ५ पै | ०.३६.१० |
| १०४ | ४२८ | १ पै | ०.०५.३० |
| १०५ | ४२८ | २/१ पै | ०.२७.६० |
| १०६ | ४२८ | २/२ पै | ०.११.१० |
| १०७ | ४२८ | ३ पै | ०.०७.३० |
| १०८ | ४२८ | ४/१ पै | ०.०९.४० |
| १०९ | ४२६ | १/१ पै | ०.१०.४० |
| ११० | ४२६ | १/२ पै | ०.१६.९० |
| | | एकूण | २२.०८.३९ |

ठिकाण - अलिबाग
**दिनांक २२ सप्टेंबर २०२५**
**क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/१५२/१२४९/२०२५**

**मुकेश चव्हाण**
**उपविभागीय अधिकारी,**
**अलिबाग, उपविभागीय अलिबाग.**

# पाण्यासाठी शेतकऱ्यांची धाव

## वरिष्ठांच्या आदेशानुसार दुरुस्ती, साफसफाई वेळेत पूर्ण करून पाणी देण्याचे सहाय्यक कार्यकारी अभियंता यांचे आश्वासन

**| कोलाड | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील कालव्याचे पाणी गेली अनेक वर्षांपासून दुरुस्तीच्या नावाखाली बंद आहे. त्यामुळे हे पाणी सोडण्यासाठी खांब देवकान्हे विभागातील शेतकऱ्यांनी बुधवारी (दि.१) कोलाड पाटबंधारे विभागाला निवेदन दिले आहे.



या निवेदनात, रोहा तालुक्यातील डोळवहाळ बंधारे कुंडलिका सिंचनाखाली उजवातीर कालव्याला डिसेंबर हंगामापासून सुरळीत पाणी सोडण्यात यावे, गेल्या वर्षी मे अखेर पाणी टंचाई म्हणून कालव्याला पाणी सोडले होते. दुरुस्तीची कामे पूर्ण न झाल्याने हे पाणी वेळेत सोडता आले नाही, मात्र तद्नंतर हे काम पूर्ण करण्यात आले आहे. तरी विभागीय शेतकरी व ग्रामस्थांनी समजून घेतले. तसे आता अजिबात खपवून घेणार नाही, असा गंभीर इशारा तळवली तर्फे अष्टमी, चिल्हे, धानकान्हे, देवकान्हे येथील शेतकऱ्यांनी दिला आहे. तर, कोणतीही सबब न देता डिसेंबर हंगामापासून कालव्याला पाणी सोडण्यात यावे. तसेच, त्या आधी त्याचे गाळ काढण्यात यावे, असे देखील निवेदनात म्हटले आहे. तसेच, कालव्याच्या पाण्यासाठी तालुक्यातील उजवातीर डावातीर कालव्याच्या ओलिताखाली शेती करणारे शेतकरी एकटवत धाम णसई, धाटाव, निवी, पाठोपाठ तळवली देवकान्हे विभागातील शेतकऱ्यांनी देखील निवेदन दिले आहे.

हे निवेदन कार्यकारी अभियंता मिलिंद पवार, उप कार्यकारी अभियंता अतुल आगवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कार्यकारी अभियंता श्वेता चिचुलकर, प्रथम लिपिक भूषण ठाकूर यांना देण्यात आले. यावेळी विभागीय शेतकरी रामचंद्र बामणे, मारुती खांडेकर, धनाजी लोखंडे, राम महाडिक, किशोर भोईर, रमेश महाडिक, धोंडू कचरे, पांडुरंग गोसावी, संदीप महाडिक, राम लोखंडे, रघुनाथ कोस्तेकर, दयाराम मरवडे, सुभाष बामणे, डॉ. श्यामभाऊ लोखंडे यांच्यासह विभागातील शेतकरी व पदाधिकारी उपस्थित होते.

> “दुरुस्ती कामे, साफसफाई वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन विभागाने करावे. तसेच, उन्हाळी हंगामातील भात पिक घेण्यासाठी पाणी वेळेत सोडले जाईल यावर भर देणे. कालव्याचे पाणी सोडण्याबाबत हयगय करू नये. प्रशासनाची दिरंगाई बिलकुल खपवून घेतली जाणार नाही. पावसाळी पिकांचा भरोसा राहिलेले नाही. त्यामुळे उन्हाळी हंगामातील पीक हक्काचा आणि शेतकऱ्यांच्या हातातील नजरेतील पिक आहे. या हक्काच्या पाण्यासाठी येत्या डिसेंबर आधी उजवातीर कालव्याला पाणी सोडा
> – मारुती खांडेकर, शेतकरी”

दरम्यान, या कालव्याची दुरुस्ती झाली आहे. तसेच, वरीष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वेळेत साफसफाई पूर्ण केली जाईल. पूर्वीसारख्या हंगामी नियमाद्वारे पाणी सोडले जाईल, तसेच त्याआधी पाहणी सर्वेक्षण केले जाईल, असे स्पष्ट आश्वासन कार्यकारी सहाय्यक अभियंता श्वेता चिचुलकर यांनी निवेदन प्रसंगी दिले आहे. तर कालवा काठी वास्तव्य करत असलेल्या ग्रामस्थांनी कालव्यात कचरा टाकून घाणीचे साम्राज्य करू नये, ते स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करा. त्याचे पाणी दूषित करू नये, असे देखील चिचुलकर यांनी सूचित केले आहे.

# निवडक

## रोह्यात दुर्गादौड उत्साहात संपन्न

**चणेरा :** रोह्यात भल्या पहाटे शेकडो तरुण व महिला भगव्या वेशात दौडले. यावेळी ‘जय भवानी, जय शिवाजी’च्या जयघोषाने शहरातील वातावरणात एकतेचं, शक्तीचं आणि राष्ट्रप्रेमाचं दर्शन घडवून आणले. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान यांच्यावतीने दुर्गादौडचे आयोजन करण्यात आले होते. राजेश काफरे यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ११ वर्षे हा उपक्रम सुरू आहे. भल्या पहाटे तलवारी व भगवा ध्वज पूजनाने दुर्गादौडचा शुभारंभ करण्यात आला. दुर्गा माता मंदिरातून दुर्गादौडला सुरुवात झाली. शेकडो तरुण, महिला भगव्या वेशात सहभागी झाले होते. रोहा शहरातील प्रमुख मार्गांवरून दौड करत श्री धावीर मंदिरात पूजा व दर्शन घेऊन पुन्हा दुर्गा माता मंदिरात सांगता करण्यात आली. यावेळी सहभागी धारकऱ्यांचा उत्साह शिगेला पोहचला होता. गेली अकरा वर्षे ही दौड अविरत सुरु असल्याने रोहेकरांनी धारकऱ्यांचे कौतुक केले.





## महाविद्यालयात मार्गदर्शन शिबीर

**पाली :** सुधागड एज्युकेशन सोसायटीचे शेठ ज.नौ. पालीवाला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने सोमवारी (दि.२९) विकसित भारत २०४७ व स्वयंसेवक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक डॉ. प्रवीण गायकवाड हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल झेंडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांची जबाबदारी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाची वाटचाल, राष्ट्रीय सेवा योजना विभाग महाविद्यालयाचा पाया, याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. एस.ए. पाटील, डॉ. अनिल झेंडे, अंजली पुराणिक, स्नेहल बेलवलकर, अस्मिता पाटील, डॉ. भारती आरोटे, भक्ती साजेकर, श्रद्धा भोईर, संदेश गावडे, संतोष भोईर, काळकुटे, हर्षिता घोसाळकर, रुकसार महाडकर आदी उपस्थित होत्या.



## चौकमध्ये नेत्र तपासणी शिबीर

**पाताळगंगा :** जय भवानी सार्वजानिक नवरात्र उत्सव मंडळ चौकच्यावतीने नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, ज्या व्यक्तींना मोतिबिंदू झाल्याचे निदर्शनास आले त्या रुग्णांना डॉ. हळदीपूरकर यांचे लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्यावतीने मोफत डोळ्यांची शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी अमोल सकपाळ, सचिन गानू, संकल्प जोशी, गिरीश जोशी, कृष्णा मुकादम, जय पाटील, प्रशांत नेमाने, प्रतीक खंडागळे, कुमार चौधरी आणि सामाजिक कार्यकर्ते यशवंत सकपाळ यांचे मोलाचे योगदान लाभले.

## पथदिव्यांमुळे श्रीवर्धन उजाळले

**श्रीवर्धन :** बीपीसीएल सीआरएस फंडातून मिळालेल्या निधीच्या तरतुदीमुळे श्रीवर्धन शहराच्या कमानीपासून समुद्रकिनाऱ्याकडे जाणाऱ्या सर्व मार्गांवरती सौरऊर्जेवर चालणारे पथदिवे व हायम स्ट लावण्यात आले आहेत. या सौरउर्जेवर चालणाऱ्या पथदिवे व हायमास्टचे लोकार्पण खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. बुधवारी (दि.१) संध्याकाळी साडेसात वाजता हा सोहळा पार पडला व श्रीवर्धन शहराला एक वेगळीच झळाळी मिळाली. यावेळी शहरातील रस्ते उजळून निघाले होते. अनेक वेळा सायंकाळच्या वेळेस वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर श्रीवर्धन येथे फिरायला येणाऱ्या पर्यटकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत असे. कारण रस्त्यावरती पूर्णपणे अंधाराचे साम्राज्य पर्यटकांना पाहायला मिळायचे. परंतु, आता वीज पुरवठा खंडित झाली तरीही श्रीवर्धन शहरातील समुद्रकिनाऱ्यावर जाणारे सर्व मार्ग सौरऊर्जेवर चालणाऱ्या पथदिव्यांमुळे उजळून निघणार आहेत.

## ‘स्वच्छता हीच खरी सेवा’

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

विद्यार्थ्यांसह सर्वांनी व्यक्तिगत व कार्यालयीन जीवनामध्ये स्वच्छता ही सेवा धर्म मानुन कार्य करावे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे यांनी केले. कोकण उन्नती मित्र मंडळ वसंतराव नाईक कॉलेज बॅरिस्टर ए.आर. अंतुले शैक्षणिक संकुल एनएसएस युनिट १० च्यावतीने महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम राबविली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी एन. एस.एस प्रमुख श्रीशैल बहिरगुडे, कार्यक्रम अधिकारी गजानन मुनेश्वर, डॉ.सुभाष म्हात्रे, डॉ.नारायण बागुल, डॉ.सीमा नाहिद, सिद्धेश सतविडकर, प्रवेश पाटील, मुस्कान रजाक, रुपी आसवारे, प्रणव बागवे, चिंतन पोतदार, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## आरक्षण वर्गीकरणाला तीव्र विरोध

**| वावोशी | प्रतिनिधी |**

अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे वर्गीकरण करून समाजात फूट पाडण्याचे धोरण विद्यमान सरकारने राबवले असून, त्याविरोधात रिपब्लिकन सेनेने तीव्र संताप व्यक्त केला आहे. या धोरणामुळे सामाजिक सलोखा धोक्यात येत असून अनुसूचित जातींमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा गंभीर इशारा रिपब्लिकन सेनेने दिला आहे. दरम्यान, २७ सप्टेंबर रोजी एनडीटीव्ही चॅनलवरील चर्चासत्रामध्ये लक्ष्मण ढोबळे यांनी नवबौद्ध समाजाबाबत केलेल्या वक्तव्याचा रिपब्लिकन सेनेने निषेध नोंदवला आहे. या वक्तव्यामुळे समाजामध्ये संतापाची लाट उसळली असून संतापाचा भडका उडाल्याचे जिल्हा पदाधिकाऱ्यांनी सांगितले.




या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी राज्यभर आंदोलन करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार रायगड जिल्ह्यातही आंदोलनाची जोरदार तयारी सुरू असल्याचे जिल्हा अध्यक्ष अमित गायकवाड आणि जिल्हा महासचिव वैभव केदारी यांनी स्पष्ट केले. तसेच, यासंदर्भातील निवेदन रायगडचे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनाला देण्यात आले आहे.



## दिव्यांग बालकांसाठी तपासणी शिबीर

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्हा परिषद रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बालकांसाठी विशेष तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे स्वरूप विधी स्वयंसेवक सुशील साईकर यांनी समजावून सांगितले. त्यांनी म्हटले की, अनेकदा मुलांना आजार असतात पण घरच्यांना त्याची माहिती नसते, त्यामुळे जिल्हा परिषद शाळांमधून नियमित तपासणी केली जाते. निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण शिंदे यांनी सांगितले की, शासनाचे सेवा पंधरवडा सुरू असून ३ ऑक्टोबरपासून कॅन्सर व्हॅन फिरणार आहे. तसेच, ‘सशक्त नारी, सशक्त परिवार’ हे अभियान राबवले जात आहेत. आज दिव्यांग बालकांसाठी हे शिबीर आयोजित केले असून त्यांना आवश्यक तपासणी व प्रमाणपत्र मिळणार आहे, असेही त्यांनी नमूद केले. या शिबिराला निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण कानडे, डॉ. पवार, असिस्टंट मेट्रन भोपी, मोकल, समाजसेवा अधीक्षक दिव्यांग विभाग प्रतिमा फडतरे, विशाल भांदुर्गे, जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## शाळेचे मैदान झाले स्वच्छ

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

कोकण ऐज्युकेशन सोसायटी माध्यमिक शाळा माजगांव येथे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात गवताचे साम्राज्य निर्माण झाले होते. या ठिकाणचे गवत विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरत होते. त्यामुळे येथील सामाजिक कार्यकर्ते मारुती ढवालकर यांनी स्वखर्चाने गवताची छाटणी करुन विद्यार्थी व शिक्षकांना दिलासा दिला आहे. ही शाळा आठवी ते दहावीपर्यंत असल्यामुळे या परिसरातील विद्यार्थी शिक्षण घेण्यांसाठी येत असतात. मात्र, या ठिकाणी वाढलेल्या गवतामधून मार्ग काढताना अनेक समस्या निर्माण होत होत्या.



## पतसंस्थेतर्फे सेवा पंधरवडा

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

तालुक्यातील श्रमजीवी जनता सहायक मंडळ आणि सावित्री आदिवासी सहकारी पतसंस्थेच्या संयुक्त कार्यक्रमप्रसंगी महसूल व वन विभागाच्या सेवा पंधरवडा अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तहसिलदार घोरपडे यांनी यापूर्वीच्या जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमप्रसंगी आदिवासी समाजाचे जातीचे दाखले, रेशनकार्ड यांचे वाटप करण्यात आले होते. त्याचप्रकारचे दाखले व रेशनकार्ड वाटप सेवा पंधरवडानिमित्त करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महाड उपविभागीय अधिकारी ओमासे, पोलादपूर तहसिलदार कपिल घोरपडे, पुरवठा अधिकारी आबा जगताप, मंडळअधिकारी मंगेश पवार व फुलचंद राठोड, श्रमजीवीचे राम कोळेकर, विठ्ठल कोळेकर, अशोक पागे, राजाराम पाटील, मेधा कदम, विजया पाटेकर, दीपक साबळे, पांडुरंग वाघे, काशिनाथ पवार, चंद्रकांत निकम, संजय वाघमारे, शंकर पवार आणि विनायक वाघे उपस्थित होते.

## धम्म प्रवर्तन दिन साजरा

**पनवेल :** तालुक्यातील खांदा वसाहत येथील मूलगंध कुटी बुद्ध विहार येथे धम्म प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सांस्कृतिक मंडळ व भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला अध्यक्ष दिनेश जाधव, सचिव सुरेखा वाघमारे, चंद्रसेन कांबळे, महेंद्र कांबळे, रमेश गायकवाड, संदीप भालेराव, विनोद साळवे आदी उपस्थित होते.



● मुनवली-अलिबाग येथे अनमाने परिवाराचे स्थानापन्न कुलदैवत (छायाचित्रः अब्दुल सोगावकर)

## पालीत धम्म मेळावा उत्साहात

**पाली :** सुधागड तालुका बौद्धजन पंचायत मुंबई यांच्या विद्यमाने गुरुवारी (दि.२) पालीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहात धम्मचक्र प्रवर्तन दिन व चक्रवर्ती सम्राट अशोक विजयादशमी दिनानिमित्त धम्म मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सुप्रिम कमिटी मुंबईचे अध्यक्ष मारुती गायकवाड हे होते. स्वागताध्यक्ष म्हणून तालुका मध्यवर्ती कमिटीचे अध्यक्ष दिपक पवार हे उपस्थित होते. सूत्रसंचालन तालुका मध्यवर्ती कमिटीचे सरचिटणीस नरेश शिंदे यांनी केले. तर, मुख्य प्रवचन सुप्रिम कमिटी मुंबईचे सरचिटणीस सिद्धार्थ कांबळे आणि भंते बोधी यांनी दिले.



## ज्येष्ठ नागरिक दिन साजरा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

मेरा युवा भारत अलिबाग यांच्या अंतर्गत प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग, स्वयंसिद्ध सामाजिक विकास संस्था रोहा व स्पर्धा विश्व अकॅडमी अलिबाग यांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला. मेरा युवा भारतचे जिल्हाधिकारी अमित पुंडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली परहूर येथील श्री समर्थ कृपा वृद्धाश्रमात नागरिकांसोबत संवाद साधण्यात आला. यावेळी श्री समर्थ कृपा वृद्धाश्रमाचे संचालक ॲड. जयेंद्र गुंजाळ यांनी या आश्रमाविषयी माहिती दिली. तर, ॲड. निहा राऊत यांनी वृद्धांचे मानसिक व शारीरिक स्वास्थ्य चांगले राहावे याकरिता मार्गदर्शन केले. तर, जिल्हा युवा अधिकारी अमित पुंडे यांनी आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरित

**उरण :** सीआयएसएफ वॉर्डमधील गुणवंत विद्यार्थ्यांना १.२५ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची शिष्यवृत्ती रक्कम वितरित करण्यात आली आहे. नवीन नियमांनुसार, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सर्व सीआयएसएफ वॉर्डना डीजी शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. सीआयएसएफ कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (सीआयएसएफ) डीजी मेरिट शिष्यवृत्ती योजनेत मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे, ज्यामुळे शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सीआयएसएफ कर्मचाऱ्यांच्या सर्व मुलांना फायदा होणार आहे.

**बोरगावात नवरात्रीचा जल्लोष | विविध वेशभूषांचे थरारक प्रयोग**

## हॅशटॅग ‘माझा गाव, माझा उत्सव’ला प्रचंड प्रतिसाद

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील बोरगाव गावात नवरात्र उत्सव म्हटला की भक्ती, परंपरा आणि जल्लोष हा असतोच. याच काळभैरव बोरघर गावात हा उत्सव भन्नाट पद्धतीने रंगला होता. मंदिर परिसरात मनोभावे पूजा-अर्चा आणि काळभैरव देवतेची जागृत सेवा सुरू असतानाच, गावातील तरुणाईने परंपरा व आधुनिकतेचा संगम घडवत नवरात्रीला नवा आयाम दिला आहे. गावातील तरुण मंडळी, माता-भगिनी, लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांचा उत्साह पाहून प्रत्येकजण दंग होत आहे. या उत्सवात विविध वेशभूषांचे थरारक प्रयोग आकर्षणाचा विषय ठरले आहेत.



यावेळी लग्नसमारंभातील देखणी मिरवणूक, गुजराती पारंपरिक पेहरावात थिरकणारे दांडिया नृत्य, शंकर-पार्वती व गणेश वेशभूषा, भात झोडणी परंपरा, गंगुबाई नॉन मॅट्रिक व दादा कोंडके शैलीतील विनोदी परिभाषा, वारकरी संप्रदाय ते जंगली मानव यांची झलक, कोळी जीवनपट साकार करणारी मंडळी, साईबाबा व देवीच्या विविध रूपांचे दर्शन, क्रिकेट संघाचा हटके अविष्कार, दक्षिणात्य वेशभूषा, बेवड्याचे लिवर विनोदी सादरीकरण, ज्योतीबा-वासुदेव परंपरा, भंगार वाला, चेटकीन व माकड रूप अशा भन्नाट कलाकृतींनी संपूर्ण गाव थरारून गेले आहे. गावकऱ्यांच्या या उपक्रमांना ‘माझा गाव, माझा उत्सव’ या इंस्टाग्राम हॅशटॅगखाली प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. प्रत्येक व्हिडिओला शेकडो व्ह्यूज देखील मिळाले आहेत. सोशल मीडियावर ही धमाल नवरात्र उत्सवाची रंगत आणखी वाढवत आहे.

सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांची मेजवानी यावेळी केवळ वेशभूषा आणि नृत्याच नव्हे तर स्वच्छता अभियान, महिला सबलीकरणावरील व्याख्याने, वारकरी गीते, सामूहिक आरत्या, दांडिया आणि भजनांनी उत्सवाची शोभा वाढवली आहे.

**सोशल मीडियावर उत्सवाची धुमाकूळ**

**या नवरात्रोत्सवाची खरी प्राणशक्ती काळभैरव मंदिर आहे. येथे रोज भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित राहून मनोभावे पूजा-अर्चा करतात. हे देवस्थान गावाचे जागृत व अभिमानस्थान मानले जाते. काळभैरव बोरघर नवरात्र उत्सवाने गावातील परंपरा, भक्ती, जल्लोष आणि आधुनिकता एकत्र आणली असून, हा उत्सव आता सोशल मीडियावरही धुमाकूळ घालत आहे.**

## सेवा पंधरवडा मेळाव्याचे आयोजन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत सेवा पंधरवाडा साजरा करण्याच्या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या होत्या. या शासन निर्णयानुसार एकुण तीन टप्प्यांमध्ये अभियान राबविण्यात आले. त्याअनुषंगाने या अभियानाचे आयोजन मंगळवारी (दि.३०) पनवेल तालुक्यातील सिद्धीविनायक मंगल कार्यलय बेलवली येथे महसुल खात्यातर्फे करण्यात आले होते.



या कार्यक्रमावेळी कोकण विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी हे प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते. यावेळी आदीवासींना सामुदायिक वन हक्क जमिनींचे २ नकाशे, २२ रेशनकार्ड, ५० जातीचे दाखले, २ आयुष्यमान भारत कार्ड व जिवंत सातबारा मोहीम अंतर्गत २ सातबाराचे वाटप करण्यात आले. यावेळी कष्टकरी मुक्ति संघटनेचे अध्यक्ष मधुकर पाटील यांनी रायगड जिल्ह्यातील आदिवासींच्या प्रमुख समस्या मांडल्या व त्या सोडविण्यासाठी शासनाने अभियान राबविण्याचे आवाहन केले. तसेच, या सुचनांचा स्विकार करुन त्या सोडविण्यासाठी लवकरच प्रशासनाला आदेश देण्याचे आश्वासन डॉ. विजय सुर्यवंशी यांनी दिले.




## राशीभविष्य

- **मेष :** व्यवसायात साधारण स्थिती राहील. अमिषाला बळी पडू नका. आर्थिक व्यवहारात सावध रहा.
- **वृषभ :** मनाजोग्या घटना घडतील. प्रगतीच्या संधी लाभतील. उद्योगात नव्या बदलासाठी प्रयत्न होतील.
- **मिथुन :** कलाकारांचा उत्साह वाढेल. विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागेल. संयम बाळगावा.
- **कर्क :** नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. प्रवासाचे बेत लांबणीवर टाकावे. धावपळ, दगदग होईल.
- **सिंह :** कामाचा उत्साह वाढता राहील. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. प्रगतीच्या संधी लाभतील.
- **कन्या :** आर्थिक समस्या संभवतात. कौटुंबिक मतभेद टाळावेत. सांस्कृतिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **तूळ :** नोकरी-व्यवसायात बदलाचा विचार होईल. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. विचारानं रहावं.
- **वृश्चिक :** सरकारी कामांमध्ये प्रगती होईल. बेरोजगारांना दिलासा मिळेल. आर्थिक समस्या सुटतील.
- **धनु :** चिंता वाढवणाऱ्या घटना संभवतात. बोलण्यातून गैरसमज निर्माण होतील. विचारानं रहायला हवं.
- **मकर :** व्यवसायात नवीन संधी चालून येतील. महत्त्वाच्या कामांबाबत दिलासा मिळेल. समाधानी रहाल.
- **कुंभ :** सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल. मानसिक स्वास्थ्य लाभणार आहे.
- **मीन :** अपेक्षित वार्ता कानी येईल. मित्र-मैत्रिणींचं सहकार्य लाभेल. जुनी दुखणी पुन्हा उद्‌भवतील.

## ३ ऑक्टोबर — दिनविशेष

**१७७८ :** कॅप्टन जेम्स कूक अलास्का इथे दाखल.
**१९४२ :** जर्मनीतील पीनेमुंडे तळावरुन व्ही-२ ए-४ क्षेपणास्त्राचं प्रक्षेपण. हे क्षेपणास्त्र म्हणजे सर्वप्रथम अंतराळात पोहोचलेली मानवनिर्मित वस्तू होती.
**१९८५ :** स्पेस शटल अटलांटिसने अंतराळात प्रथमतः झेप घेतली.
**२०१३ :** केंद्रीय मंत्रिमंडळाने वेगळ्या तेलंगण राज्याच्या निर्मितीसाठी केंद्रीय मंत्रिगटाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला.

## आरोग्यमंत्र — टायफॉईड ठरतो घातक

आज टायफॉइडविषयी जाणून घेऊ. टायफॉईड हा एक जटील विकार असून त्याला विषमज्वर किंवा मुदतीचा ताप या नावानेही ओळखतात. 'साल्मोनेला टायफी' नावाच्या जिवाणुंमुळे होणाऱ्या या आजारात रुग्णाला भयंकर ताप येतो. हा ताप सुमारे तीन आठवडे राहतो. अर्थात त्वरित उपचार घेतल्यास रोग लवकर आटोक्यात येतो. मात्र उपचार न घेतल्यास रोगी मरण पावण्याची शक्यताही असते. म्हणूनच या आजाराची दहशत बघायला मिळते. या रोगात सतत जास्त ताप असतो, थकवाही जास्त येतो, पोट दुखतं. दुसरं म्हणजे साधारणत: कोणत्याही तापामध्ये नाडीचा दर वाढलेला असतो. विषमज्वरात मात्र तापाच्या मानाने नाडीचा दर कमी असतो. हे रोगाच्या निदानासाठी खूप महत्त्वाचं आहे. टायफॉइड झालेल्या रुग्णाच्या विष्ठेतून या रोगाचे जिवाणू बाहेर पडतात. या विष्ठेचा अन्न, पाणी किंवा हाताशी संपर्क आल्यास दूषित अन्न, पाणी वापरणाऱ्या व्यक्तींच्या पोटात ते जीवाणू प्रवेश करतात. माशादेखील विष्ठेतील जीवाणू उघड्यावर ठेवलेल्या अन्नपदार्थांपर्यंत पोहोचवतात. हे जंतू निरोगी माणसाच्या आतड्यात पोहोचल्यानंतर लसिकाग्रंथीमध्ये वाढतात आणि तेथून रक्तात जातात. कालांतराने विषमज्वराची सर्व लक्षणे दिसून येतात. शरीरात जिवाणूंचा प्रवेश होऊनदेखील काही व्यक्तींना रोग होत नाही. मात्र त्यांना आजार होत नसला, तरी मलावाटे जिवाणू बाहेर पडत असतात. म्हणून या लोकांना रोगवाहक असं म्हणतात.



## दोस्त हे मस्त — गॉल्डियन फिंचच्या विश्वात

गॉल्डियन फिंच हा असाच एक सुंदर आणि आकर्षक असा पक्षी! त्याच्या शरीरावर अनेक रंग असतात. उत्तर ऑस्ट्रेलिया, न्यू गयाना आणि आसपासच्या परिसरात तो आढळतो. तो गवताळ भागात राहतो. नदीकिनारी असलेल्या झाडांवरही तो राहतो. साडेपाच ते सहा इंच आकाराचा हा पक्षी गवताच्या बियांवर वाढतो. त्याच्या शरीरावर तीन ते चार रंग असतात. या पक्ष्याकडे बघत बसावं असं वाटतं. बहुसंख्य फिंचचा चेहरा काळपट असतो तर काही फिंचचा चेहरा मरून, तपकिरी रंगाचा असतो. सर्वसाधारणपणे काळ्या तोंडाचे फिंच आढळतात. पिवळ्या किंवा सोनेरी रंगाच्या चेहऱ्याचे फिंचही असतात पण त्यांचं प्रमाण फारच कमी आहे. या पक्ष्यांचं घरटं गोलाकार असतं. ते छान पोहतात. नर आणि मादी मिळून पिलांची काळजी घेतात. पिलांची एक गंमत असते मित्रांनो... चोचीच्या बाजूला चमकणारा उंचवटा असतो. रात्रीच्या वेळी पिलांना भरवताना चोच दिसावी यासाठी ही सोय करण्यात आली असावी! सुरूवातीला पिलांना पंख नसतात. मोठ्या पिलांचे पंख रंगीबेरंगी नसतात. काही काळानंतर त्यांचा रंग बदलतो.

## स्टाईल स्टेटमेंट — एथनिक्सना द्या हटके लूक!

नवरात्र, दसरा, दिवाळीनंतर लग्नसराईला सुरूवात होणार आहे. येत्या फेस्टिव सीझनमध्ये तुम्हाला हटके लूक कॅरी करायचा असेल तर इंडो-वेस्टर्न फ्युजन वेअर ट्रेंड फॉलो करा.

✼ खूप वेगळं काही करायचं नसेल पण ट्रेंडी दिसायचं असेल तर फ्रंट स्लीट कुर्ता आणि धोती किंवा ट्युलिप पँट कॅरी करा. भरपूर भरतकाम तसंच नक्षीकाम केलेले क्रॉप किंवा पेप्लम टॉपच्या कुटुंबातले भरजरी कुर्ते बोल्ड रंगाच्या सिल्क धोतीसोबत तुम्ही कॅरी करू शकता. हा लूक तुम्हाला फेस्टिव लूक देईल. शिवाय तुम्हाला आरामदायीही वाटेल. हा लूक खुलवण्यासाठी ट्रेंडी झुमके घालता येतील. मॅटे लिपस्टिक आणि न्यूड मेक अप यामुळे तुम्ही छान दिसाल.

✼ जंपसूट्सनाही तुम्ही एथनिक लूक देऊ शकता. असा लूक देण्याचा सोपा आणि साधा मार्ग म्हणजे लेहरिया, कलमकारी, अजराकसारख्या पारंपरिक प्रिंट्सचे जंप सूट तयार करून घेणं किंवा जंप सूटवर भरजरी दुपट्टा, नक्षीकाम केलेले बेल्ट, जुती, स्टेटमेंट ज्वेलरी कॅरी करणं. प्रयोग करायला घाबरत नसाल तर जंप सूटवाला लूक तुम्ही कॅरी करू शकता.

(क्रमश:)

## पंचांग

**शुक्रवार ३ ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
अश्विन शु. ११, चंद्रराशी : मकर,
योग : धृति, नक्षत्र : श्रवण,
सूर्योदय ६.३२, सूर्यास्त ६.२३

## फॉरवर्डस

**अब कहाँ दुआओं में वों बरकतें.. वों नसीहतें.. वों हिदायतें...**

**बस अब तों ज़रूरतों क़े जुलूस .. हैं औऱ मतलबों क़े सलाम...!**

## फिटनेस फंडा

व्यायाम केल्यानंतर काय खायला हवं याबद्दल बरंच बोललं आणि लिहिलं गेलं आहे. व्यायामानंतरचं खाणं हे दिवसभरातील सर्वात महत्त्वाचं खाणं आहे. या विषयी जाणून घेऊ या. जीममध्ये व्यायाम करताना स्नायूंमधलं ग्लायकोजेन कमी होत असतं आणि स्नायूंचे टिश्यू फाटत असतात. त्यामुळे व्यायामानंतर शरीराला ग्लायकोजेन आणि अमायनो ॲसिडसची गरज असते. हे घटक शरीराला मिळाले तर झीज भरून काढण्याच्या प्रक्रियेला सुरूवात होते. व्यायामानंतर शरीराला कर्बोदकांची गरज असते. त्यामुळे कर्बोदकयुक्त आहार घ्यायला हवा.

(क्रमश:)

## भटकंती — कॅम्पिंगचा आनंद घ्यायचाय?

आठवड्यातील पाच दिवस भरपूर काम केल्यावर सुट्टीच्या दिवशी एखाद्या रमणीय ठिकाणी भटकण्याची मजाच काही वेगळी. हा आनंद द्विगुणीत करण्यासाठी तुम्ही कॅम्पिंगही करू शकता. मात्र, त्यासाठी कोरोना संदर्भातील काही नियम पाळावे लागतील. तशी काळजी घेऊन कॅम्पिंगचा आनंद घ्यायचा असेल तर काही ठिकाणांचा अवश्य विचार करायला हवा.



✼ ठाण्यातला तानसा तलाव एक ऑफ बीट ठिकाण आहे. शहरातल्या प्रदूषणापासून लांब असणाऱ्या तानसाच्या किनारी तंबू ठोकून तुम्ही निवांत क्षण अनुभवू शकता. निसर्गाच्या इथल्या निसर्गाच्या सानिध्यात रममाण व्हाल. ✼ लोणावळ्यापासून दहा किलोमीटर अंतरावर शिरोता तलाव आहे. इथे वन्य जीवन अनुभवण्यासोबतच ट्रेकिंगचा आनंद घेऊ शकता. रात्री कॅम्प फायरचा अनुभवही घेता येईल. ✼ इगतपुरीजवळ भंडारदरा हे ठिकाण आहे. पावसाळ्यात इथल्या धबधब्याखाली भिजण्याची मजाच वेगळी. इथे मौजमस्ती करू शकता. इथल्या तलावाजवळ तंबूत राहण्याची व्यवस्था आहे. इथून नाशिकलाही जाता येईल. ✼ लोणावळ्यातला पवता तलाव छोट्या ब्रेकसाठी उत्तम ठिकाण. इथल्या हिरव्यागार मैदानात तंबूत राहणं म्हणजे स्वर्गीय सुखच. तिकोना, लोहगड, तुंग हे किल्लेही परिसरात आहेत.

## खेचाखेची

**खतरनाक नदी**

**शिक्षक:** भारतातील सर्वात खतरनाक नदी कोणती आहे ?

**गणू:** भावना...!

**शिक्षक:** कशी?

**गणू:** कारण सगळे भावनेच्या भरात वाहून जातात...

शिक्षकांना पण भावना अनावर झाल्या.

## वेगळं काही

इंग्लंडमधल्या मँचेस्टरमध्ये राहणारी नाओमी जेकब्ज नेहमीप्रमाणे सकाळी उठली. पण आपण १५ वर्षांची मुलगी आहोत असं तिला वाटू लागलं. प्रत्यक्षात तिचं आयुष्य १७ वर्षांनी कमी झालं नसलं तरी ती हा काळ पूर्णपणे विसरून गेली होती. तिला स्वत:चे कपडे, घर काहीच लक्षात नव्हतं. आपल्यासोबत काय घडतंय हेच तिला कळत नव्हतं. तिने मानसोपचार तज्ज्ञांची मदत घ्यायचं ठरवलं. नाओमीला ट्रांजिट ग्लोबल एम्निशिया असल्याचं निदान त्यांनी केलं. यात निरोगी व्यक्तीला काही काळासाठी विस्मरण होतं. तिच्यावर तीन महिने उपचार करण्यात आले. त्यानंतर एके दिवशी सकाळी तिची स्मृती परतली आणि तिला सगळं आठवू लागलं.

## सौंदर्यसाधना — ...नखं राहतील सतेज

आता उन्हाळा सुरू झाला आहे. या ऋतूबदलाच्या काळात नियमीत मेनिक्युअर, पेडिक्युअरद्वारे हातापायांच्या त्वचेचं आरोग्य तसंच सौंदर्य जतन करावं. मेनिक्युअर, पेडिक्युअरवर बरेच पैसे खर्च होतात. त्यामुळे त्याचा प्रभाव काही काळापर्यंत तरी टिकून राहावा, असं वाटतं. पण प्रदूषण, धूळ आणि घरच्या कामांमुळे परिणाम लगेच फिके पडतात. नखं निस्तेज दिसू लागतात. त्यादृष्टीने कोणते उपाय करावे याविषयी...

✼ कापसाच्या बोळ्यावर थोडं व्हिनेगर घालून नखं स्वच्छ करा. नेलपॉलिश लावण्याआधी ही कृती करा. यामुळे नखांवरचं अतिरिक्त तेल निघून जाईल.

✼ बोटं पाण्यात बुडवून ठेऊ नका. नखं पाण्यात बुडवल्याने आकार वाढतो. नंतर ती आक्रसतात. यामुळे नेलपॉलिश कसंतरीच दिसतं.

✼ नेलपॉलिशचा पहिला थर नीट लावा. अन्यथा नखांचा लूक बिघडतो.

✼ नेलपॉलिशचा शेवटचा थर झगमगाटी हवा. नखांवर क्युटिकल ऑईल लावा.

✼ नेलपॉलिशची बाटली वर-खाली करू नका. यामुळे बुडबुडे तयार होऊन नखांवर पसरतात.

✼ नेलपॉलिश गरम हवेत वाळवू नका. त्यासाठी बोटं काही काळ बर्फात ठेवता येतील.

## सुडोकू ९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | | ४ | | ८ | | |
| ८ | | | २ | | ७ | | | |
| | २ | | | ३ | | | १ | |
| | | ५ | | | ३ | | ९ | |
| ६ | १ | | ४ | | ८ | | २ | ३ |
| | ७ | | ९ | | | ४ | | |
| | ५ | | | ८ | | | ३ | |
| | | | ३ | | ५ | | | ८ |
| | | ८ | | ९ | | २ | | |

**टीप -**

✼ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✼ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✼ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ४ | २ | ५ | ८ | १ | ७ | ९ |
| ८ | ७ | ९ | ४ | ६ | १ | २ | ५ | ३ |
| ५ | १ | २ | ९ | ३ | ७ | ६ | ८ | ४ |
| ९ | ४ | ६ | १ | ७ | ५ | ३ | २ | ८ |
| २ | ८ | ३ | ६ | ८ | ४ | ५ | १ | ७ |
| १ | ८ | ७ | ३ | ८ | २ | ४ | ९ | ६ |
| ४ | २ | ८ | ७ | १ | ३ | ९ | ६ | ५ |
| ३ | ९ | ५ | ८ | २ | ६ | ७ | ४ | १ |
| ७ | ६ | १ | ५ | ४ | ९ | ८ | ३ | २ |

## शब्दकोडे क्रमांक ९



**आडवे शब्द :-**
१) राहणे, वस्ती
३) मंदिर
६) चित्त, लक्ष, भान
९) नशीब, काम
१०) छोटी वस्ती
१२) चामखीळ
१४) नूतन
१५) रांग
१६) प्रतिध्वनी
१८) बेकरीतील एक पदार्थ,
२१) वचक, जरब
२३) पूर्ण ऐक्य, भरतीची वेळ
२५) अभिप्राय
२७) तोंडातोंडी व्यवहार
३०) किंमत
३१) सीमा मर्यादा
३३) राजकारभाराचे प्रमुख शहर
३५) किल्लेदार
३८) सदोदित
३९) मयूर
४०) ढीग
४२) घराचा मागचा दरवाजा
४४) फांदी तुटताना होणारा आवाज
४६) मालाचे येणे-जाणे
४९) फोक, छडी
५०) महिना
५१) पावसाची झड
५२) नातेवाईक
५३) एक श्वासरोग
५४) रसाळ
५६) परमेश्वर
५८) भगवान, देव
५९) शरम
६१) उत्कंठेने मार्गप्रतिक्षा
६४) जिवंत
६६) सेवक, गुलाम
६८) दहावी रास
७०) संकट
७१) हिंदुस्थान
७२) जंगलाकडे जाणारा रस्ता
७३) हावरटपणा
७७) सिंहासन
७८) निराश, खिन्न
७९) फुलणे, लोंबणे
८०) चलनवलन
८२) माझा
८३) व्रत
८५) मेंढ्या पाळणारा
८७) पुत्र(सं.)
८८) प्रफुल्लित
९१) मच्छर
९२) जाणे, प्रस्थान करणे
९३) लहान
९४) गाय
९५) द्रव्य, पैसा
९६) अर्धी ओंजळ
९७) घोड्यावरून मारलेली फेरी

**उभे शब्द :-**
१) वितरण
२) उद्योग, धंदा
३) शरीर
४) कडक व चिवट
५) जावळा
७) अरण्य
८) पळापळ
९) शिखराचे टोक
११) हाकेला दिलेली ओ
१३) तळे
१७) बेडकाचे ओरडणे
१९) ऐतिहासिक गद्य लिखाण
२०) अंगठा व तर्जनी यामधील ताणलेले अंतर, टिचकी
२२) साठलेला केर
२४) स्वाभिमानी स्त्री
२६) एक रत्न
२८) नावातील बदल
२९) झोपमोड
३०) हिस्सा, भाग
३१) मोदक, करंजीचे आवरण
३२) वाणी, जिभ, बोलणे
३४) धारेला लावून केलेली तपासणी
३६) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
३७) रेचक, सरकवणारे
३८) सदवर्तन
४१) परमेश्वर
४३) विषमच्या विरुद्ध
४४) व्यायाम
४५) भित्रा
४६) आवई
४७) जागल्या
४८) कदर करणारा
५०) मादी
५५) तादाम्य, एकरुप
५७) शहर
६०) बस्तान
६२) मिठी, विळखा
६३) सप्तपातालातील सहावे पाताळ
६५) वेदनेने भरलेले
६७) फुरसत
६९) एका बाजूस झुकणे
७१) गवताची, सरपणाची मोळी
७२) राजाचा राज्य करण्याचा कालावधी
७३) प्रफुल्लता
७५) किंचित छोटा
७६) अखंड
८१) चावट, खट्याळ
८२) चिंतन
८४) दक्ष
८५) पुस्तकातील पाठ
८६) जन्म
८७) त्या प्रमाणे
८९) हजार किलो
९०) बारा वर्षांचा काळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



## निवडक

### वर्ल्डकपसाठी १६वा संघ पात्र

**नवी दिल्ली :** आशिया कप २०२५ स्पर्धेनंतर आता आयसीसी टी-वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचे वेध लागले आहेत. या स्पर्धा फेब्रुवारी-मार्च महिन्यात भारत आणि श्रीलंकेत होणार आहे. त्यामुळे आता या स्पर्धेसाठी अवघ्या काही दिवसांचा अवधी शिल्लक आहे. या स्पर्धेत एकूण २० संघ भाग घेणार असून त्यापैकी १६ संघ ठरले आहेत. १६ व्या संघाने अफ्रिका झोनमधून एन्ट्री मिळवली आहे. आफ्रिका पात्रता फेरीतून दोन पैकी एक संघ ठरला आहे. आफ्रिका प्रादेशिक पात्रता स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य सामन्यात नामिबियाने टांझानियाला ६३ पराभूत करत आपलं स्थान पक्कं केलं नामिबिया पुढील वर्षी भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी विश्वचषकात खेळणार आहे. या झोनमधून आणखी एक संघ ठरणार आहे. दुसऱ्या उपांत्य फेरीत झिम्बाब्वे आणि केनिया यांच्यातील एक संघ पुढील वर्षीच्या टी स्पर्धेसाठी पात्र ठरणारा दुसरा संघ असेल. भारत आणि श्रीलंका यांच्याकडे यजमानपद असल्याने थेट पात्र ठरलेत. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, अफगाणिस्तान, बांगलादेश, वेस्ट इंडिज, कॅनडा आणि यूएसए यांनीही टी वर्ल्डकप २०२४ स्पर्धेच्या सुपर ८ मध्ये स्थान मिळवलं होतं. त्यामुळे या संघांची थेट निवड झाली. टी रँकिंगच्या आधारे आयर्लंड, न्यूझीलंड आणि पाकिस्तान यांनीही या स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. आफ्रिका प्रादेशिक पात्रता फेरीतून नामिबियाने जागा मिळवली असून १६वा संघ ठरला आहे.

### पिंच्याक स्पर्धेत भारताला यश

**पाली/बेणसे :** शेरे काश्मीर इंडोर स्टेडियम जम्मू काश्मीर येथे २५ ते ३० सप्टेंबर २०२५ रोजी तिसऱ्या ज्युनिअर आशियाई पिंच्याक सिलॅट स्पर्धेचे आयोजन भारतीय क्रीडा मंत्रालय, भारतीय क्रीडा प्राधिकरण, जम्मू-काश्मीर क्रीडा परिषद, यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने तसेच एशियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनच्या मान्यतेने भारतीय पिंच्याक सिलॅट फेडरेशनने केले होते.




या स्पर्धेचा उद्घाटन उमर अब्दुल्ला मुख्यमंत्री जम्मू काश्मीर, अतुल दुल मुख्य सचिव जम्मू-कश्मीर सरकार, सतीश शर्मा क्रीडामंत्री जम्मू काश्मीर, किशोर येवले अध्यक्ष इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशन आदी मान्यवरांच्या हस्ते झाला. या स्पर्धेमध्ये भारत, इंडोनेशिया, फिलिपिन्स, वेतनाम, कजाकिस्तान, उज़्बेकिस्तान, थायलंड, मलेशिया, नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश, या ११ देशातील ३०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन करीत भारतीय संघाने ७ सुवर्ण १८ रौप्य २६ कास्य पदके मिळवून चौथ्या क्रमांकाचा चषक पटकावला.



### अंजुमन इस्लाम जंजिराचे क्रीडा स्पर्धेत यश

**मुरुड जंजिरा :** मुरुड तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धा विहूर येथील मेहबूब एज्युकेशन येथील हायस्कूलमध्ये सपन्न झाल्या. यावेळी अंजुमन इस्लाम जंजिरा एग्री हायस्कूलमधील शालेय विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धामध्ये यश संपादन केले. कराटे स्पर्धेमध्ये मुले १७ वर्षे खालील गटामध्ये हास्सान कासकर तिसरा क्रमांक, अब्दुल्लाह कोतविलकर प्रथम क्रमांक, नफिस चौधरी कराटे प्रथम क्रमांक, हुझैफा आरिफ १५०० मीटर रनिंगमध्ये दुसरा क्रमांक, खिजर चिपळूणकर लॉग जंपमध्ये तिसरा क्रमांक प्राप्त केला. १९ वर्षे खालील गटामध्ये बाझिल नाखुदा १५०० मी आणि ४०० मी रनिंग प्रथम क्रमांक, इब्राहिम नाखुदा १०० मी रनिंगमध्ये दुसरा क्रमांक, आफताब दखनी २०० मी रनिंग दुसरा क्रमांक, शुजात अरब २०० मीटर रनिंगमध्ये प्रथम क्रमांक शाफान परकार शॉट पुट स्पर्धेत तिसरा क्रमांक, रय्यान उलडे कॅरम स्पर्धेत दुसरा क्रमांक प्राप्त केला. १४ वर्षे खालील गटामध्ये हूदा मूंगये डिस्कस थ्रो स्पर्धेत दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे. १७ वर्षे खालील गटामध्ये आयेशा गोलंदाज थाळी फेकमध्ये प्रथम क्रमांक, शाईमा शाहबंदर ४०० मीटर रनिंगमध्ये प्रथम, लॉग जंपमध्ये दुसरा क्रमांक व २०० मी रनिंग दुसरा क्रमांक प्राप्त केला. सुहेमा ददनाक हिने थाळी फेकमध्ये तिसरा क्रमांक प्राप्त केला. १९ वर्षे खालील गटामध्ये सफा कारबारी थाळी फेकमध्ये प्रथम क्रमांक, मिस्बाह सावरी डिस्कस थ्रो दुसरा क्रमांक, १०० मी राननिंग तिसरा व हाईजम्प तिसरा क्रमांक पटकावला. अंजुमन शाळा १७ वर्षे खालील संघाने व्हॅली बॉलमध्ये दुसरा क्रमांक तर १९ वर्षे खालील संघाने दुसरा क्रमांक आणि रिले ४ ✻ १०० मी मध्ये दुसरा क्रमांक पटकावला आहे, प्रीत दिवेकरची जिल्हा स्तरीय बॅडमिंटन स्पर्धासाठी निवड झाली आहे.

# कसोटीत भारताचं राज्य

## ● वेस्ट इंडिजचा १६२ धावांत खेळ खल्लास




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटीचा पहिला दिवस गाजवला. नाणेफेकीचा कौल गमावल्याने भारताला प्रथम गोलंदाजी करण भाग पडले. भारताने भेदक गोलंदाजीचे प्रदर्शन घडवलं आणि वेस्ट इंडिजला बॅकफूटवर ढकललं. त्यामुळे वेस्ट इंडिजचा डाव पहिल्याच दिवशी गडगडला. वेस्ट इंडिजने पहिल्या डावात सर्व गडी गमवून १६२ धावा केल्या. त्यामुळे भारताला आता पहिल्या डावात मोठी आघाडी घेण्याची संधी आहे. पहिल्याच दिवशी वेस्ट इंडिजची स्थिती नाजूक झाल्याने भारताच्या विजयाच्या आशा देखील दुप्पट झाल्या आहेत. आता भारतीय संघ कशी कामगिरी करतो याकडे लक्ष लागून आहे. भारताची बॅटिंग लाइन अपमध्ये खूप खोली आहे. त्यामुळे आरामात मोठी धावसंख्या उभारेल असं क्रीडाप्रेमी म्हणत आहेत. त्यात होम ग्राऊंडचा भारतीय फलंदाजांना फायदा होईल हे नव्याने काही सांगायची गरज नाही.

वेस्ट इंडिजच्या अवघ्या १२ धावा असताना पहिला धक्का बसला. तेजनारायण चंद्रपॉलला खातंही खोलता आलं नाही. मोहम्मद सिराजच्या गोलंदाजीवर विकेटकीपर ध्रुव जुरेलने त्याला झेल पकडला. त्यानंतर जॉन कॅम्पबेल ८ धावा करत तंबूत परतला. जसप्रीत बुमराहने त्याला तंबूचा रस्ता दाखवला. त्यानंतर ठरावीक अंतराने धडाधड विकेट पडण्यास सुरुवात झाली. लंच ब्रेकपर्यंत निम्म्याहून अधिक संघ तंबूत होता. तिसरी विकेट ३९ धावांवर पडली. ब्रँडन किंग बाद झाला. त्यानंतर एलिक अथानाझेची विकेट ४२ धावांवर पडली. तर शाई होप २६ धावा करून तंबूत परतला. तेव्हा वेस्ट इंडिजच्या ९० धावा होत्या. रोस्टन चेस २४ धावा करून बाद झाला.

टी ब्रेकनंतर वेस्ट इंडिजला वॉशिंग्टन सुंदरने धक्का दिला. त्याने सातवी विकेट काढली. जसप्रीत बुमराहने दोन षटकात दोन धक्के दिले. जस्टीन ग्रीव्हसला बाद केल्यानंतर जोहान लेनचा त्रिफळा उडवला. या सामन्यात मोहम्मद सिराजला पाच विकेट घेण्याची संधी होती. पण ते काही झालं नाही. कुलदीप यादवने शेवटची विकेट काढली आणि सिराजच्या पाच विकेटच्या आशेला ब्रेक लागला. मोहम्मद सिराजने १४ षटकात ३ षटकं निर्धाव टाकली आणि ४० धावा देत ४ गडी बाद केले. जसप्रीत बुमराहने १४ षटकात ३ निर्धाव षटकं टाकत ४२ धावा देत ३ गडी बाद केले. तर कुलदीप यादवने २ गडी आणि वॉशिंग्टन सुंदरने १ गडी बाद केला.

**पडझड सुरूच**

**लंचनंतर सिराजने पुन्हा एकदा दे धक्का दिला. त्याने रोस्टन चेसचा (२४) अडसर दूर केला. त्यानंतर सुंदरने खेरी पियरेला (११) पायचीत बाद केले. बुमराहने आपल्या घातक यॉर्करचा मारा करून जस्टिन ग्रीव्स (३२) आणि जोहान लेन (१) या दोघांनाही क्लीन बोल्ड केले. अखेरीस, कुलदीप यादवने वॉरिकनला (८) यष्टिरक्षक जुरेलकरवी झेलबाद करून वेस्ट इंडिजचा डाव १६२ धावांवर संपुष्टात आणला.**

## खोपोलीत जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवकसेवासंचलनालय महाराष्ट्रराज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग आयोजित जिल्हा स्तरीय कुस्ती स्पर्धा कारमेल कॉन्व्हेंट स्कूल-खोपोली येथे संपन्न झाली आहे. या स्पर्धेत १५ तालुक्यातील ३५० हून अधिक कुस्तीपटूनी सहभाग घेऊन विभागीय स्तरांवर आपली निवड व्हावी या उद्देशाने आपले कौशल्य पणाला लावले. पहिल्या दिवशी मुलींच्या तर दुसऱ्या दिवशी मुलांच्या स्पर्धा संपन्न झाल्या.

स्पर्धेच्या उदघाटनास विक्रम यशवंत साबळे, खोपोली स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे, खालापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन पवार, खोपोली पोलीस स्टेशनच्या उपनिरीक्षक सुरेश गागरे, खोपोली शहरातील विवीध शाळांच्या मुख्याध्यापकांमध्ये सिस्टर निर्मल मारिया, गौरव तिवारी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मारुती आडकर, रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष भगवान धुळे, जयेंद्र भगत, तांत्रिक सचिव तथा स्पर्धा प्रमुख राजाराम कुंभार, खोपोलीचे माजी नगरसेवक महादू जाधव, खालापूर नगरपंचायतीच्या माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम, खातशिप्रचे सचिव किशोर पाटील, खालापूर तालुका कुस्तीगीर संघाचे गुरुनाथ साठेलकर आणि प्रमोद भगत इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.

या स्पर्धा यशस्वी करण्याकरिता खालापूर तालुका समनव्यक जगदीश मरागजे, क्रीडा शिक्षक समीर शिंदे, अमित विचारे, जयश्री नेमाणे, दिवेश पालांडे, धनश्री गौडा यांनी खूप मेहनत घेतली. स्पर्धेसाठी पंच म्हणून राष्ट्रीय पंच सावळेराम पायमोडे, रोशनी परदेशी, विनोद जाधव यांनी मोलाची कामगिरी बजावली. वेध मरागजे, क्षितिजा मरागजे, सुशील पावशे, प्राण भगत, हंसिका कुंभार या कुस्तीपटूंच्या कुस्त्या प्रेक्षणीय ठरल्या.

## अजयला बॉक्सिंगमध्ये सुवर्ण



**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यातील पन्हेळी शाळेची विद्यार्थिनी हिंदवी अजय म्हस्के हिने राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून शाळा तसेच तालुक्याचा लौकिक वाढविला आहे. २५ ते २८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या ६३ ते ६६ किलो वजनगटात हिंदवीने दमदार कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले. अत्यंत चुरशीच्या अंतिम सामन्यात तिने उत्कृष्ट खेळ करत सुवर्णपदक पटकावले. हिंदवीला शाळेचे क्रीडा शिक्षक मनोहर वारगुडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रशिक्षणाखाली हिंदवीने मेहनत, जिद्द आणि सातत्य ठेवून हे यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व शिक्षकांनी हिंदवीचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळून अधिक यश मिळवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## साईमची किक बॉक्सिंग स्पर्धेत दमदार कामगिरी

**। गुहागर । प्रतिनिधी ।**

गुहागर तालुक्यातील शृंगारतळी येथील अली पब्लिक स्कूलचा इयत्ता ८ वीचा विद्यार्थी साईम सर्फराज माळगुंडकर याने क्रीडा क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. नुकत्याच पुणे बालेवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या ३७ व्या महाराष्ट्र स्टेट किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२५ या राज्यस्तरीय स्पर्धेत साईमने चमकदार कामगिरी करत दोन रौप्य पदके पटकावली.

या स्पर्धेमध्ये पुणे, अमरावती, मुंबई, गुहागर, चिपळूण, रत्नागिरी आणि खेड अशा विविध ठिकाणचे स्पर्धक सहभागी झाले होते. या तीव्र स्पर्धेतही साईमने आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. साईमच्या या यशामध्ये त्याला लाभलेल्या योग्य मार्गदर्शकाचे मोठे योगदान आहे. त्याचे मार्गदर्शक हुजैफा ठाकूर यांच्या प्रशिक्षणाखाली त्याने कसून सराव केला, तर असोसिएशनच्या अध्यक्ष योगिता खाडे यांचेही यासाठी महत्त्वाचे सहकार्य लाभले. साईमच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विनोद जानवलकर यांनी सन्मान करुन भेटवस्तू देत कौतुक केले आहे.

## तांग सू-डो स्पर्धेत यश




**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र तांग सू-डो स्पोर्ट्स असोसिएशन व धुळे जिल्हा तांग सू-डो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने व राजे छत्रपती मार्शल आर्ट इंग्लिश मिडीयम स्कूल यांच्या सहकार्याने १२ वी राज्यस्तरीय तांग सू-डो अजिंक्यपद स्पर्धा धुळे-पिंपळनेर येथे संपन्न झाल्या. यात राज्यातील एकूण २० जिल्ह्यातील कराटेपटूंनी सहभागी झाले होते.

तांग सू-डो स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ रायगडचे अध्यक्ष विजय तांबडकर यांच्या नेतृत्वाखाली मुरुड व अलिबाग तालुक्यातील १८ खेळाडूंनी सहभागी झाले. खेळाडूंनी चमकदार कामगिरी बजावत एक सुवर्ण, चार रौप्य आठ कांस्यपदक पटकाविली.

मुरुडमधील मजगांवच्या रेश्मा भोईर हिने सुवर्णपदक काव्या नाक्ती (मजगांव), अमोघ दळवी (नांदगाव), अलिबाग येथील नम्रता चव्हाण व अन्यन्या निकम यांनी रौप्यपदक पटकावले. अलिबागचे शिव हिलम, वेद कदम, निल मगर, श्लोक जाधव नांदगावचे काव्या नाक्ती, आर्यन गद्रे, जय ठाकूर कांस्यपदकाचे मानकरी ठरले आहेत. सर्व खेळाडूंना विजय तांबडकर व अभिषेक तांबडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षक प्रियांका गुंजाळ, वेदांत सुर्वे, सिध्देश सतविडकर, आकांक्षा तांबडकर यांनी प्रशिक्षण दिले. खेळाडूंनी मिळविलेल्या यशाबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## १४ वर्षांच्या वैभवचा पराक्रम

**नवी दिल्ली :** भारताचा उभरता युवा स्टार फलंदाज वैभव सूर्यवंशी पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. केवळ १४ वर्षे १८८ दिवस वय असताना त्याने ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर ऐतिहासिक कामगिरी केली आहे. ब्रिस्बेनमधील इयान हीली ओव्हल मैदानावर सुरू असलेल्या भारत अंडर-१९ विरुद्ध ऑस्ट्रेलिया अंडर-१९ युवा कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी वैभवने फक्त ७८ चेंडूंमध्ये तडाखेबाज शतक झळकावलं. ऑस्ट्रेलियाला २४३ धावांवर रोखल्यानंतर भारतीय फलंदाजांनी दमदार सुरुवात केली. ओपनिंगला आलेल्या वैभवने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. ८ षटकार आणि ९ चौकारांच्या मदतीने त्याने केवळ ८६ चेंडूंमध्ये ११३ धावा फटकावत भारताला भक्कम स्थितीत नेलं.

## नेरळमधील कराटेपटूंचे यश



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृह आणि मानिवली येथील हुतात्मा हिराजी पाटील स्मारक येथे चालविण्यात येत असलेल्या कराटे कराटेपटूंनी छत्रपती राष्ट्रीय कराटे स्पर्धेत मोठे यश संपादन केले आहे. या स्पर्धेत १२ सुवर्ण,११ रौप्य आणि १२ कांस्यपदके मिळविली असून २२ कराटेपटूंनी पदके मिळविली.

कराटे प्रशिक्षक हिरामण गवळी, नंदू म्हसकर यांच्या माध्यमातून नेरळ येथे कराटे प्रशिक्षण देणारे क्लास भरविले जातात. या स्पर्धेत नेरळ आणि मानिवली येथील कराटे क्लासमधील २२ कराटेपटू सहभागी झाले होते. कराटेपटूंनी तब्बल ३५ पदके मिळविली आहेत. त्यात १२ सुवर्ण तर ११ रौप्य आणि १२ कांस्यपदके मिळविली आहेत. गार्गी ठोंबरे, गवळी, समृद्धी सोनावणे, जय दिसले, परी डायरे, श्रेया म्हसे, संस्कार म्हसे, जितेश जाधव, स्वराज विरले, सौम्यता हुबरे, कस्तुरी भोईर, पूर्वी मोडक, जय खांबाळे, वीरा खांबाळे, गंधर्व फराट, निरंजन घुले, स्वरा पाटील, वेडा खेडेकर, केदार डायरे, श्राव्या डायरे, प्रणाली डायरे, कशीस खांबाळे आदी कराटेपटूनी पदके मिळविली.




## संदीप कुमारचं सलग तिसरे सुपर १० | गुणतालिकेत घेतली मोठी झेप

# यू मुंबाचा थलायवाजवर एकतर्फी विजय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेतील १२ व्या हंगामातील ५८ वा सामना यू मुंबा आणि तमिळ थलायवाज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात यू मुंबाचे चढाईपटू आणि बचावपटू देखील चमकले. संदीप कुमारच्या सलग तिसऱ्या सुपर १० च्या बळावर यू मुंबाने हा सामना ४२-२४ गुणांसह आपल्या नावावर केला. चेन्नईतील एसडीटी मल्टिपर्पज स्टेडियममध्ये पार पडलेल्या सामन्यात यू मुंबाकडून संदीप कुमारने सर्वाधिक १२ गुणांची कमाई केली. तर कर्णधार सुनील कुमारने ६ गुणांची कमाई केली. अजित चौहानने २ गुणांची कमाई केली. प्रत्युत्तरात यू मुंबाने अर्जुन देशवालची पकड केली. दोन्ही संघांनी बचावात १- १ गुण घेत संघाचं खातं उघडलं. सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर तमिळ थलायवाजचा संघ ४-३ गुणांसह १ गुणाने आघाडीवर होता. सातव्या मिनिटाला यू मुंबाने सुपर टॅकल करत गुणसंख्या ५-५ ने बरोबरीत आणली. या सामन्यात अजित चौहानने पुनरागमन केलं पण तो सुरुवातीला फ्लॉप ठरला. पूर्वार्धातील १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर यू मुंबाचा संघ ८-७ ने आघाडीवर होता. यू मुंबाकडून सुरुवातीच्या १२ व्या मिनिटाला लोकेशने हाय फाय पूर्ण केलं. सुरुवातीच्या १५ मिनिटांमध्ये दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. १४ व्या मिनिटाला यू मुंबाने सुपर टॅकल करत गुणसंख्येत आणखी भर घातली. १५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर यू मुंबाने १३-९ गुणांसह ४ गुणांची आघाडी घेतली. १६ व्या मिनिटाला अजित चौहान बदली खेळाडू म्हणून चढाई करण्यासाठी आला आणि त्याने २ गुणांची कमाई करत गुणसंख्येत भर घातली. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर यू मुंबाचा संघ १६-११ गुणांसह ५ गुणांनी आघाडीवर होता. उत्तरार्धातील सुरुवात देखील यू मुंबाने दमदार केली. चौथ्या मिनिटाला यू मुंबाने सुपर टॅकल करत २ गुणांची भर घातली. त्यानंतर पुढच्याच चढाईत संदीपने २ गुण घेत गुणसंख्येत आणखी भर घातली. उत्तरार्धातील ६ व्या मिनिटाला तमिळ थलायवाजचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह यू मुंबाने ९ गुणांची आघाडी घेतली. उत्तरार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर यू मुंबाकडे २८- १६ गुणांची आघाडी होती. यू मुंबाकडून १४ व्या मिनिटाला संदीपने आपलं सुपर १० पूर्ण केलं. शेवटच्या २ मिनिटात यू मुंबाकडे ३५ - २१ गुणांसह १४ गुणांची आघाडी होती. सामन्यातील शेवटच्या मिनिटाला तमिळ थलायवाजचा संघ दुसऱ्यांदा ऑलआऊट झाला. यासह आघाडी ४१- २३ वर जाऊन पोहोचली. यासह यू मुंबाने तमिळ थलायवाजवर ४२- २४ गुणांसह मोठा विजय मिळवला. यासह यू मुंबाने गुणतालिकेत सहाव्या स्थानी झेप घेतली आहे.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)